५८

# अमेरिकेविषयीं कांहीं विचार

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. 9239

जाक् मारिटेन

किंमत २ रुपये

REFBK-0009760

नव लेखन प्रकाशन

एका
फ्रेंच तत्त्वज्ञान्याचे,
एका आगळ्या
देशाविषयींचे,
समाजरचनेविषयींचे,
समाजजीवनाविषयींचे
आणि
तदनुषंगिक इतर
प्रश्नांविषयींचे
निर्भीड विचार.

# अमेरिकेविषयीं कांहीं विचार

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थापना
अनुक्रम 2/10091 विः
क्रमांक ... नोंः दिः
9237. 9/8/1960

**जाक्‌ मारिटेन**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. ८०६०

नव-लेखन प्रकाशन

REFBK-0009760

किंमत २ रुपये

प्रकाशक
वसंतकुमार सराफ,
ई ५, मॉडेल हाउस,
प्रॉक्टर रोड, मुंबई ४.

मुद्रक
बा. रा. वर्तक,
प्रशांत प्रिंटिंग प्रेस,
४६१/१, सदाशिव, टिळक रोड, पुणें २.

Copyright by Jacques Maritain

आवृत्ति पहिली : नोव्हेंबर १९५८

दा. क्र. ८५६०

१

## थोडेसें प्रस्तावपर

तसा बऱ्याच दिवसांपासून मी या देशाबद्दल कांहींतरी बोलावें, माझ्या मनांतल्या त्याच्याविषयींच्या कौतुकाला वाट करून द्यावी असें म्हणतों आहे. पण या व्याख्यानांचा विषय म्हणून मी तो मान्य केला तो कचरतच.

पहिली गोष्ट म्हणजे एकाद्या देशांत आपण फार दिवस रहातों तेव्हां दिवसगतीनें त्या देशाविषयीं आपल्याला अधिकाधिक माहिती मिळूं लागते; आणि जितकी जास्त माहिती मिळूं लागते तितका मनाचा जास्त गोंधळ उडतो. मिळालेल्या माहितीनें वैयक्तिक अनुभव कमीअधिक पुसटतात. आणि या एवढ्या प्रचंड मानव-समुदायाच्या गुंतागुंतीच्या आणि सतत प्रतीत होणाऱ्या परस्परविरुद्ध नवनवीन वैशिष्ट्यांनीं असें कांहीं न झालें तरच नवल.

दुसरी गोष्ट म्हणजे माझ्या एरवींच्या तत्त्वज्ञानाच्या व्यासंगांत या प्रकारचा पद्धतशीर, परिपूर्ण आणि तथाकथित 'शास्त्रीय' अभ्यास करण्याला मला वेळही नव्हता.

तरीही, एकीकडे हा देश आणि त्याच्या जनतेबाबतचें मनांतलें सारें बोलून टाकलें पाहिजे, लिहिलें पाहिजे ही तळमळ वाढतच होती. कारण

माझ्या दृष्टीनें, असें करणें न्यायाचें आणि एका मोठ्या ऋणाच्या परतफेडीसारखें ठरणार होतें. याबाबतींत मी नवीन वा स्वतंत्र कांहीं करीत नाहीं. चॅटुब्रिआं आणि टोकव्हिलनीं करून दिलेल्या एका फ्रेंच परंपरेनुसार मी आपली छोटीशी भूमिका बजावींत आहे.

दुसरें असें कीं, पद्धतशीर ' सर्व्हेज ' आणि शास्त्रीय विश्लेषणें कितीही सहाय्यकारक आणि आवश्यक असलीं तरी एकाद्या स्वतंत्र, पूर्णपणें वैयक्तिक, प्रयोगपर, अ–शास्त्रीय अभ्यास–पद्धतीलाही यांत नेहमींच वाव असतो. या पद्धतींतले निष्कर्षही एकाद्या उपऱ्या 'सर्व्हे'इतके खरे–अर्थात् त्यांच्या पद्धतीनें–असूं शकतात आणि अनेकदां कांहीं अनिश्चित पण खोलवरचीं सत्येंही त्यांत हातीं लागण्याचा चांगलाच संभव असतो. उत्तम ' सर्व्हे 'चें, शास्त्रीय विश्लेषणांचें उदाहरण म्हणून मी नीग्रो लोकांच्या स्थितीबद्दलच्या गन्नर मिर्डल यांच्या ' ॲन अमेरिकन डायलेमा ' या ग्रंथाचें उदाहरण इथें जाता जाता देऊं शकेन.

अखेर तसें पाहिलें तर एकाद्या देशाबद्दल किंवा त्यांतल्या जनतेबद्दल आपण मतें बनवतों, तेव्हां त्यांत व्यक्तिविषयक अनुभव, एकेरी प्रतिक्रिया, आणि अशा अनेक एकेरी प्रतिक्रियांतून अखेर साकार होणारें स्वतःचा इतिहास, मन, मेंदू, स्वप्नें आणि उद्योगउदीम असलेलें एक सामुदायिक व्यक्तिमत्व, यांचा भाग फार मोठा असतो. आणि एकेरी प्रतिक्रियांची गंमत ही कीं त्या हुकमी सिद्ध करतां येणार नाहींत, त्याविषयींच्या विधानांचा अधिक खुलासाही जमणार नाहीं कीं कांहीं सर्वमान्य सिद्धांतांचा, बुद्धिवादी तर्कशास्त्राचा, वस्तुनिष्ठ प्रमाणांचा आधारही त्यांना आणून जोडता येणार नाहीं. कारण अशी प्रतिक्रिया ही एका स्वतंत्र, वैयक्तिक अनुभवाचा भाग असते. या अनुभवांत अनुभव घेणारी व्यक्ति आणि देणारी व्यक्ति यांना फार महत्त्व असतें. या दोन टोकांपलिकडे तिसरें टोक या अनुभवाला असत नाहीं आणि जोडूं गेलें तर अनवस्थाप्रसंग ओढवण्याचीच शक्यता.

अखेर हेंच खरें कीं अमेरिकेबाबत यानंतर इथें बोलतांना माझी भूमिका मनस्वी नाजुक असणार आहे. माझें कोणतेंहि विधान मी सर्वसामान्य उदाहरणें किंवा प्रमाणें देऊन सिद्ध करूं शकणार नाहीं.

शिवाय माझ्या यानंतरच्या शब्दांना, विधानांना एकाद्या ऐतिहासिक विश्लेषणाचें किंवा परिपूर्ण चित्राचेंही स्वरूप असणार नाहीं. अनेक महत्त्वाचे प्रश्न त्यांत निर्माण होतील आणि अनुत्तरित रहातील. माझ्या कांहींशा उत्स्फूर्त प्रतिपादन–पद्धतींत हें अपरिहार्य आहे. माझीं अनेक विधानें अपूर्ण वाटतील, फार आत्मनिष्ठ वाटतील, विसंगत वाटतील— परंतु त्या मुळीं जाता जाता मनांत उद्भवलेल्या आणि राहून गेलेल्या प्रतिक्रियाच आहेत. हेंही ध्यानांत असूं द्या कीं, अशा प्रतिक्रिया कितीही काळजीपूर्वक केलेल्या निरीक्षणांतून उद्भवल्या असल्या तरी अखेर निरीक्षणांत आणि त्यामुळें प्रतिक्रियांत कांहीं चूक राहून जाण्याची शक्यता नेहमींच असते.

हें सर्व असलें तरी, मला एक विश्वास मात्र आहे; कीं येता जाता मनांत आलेल्या ह्या माझ्या प्रतिक्रियांनाही खोलवर कुठें तरी कांहीं अर्थ आहे. या अर्थाला माझ्यापुरतें मी फार महत्त्व देतों. कारण या अर्थापोटींच मला अमेरिकेबद्दल वाटतें तें प्रेम वाटतें. थोडीं थोडकीं नव्हेत, आज जवळ जवळ पंचवीस वर्षें ही अमेरिका मी पहातों आहे.

प्रत्येक मोठें मानवी सत्य हें सापेक्षच असतें. जगांतल्या अत्युत्तम गोष्टींनाही त्यांची एक धोकेबाज किंवा कमज़ास्त उणीवांची आणि दोषांची बाजू असते. मला याची जाणीव आहे. कांहीं अमेरिकन्स, स्वतःच्या संस्कृतीच्या आणि देशाच्या विशिष्ट लक्षणांबद्दल ज्या कठोर टीकात्मक दृष्टिकोनांतून बोलत असतात त्याचीही मला जाणीव आहे. यांत अनेकदां फार मातबर विचारवंतही असतात. यांतलीं कांहीं अप्रिय लक्षणें मलाही, विषयाच्या ओघांत, उल्लेखावीं लागतील. परंतु माझ्या दृष्टीनें महत्वाचें तें हें कीं, स्वतंत्रपणें या गोष्टींना कितीही महत्त्व असलें तरी अमेरिकेच्या ज्या वैशिष्ट्यांबद्दल मला जिव्हाळा वाटतो त्या उत्तम वैशिष्ट्यांच्या तुलनेनें हीं अप्रिय लक्षणें, दोष, उणीवा फारशा महत्त्वाच्या नाहींत. हें सारें वागवूनही हा देश, मानवजात आणि मानवी संस्कृतीचें भवितव्य या दोन दृष्टींनीं अत्यंत महत्त्वाचा आहे.

ही झाली ‘ नांदी ’—एकूण विषयाचा हा प्रस्ताव. हें पुस्तक ज्यांतून उद्भवलें त्या परिसंवादाचा हेतु आणि स्वरूप वाचकांच्या ध्यानीं

आधींच यावें म्हणून हें एवढें सांगावें लागलें. मुख्यतः यांतून एक गोष्ट स्वच्छपणें कळावी ती ही कीं, या देशावरचीं टोकव्हिल, आंद्र सीगफ्रिड, गिल्बर्ट चिनर्ड, वाल्डो फ्रँक, जॉन नेफ, एलिनोर नेफ, व्हेस सिमॉन, जॅक्स बार्झुन, मॅक्स लर्नर इत्यादि लेखकांचीं उत्कृष्ट पुस्तकें कांहीं वाचून आणि कांहीं न वाचता मी माझ्या वैयक्तिक अनुभवांनाच चिकटलों त्याला त्याचें असें कारण होतें.

• • •

## पहिली प्रतिक्रिया

माझ्या मतें पहिलें मत, पहिली प्रतिक्रिया नेहमींच महत्त्वाची असते. त्यांत योगायोगाचा कांहीं भाग असूं शकतो हें खरें. ती साफ चुकते देखील. उदाहरण द्यायचें तर जॉर्जेस दुहामेलचें देता येईल. तो या बाबतींत दुर्दैवी ठरला—या देशाच्या किनाऱ्यावर उतरतांच एका 'इमिग्रेशन डॉक्टर' नें सक्तीनें त्याच्या तोंडांत थर्मा-मीटर कोंबला आणि या अपराधाबाबत दुहामेलनें पुढें अमेरिकेला कधींहि क्षमा केली नाहीं. परंतु असले अपघात बाजूला ठेवले आणि येणारा पाहुणा पुरेसा खुल्या मनाचा आहे असें मानलें तर एकाद्या नव्या देशाबद्दलच्या त्याच्या प्रथमदर्शनीं मतांत, हें बरेचदां उथळ आणि ढोबळही असूं शकतें असें मान्य करूनही, सत्याचा फार मोठा अंश असतो, हें नाकारून चालणार नाहीं. 'जें न देखे रवि' अशा स्वरूपाचें कांहीं अशा वेळीं नवागताला दिसून आणि जाणवून जातें.

या देशाविषयीं आदर बाळगूनच, हें अधिक स्पष्ट करणें जरूर आहे. पूर्वग्रह न बाळगणारे, स्वच्छ, निर्विकार नजरेनें कोठल्याही गोष्टीचा बारीक अभ्यास करूं शकणारे, थंड माथ्याचे आणि वस्तुनिष्ठ वळणाचे अनेक परकी प्रवासी असतात, त्यांना अमेरिकेचें चांगुलपण समजतें आणि अमेरिका त्यांना आवडते. अमेरिकेच्या बऱ्यावाईट गुणांचा हिशेब करून या देशाविषयीं अखेर त्यांना कौतुकच फार वाटतें. या कौतुकाच्या

अभिव्यक्तींत भारदस्त असा संयम असतो, एक धोरण असतें आणि कांहीं वेळा थोडा फार उत्तेजनपर असा चांगलाचुंगला सल्लाही असतो.

हा झाला परकी प्रवाशांचा एक वर्ग. याहून वेगळा असा आणखी एक वर्ग असतो, तो आम्ही फ्रेंचमध्यें le coup de foudre म्हणतों त्याला, 'प्रथमदर्शनी प्रेमा'ला तात्काळ बळी पडतो—त्याचा 'कलिजा' या देशाच्या पहिल्या दर्शनानेंच 'खलास' होतो. प्रथमदर्शनी प्रेम एकाद्या वस्तूबद्दल वा विषयाबद्दल उद्‌भवत नाहीं, तें व्यक्तीविषयीं उद्‌भवतें. ज्यांचें असें प्रेम जडतें त्यांना एकाद्या खूप जुन्या, दृढमूल गौप्यावर अकस्मात प्रकाशझोत पडून तें उजळून नजर दिपावी आणि वृत्ती बधीर, पुलकित व्हाव्यात तसें होतें. ते मुळीं 'बळी'च पडतात, कुर्बान होतात.

हें इतकें खरें आहे कीं, माझा एक विद्वान फ्रेंच मित्र—माझ्यासारखाच या देशाच्या 'प्रथमदर्शनी प्रेमा'ला बळी पडलेला—म्हणतो कीं फ्रेंच माणसांचें इथें हें असें होतें त्याला या देशाचे आणि त्यांचे कांहीं गूढ ऋणानुबंधच कारणीभूत असले पाहिजेत. एकाद्या क्लबांतल्या सदस्यांत अंतर राखूनही एकमेकांबद्दल असे ऋणानुबंध असतात. एकच एका, सर्वांना मानवणाऱ्या कुठल्या तरी गोष्टीभोंवती हे गुंफले गेलेले असतात. तसेंच याही बाबतींत असलें पाहिजे.

मी म्हणतों त्या 'प्रथमदर्शनी प्रेमा'च्या भावनेला या जागीं विशेष महत्त्व आहे, कारण इतर कोठल्या देशांपेक्षां फ्रान्स आणि अमेरिका यांच्या दरम्यानच हें प्रेम प्रकर्षानें सांपडतें असें मला दिसतें. पास्कलनें म्हटलें आहे त्याविरुद्ध मी म्हणेन कीं आपण गुणांचे चहाते नसतों, माणसांचे चहाते असतों. मग त्या माणसांतल्या गुणांबरोबर दोषांचाही स्वीकार आपण करतोंच. किंबहुना कांहीं वेळा गुणांइतकेच दोषही त्याच्याविषयींच्या आपल्या मनांतल्या ओढीला कारणीभूत असतात असें दिसतें. फ्रान्स वा अमेरिकेचें प्रथमच दर्शन घेणारा कोणी 'प्रथमदर्शनी प्रेमां'त पडतो, कारण एका रसरशीत नैतिक व्यक्तित्वाचा साक्षात्कार मोठ्या भव्य आणि उदात्त स्वरूपांत त्याला घडलेला असतो. या साक्षात्काराचें स्वरूप प्रामुख्यानें आध्यात्मिक असतें. आणि याच्या उद्‌भवाला माझ्या

मतें अशी ना तशी कुडींतल्या आणि रक्तांतल्या क्रिश्चन परंपरेची, चैतन्याचीच एकादी ठिणगी त्याक्षणीं उपकारक ठरलेली असते.

तर मग या देशाबद्दल माझें पहिलें मत काय बनलें ? माझी प्रतिक्रिया काय झाली ?

ती शब्दांत बांधणें फार अवघड असलें तरी, मला वाटलें तें मात्र अगदीं ठाम आणि निश्चित होतें. मला एक मूलभूत आणि प्रचंड विरोध प्रतीत झाला. अगदीं स्पष्ट आणि दूरगामी स्वरूपाचा विरोध. हा विरोध होता 'माणसें' आणि 'मानवी सुधारणांची–सिव्हिलिझेशनची–अनैसर्गिक, उपरी चौकट' यांच्यामधला.

ही चौकट मी म्हणतों ती औद्योगिक सुधारणांची, युरोपमध्यें निर्माण झालेली आणि इथें बाहेरून आयात झालेली. ही प्रचंड चौकट एक नवा देश वसविणाऱ्या ईश्वरी छत्राखालच्या या विमुक्त माणसांच्या अस्तित्वावर ओठंगलेली मला भासली.

या औद्योगिक सुधारणांचा आणि संस्कारांचा परिचय मला युरोपांत झालेला होता. इथें त्यांचें एक भव्य आणि विकसित स्वरूप (युरोपांतून इथें आणविण्यांत आलेल्या अनेक गोष्टींनीं असेंच भव्य, प्रचंड विकसित स्वरूप इथें धारण केलें आहे.) मला दिसलें त्याचप्रमाणें एकाद्या परकी देवतेला हविर्भाग अर्पण करावा तितकी धार्मिकताही, उच्च पातळीवरली मनःपूर्वकताही मला त्यांत दिसली. वास्तविक या तथाकथित मानवी सुधारणांचा गाभा, त्यामागचा आशय, जगांत कुठेंही पाहूं गेलें तर, अमानुष आणि अगदीं भौतिकवादी असल्याचें मला माहीत होतें. या सुधारणांचा पायाच मुळीं आर्थिक सुबत्ता आणि वैयक्तिक स्वार्थाला प्रभुत्व या तत्त्वांवर उभारलेला होता.

परंतु इथें गंमतीदार विसंगति अशी कीं मानवी सुधारणांच्या येथल्या या चौकटीखालीं श्रमणाऱ्या आणि जगणाऱ्या जीवांनीं आपापले आत्मे मात्र या सुधारणांच्या संस्कारांपासून अलग आणि दूर राखलेले होते. निदान त्यांचीं स्वप्नें, त्यांची दैनंदिन धडपड, त्यांचा ध्येयवाद आणि औदार्य हें सारें या कठोर, अमानुष, उपऱ्या चौकटीच्या हेतु आणि

आशयाशीं अगदीं विसंगत आणि विरोधी असेंच मला दिसलें. हे लोक स्वातंत्र्यप्रेमी होते, मानवताप्रेमी होते, नैतिक मूल्यांचें महत्त्व जाणून त्यांना चिकटणारे होते, जग वांचवण्याची उतावीळी त्यांच्यांत होती, आणि एकूण मला ते औद्योगिक अवस्थेप्रत पोंचलेल्या आधुनिक समाजांतले सर्वांत अधिक माणुसकीनें जगणारे आणि कमींत कमी जडवादी लोक वाटले.

अशा प्रकारें मला प्रथमदर्शनी जाणवलेली मूलभूत विसंगति अमेरिकन जनतेचा आत्मा आणि भोंवतालच्या औद्योगिक सुधारणांच्या उपऱ्या चौकटीचे कायदे यांत होती आणि ती स्पष्ट होती. आणि केवळ विसंगतीच नव्हे तर या दोन गोष्टींत मला संघर्ष भासला. या संघर्षांपोटची तंगी जाणवली. जनतेचा 'आत्मा' या चौकटीच्या अमानुष कायद्याविरुद्ध अत्यंत धीमेपणानें परंतु निश्चितपणानें एक बंड, प्रतिकार चालवीत होता असें वाटलें.

आणि मग एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण झाला. चौकट विरुद्ध माणसें यांच्यांतल्या या संघर्षाचा निकाल काय होणार ? अमेरिकेविषयींच्या माझ्या पहिल्या प्रतिक्रियेचा हा दुसरा मूलभूत भाग.

अर्थात् या माझ्या पहिल्या प्रतिक्रियेमुळें एकूण परिस्थितीला फार ढोबळ आणि नाट्यमय स्वरूप आलें हें खरेंच; परंतु मला वाटतें मूलतः तें खरेंही होतें. मी अमेरिकेला आलों १९३२ मध्यें. थिओडोर रूझवेल्टच्या कारकीर्दीबरोबर अनेक वर्षांमागें सुरूं झालेल्या वेधक इतिहासाला फार मोठें वळण मिळण्याचा तो काळ.

आणि मग जसजशीं वर्षें जात गेलीं तसतसें माझ्या मनांतल्या प्रश्नाचें उत्तर मला मिळत गेलें. माणसांचा आत्मा चौकटीच्या अमानुषतेवर हळू हळू कडी करीत असून चौकटीचे यमनियम कणाकणानें फोडीत आहे असें मला दिसलें.

वेगळया शब्दांत, एकंदरीनें अमेरिकन माणसें आणि अमेरिकन समाजाचा आत्मा आजच्या आपल्या आधुनिक औद्योगिक संस्कृतीवर उत्तरोत्तर आणीत असलेल्या मौलिक, प्रभावी, पूर्णपणें उत्स्फूर्त दडपणामुळें औद्योगिक युगाची अंतर्गत यंत्रणा आणि त्याचे अपरिहार्य ऐतिहासिक

प्रवाह यांत फार मोठा बदल घडत आहे. या युगाचें भांडवलशाही-पलिकडलें एक स्वरूप अस्तित्वांत येत आहे. अशा प्रकारें या औद्योगिक युगाच्या पहिल्या ऐतिहासिक अवस्थेंत वर्तविण्यांत आलेल्या त्याच्या वर्मांवरच विजय संपादन करून जवळ-जवळ नकळत अमेरिकन लोकांनीं आधुनिक सुधारणांच्या या काळांत एक नवें प्रबोधन सुरूं केलें आहे.

इथें मी हा मुद्दा फक्त उल्लेखून ठेवीत आहे. पुढल्या एकाद्या प्रकरणांत त्याचें अधिक विवेचन करीन.

• • •

## इतिहासापासून सुटका

माझ्या पहिल्या प्रतिक्रियेचा आणखी एक भाग या प्रकरणाच्या नांवांत मी सुचवला आहे.

न्युयॉर्कला प्रथमच आलों त्यावेळीं, इतिहासाच्या लगामापासून आपण इथें मुक्त आहोंत या कल्पनेनें मला भारी उत्साह आणि उल्हास आला होता. ऐतिहासिक परंपरा या नांवाखालीं ओळखल्या जाणाऱ्या जुन्या घटना, जुने हेवेदावे, जुन्या खोडी, जुने आदर्श आणि जुन्याच व्याधि यांच्या कुबट वातावरणांत आयुष्यभर श्वासोच्छ्वास करीत गुदमरलेल्या युरोपीय माणसाला अमेरिकेच्या पहिल्या भेटींतच एक विमुक्त धुंदी चढते, नव्या स्वातंत्र्यापोटीं एक प्रकारचा विलक्षण उल्हास येतो, आणि कसें हलकें फुलकें, फुलपांखरासारखें होऊन जातें. काय करावें, कसें करावें याचें बंधन नाहीं. कसल्या चाकोऱ्या नाहींत, मळवाटा नाहींत. तुम्ही चालतां तीच वाट.

अर्थात् खरें तर, इतिहासापासून मुक्त झालों ही कल्पना आभासात्मकच. इतिहास कोणाला झटकून टाकतांच येत नाहीं. परंतु असा भास तरी प्रकर्षानें व्हावा ही गोष्ट, मला वाटते, एकच सुचवते. या देशाचा मोहरा भूतकाळाकडे नसून पूर्णतया भविष्यकाळाकडे वळलेला आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणांत भविष्यकालानें सारें राष्ट्र आपल्याकडे खेंचून घेणें,

ओढून घेणें आणि तसें तें राखणें, ही माझ्या मतें मानवी इतिहासांतली मोठीच नवलाई आहे आणि अमेरिकेच्या महात्म्याचा हाही एक महत्त्वाचा भाग मानला पाहिजे.

आपल्या स्वतःच्या परंपरेपासून, इतिहासापासून आपल्याला सुटका नाहीं. उलट, फार मोठ्या प्रमाणावर आपण या गोष्टींना जखडलेले आहोंत. इतकें कीं जिवापलिकडे घस सोसून आपण आपलें वसाहतींचें जुनें 'फर्निचर' कवटाळून ठेवतों, अठराव्या शतकांत असल्याप्रमाणें चालणारीं आणि वाटणारीं खेडीं आपण मोठा खर्च करून तशींच जपत रहातों. परंतु एका अर्थानें तुम्ही अमेरिकनांनीं तुमच्या युरोपीय पूर्वजांच्या बऱ्या वाईट ऐतिहासिक वारशापासून खरेंच मुक्तता साधली आहे. तुमच्या खुषीनें तुम्ही इतिहासापासून अलग झालांत. प्रत्येक पाश्चिमात्य माणसाप्रमाणें कांहीं ना कांहीं प्रमाणांत युरोपच्या इतिहासावर तुम्ही विसंबून आहां, परंतु हा इतिहास हा खरोखरी तुमचा इतिहास-पूर्व इतिहास आहे.

आणि तुमचा इतिहास, राष्ट्र म्हणून, जनता म्हणून इतिहास फार छोटा, अगदीं अलिकडला आहे. फार तर तो दोनशें वर्षें मागें पोंचेल. त्यासंबंधांत अद्याप तुमच्या जाणीवा बोथटल्या आणि नजर मेली नसून तुमचा हा देश घडविणाऱ्या तुमच्या पूर्वजांची हांक तुम्हांला अद्याप थरार आणते, उचंबळविते, स्फूर्ति देते. (सामान्य फ्रेंच माणसाच्या दृष्टीनें Declaration des Droits del' Homme हें आतां जुनेंपुराणें चिटोरें झालें आहे. परंतु तुमच्या दृष्टीनें तुमचा Declaration of Independence—स्वातंत्र्याचा जाहीरनामा-जणूं परवां, पन्नासच वर्षांमागें लिहिला गेला आहे.)

या अर्थानें—आणि फक्त याच अर्थानें—अमेरिकन लोक 'बच्चे' आहेत. एकीकडे ते उसळत्या तारुण्याचा उपभोग घेतात, मोठ्या थोरल्या भविष्यकालाकडे पाहून निर्भर असतात, ॲरिस्टॉटलच्या भाषेंत सांगायचें तर 'यौवनाच्या सुमना 'चा आस्वाद घेतात. दुसऱ्या बाजूनें, राष्ट्र म्हणून असावी लागते ती एकप्रकारची सामुदायिक, एकच एक जाणीव, अनुभूति त्यांच्याकडे अभावानेंच दिसते. एवढ्या बाबतींत इतिहासाचा दीर्घ वारसा सांगणाऱ्या जुनाट जगापेक्षां अमेरिका निःसंशय कमी भरते. परंतु या

वारशापोटींच जुन्या जगाला वेळोवेळीं भारी किंमत द्यावी लागली आहे हेंही खरें.

इतिहासापासून मुक्त होणें या आभासात्मक परंतु परिणामकारक भावनेपोटीं आणखी एक गोष्ट मी सांगेन—आणि तिचा संबंध अमेरिकन समाज आणि मार्क्सिस्ट तत्त्वज्ञान यांच्यांतल्या मूलभूत विरोधाशीं आहे. तुम्हांलाही माहीत असेल कीं मार्क्सच्या दृष्टीनें इतिहास म्हणजे अनेक लहान मोठ्या गरजांची भली मोठी आणि भयंकर सांखळी आहे. या सांखळींत गुरफटून माणूस त्याच्या अंतिम मुक्तीकरता अखंड कष्टत, राबत असतो. कम्युनिझमद्वारें एकदां का त्यानें स्वतःच्या इतिहासावर मांड रोवली कीं मग पूर्वीं त्याची पिळवणूक आणि चिरडणूक करणारा अवजड, राक्षसी रथ किंवा गाडाच तो स्वतः हांकूं लागतो. अमेरिकन समाजाची गोष्ट फार वेगळी आहे. त्याला रथाचें सूत्रचालकत्व करण्याची इच्छा नसते. त्यानें मुळीं चिरडणुकीचा रथच नाहींसा केला आहे. त्याला उंचवरच्या एकाद्या देवरूप मानवसमाजाच्या ध्येयाचीही ओढ नाहीं कीं ऐतिहासिक गरजांवर प्रभुत्व प्रस्थापित करण्याचीही ईर्षा नाहीं. माणसाच्या आजच्या स्वातंत्र्याचें त्याला सारें कौतुक आहे, मोल आहे. आणि डायोजेनिसनें चालतां चालतां गति सिद्ध केली तसें तो हें स्वातंत्र्य चालता चालता प्रस्थापित करतो. एका अर्थानें, त्याचा इतिहास त्याच्या मागें असतो. तो इतिहासापुढें चालतो, चाल करून जातो, आणि अमेरिकेंतल्या रस्त्यांतून नित्य पहायला मिळणाऱ्या मिरवणुकांप्रमाणें गाजावाजा करीत, मिरवीत मिरवीत पुढें धांवतो.

• • •

## अमेरिकन आधिभौतिकवादाची कवि-कथा

या देशांत आल्या आल्या झालेल्या माझ्या पहिल्या प्रतिक्रियेविषयीं मी सांगितलें. त्यानंतर कालमानानें आणि दिवसगतीनें मला आणखीही खूप कांहीं कळलें आहे, उमगलें आहे. केवळ दोन शतकांच्या काळांत एक नवें जग उभें करण्याकरतां, एका अवाढव्य खंडाच्या

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वागत.
अनुक्रमांक 28091C
दिनांक 15/12/60

निम्म्या भागाला स्वतंत्र माणसांना साजेशी भौतिक आणि नैतिक साधनसामुग्री उपलब्ध करून देण्याकरतां, खरोखरी वेगळी आणि उजवी अशी, माणसांना चकित करील, काबीज करील, मोहून टाकील अशी मानवी संस्कृति उभारण्याकरता खर्ची पडलेल्या मानवी प्रयत्नांची महत्ता मला कळून आली आहे.

आणि अशा प्रकारें साध्य करण्यांत आलेल्या हेतूंविषयीं आणि हे हेतु अधिकाधिक साध्य करण्याच्या आपसूक चालू असलेल्या क्रियेविषयीं मला अधिकाधिक कौतुक वाटूं लागलें आहे.

मी आधींच म्हटलें कीं, औद्योगिक अवस्थेप्रत पोंचलेल्या आधुनिक समाजांशीं, राष्ट्रांशीं तुलना करता अमेरिकन समाज हा कमींत कमी आधि-भौतिक-वादी आहे. १९४५ मध्यें रोमकडे निघण्यापूर्वी एका निरोप समा-रंभाच्या प्रसंगीं मी म्हटलें होतें तोच मुद्दा मला आवर्जून इथेंही सांगितला पाहिजे. युरोपांतले अनेक महाभाग स्वतः भौतिक गोष्टींकडे बिलकुल दुर्लक्ष न करता वा त्यांचा उपभोग यत्किंचितही न टाळता, वर या देशावर तथा-कथित 'आधिभौतिकवादा'चा आरोप करीत असतात. माझ्या दृष्टीनें इतकी उबग आणणारी गोष्ट दुसरी नसेल. अमेरिका 'आधिभौतिकवादी' असल्याच्या या कवि-कथेचा प्रभाव एवढा वाढला आहे कीं एकेकदां आपणही तिला बळी पडतों. न्युयॉर्कमधल्या कांहीं महिला एकदां मला मनापासून म्हणाल्या होत्या कीं, "आम्ही अगदींच आधिभौतिकवादी राष्ट्र आहोंत, नाहीं हो ?" मला विचाराल तर अमेरिकन आधिभौतिकवादाचा हा सारा बोलवाला खुळचटपणाचा आणि बदनामीकारकही आहे.

अमेरिकेविषयींच्या या 'कवि-कथे' चें अधिक संशोधन करूं गेल्यास कांहीं जास्त उमगूं लागतें. माझ्या अनेक युरोपीय मित्रांच्या मनांत ही 'कवि-कथा' रुजली आहे ती एका जुन्या पूर्वग्रहांतून. आणि या पूर्वग्रहाच्या बुडाशीं आध्यात्मिकता आणि एकूण (विशेषतः आपण सोडून इतरांना उपलब्ध होणाऱ्या) भौतिक सुधारणांविषयींची संपन्न वर्गांत आढळणारी तुच्छता यांतला गोंधळ आहे. बाकी बाबतींत ही 'कवि-कथा' (अमेरिकेच्या कांहीं निर्यात मालानें, विशेषतः सर्वसामान्य चित्रपटांनीं वर वर दुजोरा मिळणारी) युरोपांत खरी मानली जाते ती स्वतः युरोपनें सोस-

लेल्या निराशांची आणि अपेक्षांच्या चुराड्याची एक प्रकारें भरपाई म्हणून आणि दुसऱ्याच्या ऋणांत रहाण्याच्या भावनेमुळें मानवी मनाला सतत जाणवते त्या व्यथेंत एक सांत्वन म्हणून. आणखीही कांहीं कारणें सांगता येतील. त्यांतलें एक : जरूर त्याहून टोलेजंग अपेक्षा बाळगल्यानंतर तुमच्याकडून सहाजिकच झालेल्या अपेक्षाभंगांतूनही ती उद्भवलेली, दृढमूल झालेली सांपडते. युरोपीय जनता तुमच्याकडून एकेकदां एकाद्या जाणीवेची अपेक्षा ठेवते आणि कांहीं वेळा ही जाणीव त्यांना आढळत नाहीं तेव्हां अपेक्षाभंग अपरिहार्य असतो.

इतर अनेक औद्योगिक दृष्ट्या प्रगत राष्ट्रांप्रमाणेंच अमेरिकेंतही, सामुदायिक जाणीवेचे मोठे भाग—बहुधा वरवरचेच आणि बिनमहत्वाचे—आपल्या या आधुनिक मानवी सुधारणा आणि संस्कारांच्या चौकटींतून अपरिहार्यपणें निघणाऱ्या दर्पानें दूषित झालेले सांपडतात, हें मला नाकारायचें नाहीं. उदाहरणार्थः प्रत्येक गोष्ट आंकडेशास्त्रानें आणि कागदी पुराव्यानें अगर यश, उपभोगमूल्य, व्यावहारिक सामर्थ्य, या निकषांवर मोजण्यामापण्याची एक प्रवृत्ति. विचार वा कल्पना एकाद्या 'गिऱ्हाइका'ला 'विकण्या'चा माल मानण्याची प्रवृत्ति. त्याचप्रमाणें मानवी चालचलणुकीला 'हार्मोन्स'चा वा आर्थिक परिस्थितीचा एक बिनमहत्त्वाचा भाग समजण्याची प्रवृत्तीही—हा सारा प्रत्यहीं ऐकूं येणारा कर्कश कोलाहल कानांआड करणें शक्य नसतें.

एकादा अभ्यासू माणूस यांत फसण्याची शक्यता फार, हें मान्य केलेंच पाहिजे. विशेषतः लोक जेव्हां त्यांच्या आयुष्यांतल्या उद्दिष्टांबद्दल, ध्येयांबद्दल बोलतात, त्यांच्या राजकीय आवडीनिवडींची चर्चा करतात, तेव्हां, किंवा दिसणाऱ्या अनेक दृश्यांनीं, ऐकूं येणाऱ्या भाषेनें हे गैरसमज उद्भवले, वाढले तर नवल नव्हे. भाषेचा उल्लेख यांत केला त्याचें कारण, आपल्या दैनंदिन व्यवहारांत आपण वापरतों ती भाषा देखील मेंदूला कमींत कमी कष्ट पडतील अशाच हिशेबानें जणूं बेतलेली असते. तरीही, सर्वभरच प्रसृत होणारें हें भुरटें, लोकांना मानवणारें व्यवहारवादी तत्त्वज्ञान—

ज्याला या देशापुरती इथल्या उपयुक्ततावादी नैतिक प्रेरणेनें अधिक वैचारिक योग्यता आणि सामर्थ्य प्राप्त करून दिलें—तें मी म्हणतों त्या आधिभौतिकतेच्या सांथीचें स्वरूप अधिक भरीव आणि घातकच करूं शकेल.

हें सारें मी नाकारीत नाहीं; मी इतकेंच म्हणतों कीं तथा-कथित अमेरिकन आधिभौतिकवादाचा पुरावा म्हणून या गोष्टी पुढें आणणें मूर्खपणाचें आहे. कारण, पहिली गोष्ट म्हणजे या गोष्टी वैशिष्ट्यानें 'अमेरिकन' बिलकुल नाहींत. अगदीं अशाच गोष्टी औद्योगिक सुधारणा आणि त्यापोटचे फायदे तोटे यांच्या वातावरणांत जगणाऱ्या कोठल्याही (विशेष करून युरोपांतल्या) समाजांत सहजीं दाखवून देता येतील. एकच कीं इथें माणसें त्याबद्दल ज्या रोखठोकपणें आणि पाचपेंच न ठेवता बोलतात तितक्या प्रमाणांत इतरत्र बोलत नसतील. इतरत्र माणसांची भाषा एवढ्यापुरती सावधपणाची आणि चातुर्याची तरी असते किंवा ठरवून एक प्रकारचा अश्रद्ध उपहास तिच्यांत आणलेला असतो.

दुसरें म्हणजे, या एका अंगापलिकडे आणखीही अनेक याविरुद्ध अशीं अंगें इथल्या समाज-मनाला आहेत आणि त्यांवरून या समाजमनाची सखोलता आणि उच्च कसच सिद्ध होतो. शिवाय असें कीं हीं इतर अंगें, वैशिष्ट्यें प्रकर्षानें 'अमेरिकन' आहेत—अमेरिकन आधिभौतिकवादाचा फुगा तीं फोडून टाकतात.

मी या देशाविषयींच्या युरोपीय टीकाकारांना एकच गोष्ट विचारीन कीं, आधिभौतिकवादाचे त्यांचे निकष काय ? आधिभौतिकवादी, जडवादी कल असलेल्या मनाचीं लक्षणें ते औदार्य आणि सदिच्छा हींच मानतात काय ? एकाद्या दुसऱ्या व्यक्तीचाच विचार न करता सर्वसाधारण समाज-मनाच्या प्रवृत्तींचा आणि रीतींचा विचार करता मी असें म्हणेन कीं अमेरिकन समाजाचीं मूलभूत वैशिष्ट्यें औदार्य, सदिच्छा आणि मानवी बंधुभावाची जागृत जाणीव हींच होत.

अमेरिकेंतही, इतरांच्याप्रमाणें, कांही दर्पयुक्त माणसें निघतील. परंतु

याचा अर्थ अमेरिका तशी आहे असा नव्हे; एकूण अमेरिकन मनाला अहंकार लज्जास्पद वाटतो.

इतरांच्याप्रमाणें अमेरिकेंत पैशांची आणि सुखाची लालसा असलेलींही माणसें निघतील. परंतु अमेरिकन समाज त्या प्रकारचा नाहीं.

या आधुनिक जगांत पैशांचें महत्त्व अमेरिकन समाज कमी वा जास्तही लेखीत नाहीं. या महत्त्वाची अमेरिकन माणसाच्या तोंडची प्रांजल कबुलीही युरोपीय माणसांना अस्वस्थ करते. सर्वसामान्य युरोपीय माणूसही पैशांकरता धडपडतोच; परंतु तो ही गोष्ट लपवूं पहातो. कारण त्याला संवय आहे पैसा आणि पिपासा यांत सांगड मानायची.

या उलट या देशांत पैशांसाठीं धडपड चालते ती उघड उघड. पैशाचा विचार चालतो तो न लाजता. कारण पैसा या देशांत एक साधन मानला जातो. तो राखण्यापेक्षां खर्च करण्याकरतांच असतो हा खर्च ज्यानें त्यानें आपलें जीवन सुधारण्याकरतां करायचा असतोच; तसेंच आपल्या स्वातंत्र्याच्या वाढीकरताही करायचा असतो—परंतु त्याचबरोबर इतरांचेंही जीवन सुधारण्याकरता आणि इतरांचें स्वातंत्र्य वाढवण्याकरता तो करायचा असतो, या गोष्टीला या देशांत एक मूलभूत महत्त्व आहे.

अमेरिकनांना दानाची हौस आहे. देणें त्यांना आवडतें. सार्वजनिक कल्याणार्थ देण्यांत येतात त्या देणग्यांवर आणि खर्च होणाऱ्या रकमांबाबत अमेरिकेंत करमाफीचा एक कायदा आहे हें खरें; परंतु हा कायदा तरी झाला तो राज्यकारभार चालविणाऱ्या माणसांना अमेरिकन समाजाच्या निःस्वार्थ दानप्रियतेबाबत असलेल्या विश्वासांतूनच. केवळ मोठीं 'फौंडेशन्स'च नव्हेत, (याबाबत माझ्या कांहीं मित्रांकडून मी सक्त टीका ऐकली आहे. एकादें उत्तम प्रकारचें समाजोपयोगी कार्यही एकेकदां या संस्थांच्या देणग्यांकरतां संवयीनें ताटकळत रहात असतें असें म्हणतात. प्रत्येक चांगल्या गोष्टींत उणीवा या असणारच. आणि त्या जमेला धरूनही माझ्या मतें हीं सरकारी यंत्रणेपासून सर्वस्वीं अलिप्त असणारीं, स्वातंत्र्यांतून निर्माण झालेलीं 'फौंडेशन्स' या आधुनिक युगांत फार उदात्त आणि मौलिक कार्य बजावीत आहेत असेंच मला वाटतें.) तर इतर सर्वसामान्य अमेरिकन संस्था आणि खाजगी मंडळेंही हेंच

दाखवून देतात कीं समाजकल्याणार्थ आपलें धन वापरणाऱ्या सेवारत नागरिकाची—civis praeclarus—पुरातन ग्रीक आणि रोमन कल्पना अमेरिकेच्या समाज-मनाचा एक मोठा आणि अपरिहार्य भाग होऊन राहिली आहे. यांतही माझ्या नजरेला आलेली एक गोष्ट सांगितली पाहिजे ती अशी कीं, या संबंधित देणग्या—हा दानधर्म—केला जातो तो बहुतांशीं शिक्षणार्थ आणि ज्ञानार्जनाच्या एकाद्या मोठ्या कामाकरतांच होत असतो. कॉलेज-शिक्षण ज्यांना उपलब्ध होऊं शकलें नाहीं असे नागरिक अनेकदां विश्वविद्यालयांना मोठ्या देणग्या देतांना दिसतात.

अमेरिकन समाजांत केवळ मानवी बंधुभावापोटच्या सहाय्याचे, आश्चर्य वाटावे असे, कितीतरी नमुने प्रत्यहीं घडतांना आढळतात. तसेंच अमेरिकन माणसाच्या मनांत इतर माणसांविषयीं, विशेषतः विदेशीय आपद्ग्रस्तांविषयीं, जात्याच एक प्रकारची कळकळ, एक आंच वास करीत असलेली जाणवते. माझ्या मतें आधिभौतिकतेंत या गोष्टी बसणार नाहींत.

युद्धकाळांत युरोपीय विद्वानांच्या पुनर्वसनार्थ या देशांत स्थापन झालेल्या समित्यांचें कार्य मी माझ्या डोळ्यांनीं पाहिलें आहे आणि तें मी कधींही विसरणार नाहीं. या समित्यांतर्फे मेजवान्या होत त्यांना गर्दीनें हजर राहून नंतरच्या लिलांवाच्या वेळीं खिशांतून मोठे मोठे चेक्स सहजतेनें काढणारीं माणसें मला माहीत आहेत. त्यावेळचे समाजविषयक संशोधनाच्या विद्यालयाचे अध्यक्ष आल्विन जॉन्सन यांनीं ज्या कौतुकास्पद कळकळीनें हें काम चालवलें होतें ती कळकळही मला विसरणें शक्य नाहीं. आमच्या नवीन निघायच्या फ्रेंच भाषिक E'cole Libre des Hantes E'tudes ला त्यांच्या विद्यालयाच्या जागेंत स्थान देऊन वेळोवेळीं त्यांनीं अत्यंत आपुलकीनें इतरही सहाय्य केलें.

अमेरिकन दानधर्म कमीअधिक सामान्य माणसांच्या खिशांतल्या थोड्या थोड्या अंशावर चालतो; बहुधा यामागला हेतु एकाद्या चांगल्या विदेशीय कामाला सहाय्य करण्याचा असतो. आणि अशा कामांकरतां दरसाल एवढ्या मोटमोठ्या रकमा खर्चीं पडतात कीं आंकडेशास्त्र्यांच्या मतें अमेरिकेंतल्या मोठ्यांत मोठ्या उद्योगधंद्यांत दानधर्म या उद्योग-

धंद्याचा क्रम दुसरा, फार तर तिसरा लागतो. या वस्तुस्थितींत आधि-भौतिक वाद वगैरे बिलकुल नाहीं.

मला कल्पना आहे कीं या वस्तुस्थितींतच असा एक धोका संभवतो कीं दानधर्माच्या या उद्योगधंद्यालाच एकादे वेळीं 'औद्योगिक' स्वरूप येईल किंवा जरूर त्याहून अधिक संघटित आकार येईल. परंतु मला वाटतें अंडीं उबवायला बसणाऱ्या कोंबडीप्रमाणें पैसे उबवणारे अनेक धनिक महाभाग तसें होऊं नये म्हणून योग्य ती खटपट आणि व्यवस्था करतीलच–आणि समजा कीं गरजू आणि निराधारांकरता पैसे जमवण्याचें हें काम इथें इतकें चांगल्या प्रमाणांत संघटित झालें कीं ठरल्याप्रमाणें आपापल्या देणग्या यांत्रिकपणें देतांना आमचीं हृदयें देण्याच्या जबाबदारींतून आमची कायमची मुक्तता झाली, (आणि युरोपांत जशा कांहीं हृदयें देऊं करणाऱ्या लोकांच्या गर्दीनें आळया गच्च भरून जात असतील!) तरी एक गोष्ट विसरून चालणार नाहीं ती ही कीं रोज, दैनंदिन जीवनाच्या रगाड्यांत आधींच येथें प्रत्येकजण आपल्या शेजाऱ्याला होईल तितकें सहाय्य करीत असतो आणि एकाद्या विशिष्ट आपत्तींत सांपडलेल्यांकरतां किंवा विशिष्ट सामाजिक संघर्षांचे बळी ठरलेल्यांकरतां प्रत्यहीं अनेक मंडळें आणि समित्या अखंड राबत असतात, नवनवीन अस्तित्वांत येत असतात.

आतां इतर कांहीं अमेरिकन वैशिष्ट्यांकडे वळूं. यांतलें एकः नवनवीन समस्यांना आणि परिस्थितींतल्या कितीही आकस्मिक बदलांना तोंड देण्यांतली अमेरिकन जनतेची खुबी आणि प्रगल्भता आहे. अशी परिस्थिति ते कधींही मान्य करणार नाहींत, माणसांनीं प्रवाहपतित असणें वा असहायपणें जगणें त्यांना कदापि पटणार नाहीं. परिस्थितींत इष्ट बदल घडवण्याचा त्यांचा सतत प्रयत्न असतो. नवीन कांहीं मार्ग, नवनवीन साधनें, नवा उपाय, नवीन सामाजिक चळवळ त्यांना प्रवाहांत सांपडलेल्यांकरतां, आपत्तींत अडकलेल्यांकरतां शोधून काढणें आवडतें. हेगेलच नव्हे का मानवी आत्म्याच्या 'अपार लवचिकपणा'बद्दल

म्हणाला होता ! या प्रकारचें धैर्य, चिकाटी म्हणजेच आत्म्याच्या जागरूकतेचा निरंतरचा पुरावा.

मी असें म्हणेन, आणि माझ्या दृष्टीनें हें फार वैशिष्ट्यपूर्णही आहे, कीं अमेरिकेंतल्या एवढ्या भल्या थोरल्या लोकसंख्येंत खुरटलेपणाचें चिन्ह कुठें नाहीं. यामुळेंच अमेरिका मला भूखंड न वाटता एक मोठा सागर, अथांग महासागर वाटतो. कधीं कधीं वादळ होतें, एक भला दांडगा प्रवाह चळावतो, प्रचंड लाट उसळते, वाटतें कीं ही अवकाशाला गिळणार. पण थांबा ! पुन्हां नवा प्रवाह बळावतो, नवी लाट उसळते आणि ती आधींच्या लाटेला होती कीं नव्हती करून टाकते. असा हा महान देश, सागराप्रमाणें सतत बदलत्या वाऱ्यांवर झुलणारा. ( या जागीं मी असें सुचवेन कीं भिन्न आणि विरुद्ध प्रवाहांकडे, संघर्षांकडे, विरोधाकडे, कमी अधिक अवास्तव पण चांगल्या योजनांकडे सरकारी प्रचारांत उपेक्षेची भूमिका घेण्यांत येते तितकी ती न घेतली गेली तर तें फार उपकारक होईल. )

अमेरिकन समाजाच्या या सतत बदलणाऱ्या द्रव–सदृश गुणामागें fluidity मागें– समाजमनाच्या दैनंदिन व्यापारांचा भाग फार मोठा आहे.

आणखीही इतर कांहीं वैशिष्ट्यें सांगता येतील. प्रथम उल्लेखावी लागेल अमेरिकन माणसांची नैतिक आणि धार्मिक मूल्यांविषयींची कदर. नैतिक मूल्यांचें मूळ त्या आत्म्याविषयींची त्यांची कदर. मी असें म्हणत नाहीं कीं ते आत्म्याच्या सांगीबरहुकूम प्रत्यहीं वागतात—असें कोणत्या राष्ट्राबद्दल म्हणता येईल ? मला म्हणायचें तें एवढेंच कीं आत्म्याला अपराधाची टोंचणी असली कीं त्यांना मोठें केविलवाणें होऊन जातें आणि कशांत म्हणून जीव रमत नाहीं. भयंकर अशांतता वाटते. नैतिक चुकीचा वा गल्लतीचा केवळ संभ्रमही त्यांना व्यथित करतो. आणि मग घडतें तें जगाला नवलाचें वाटतें. हिरोशिमा प्रकरणानंतर जपान्यांबद्दल इथें एक जिव्हाळा उचंबळला तो या प्रकारचाच. त्यांच्यांतल्या अट्टल राजकारण्यांना देखील मदतीकरतां सैतानाला सखा

करणें मानवणार नाहीं. या देशांतल्या सर्वसाधारण जाणीवेला अश्रद्धेचा तिटकारा आहे आणि अश्रद्ध त्यांना होतांच येणार नाहीं.

दुसरा मुद्दा म्हणून मोकळ्या वैचारिक देवाणघेवाणीचें या देशांतलें स्थान निर्देशिता येईल. यांत मतभेद बाळगण्याचा हक्क अभिप्रेत आहे. या हक्काविना स्वतंत्र माणसांना सामुदायिक जीवनच असूं शकत नाहीं आणि कोणत्याही ऐतिहासिक घडामोडीमुळें हा हक्क या देशांत फार काळपर्यंत नियंत्रित वा रद्द राहूं शकत नाहीं. सर्वत्र, अमेरिकन जीवनाच्या प्रत्येक भागांत आत्मनिरीक्षणाची, आत्मटीकेची धडपड सतत चालू असते. सत्य शोधण्याची अदम्य तळमळ असल्याविना ही धडपड चालूच शकत नाहीं. आणि सत्याचा असला अव्याहतचा शोध शुद्ध जडवादी वा आधिभौतिकवादी मनोरचनेंत बसत नाहीं.

तिसरा मुद्दा म्हणजे शैक्षणिक क्षेत्रांत मानवी मूल्यें, दानाची प्रवृत्ति, तत्त्वज्ञान यांच्या विकासासाठीं आणि विद्वत्ता हेंच अंतिम उद्दिष्ट मानलें जावें म्हणून एक मोठी झुंज चालली आहे; या झुंजीची चांगली कल्पना इथें अनेकांना असेल. या तथाकथित 'आधिभौतिकवादी' देशांत कोणत्याही कॉलेजांतला छोटा मोठा प्राध्यापक त्याच्यावर सोंपवण्यांत आलेल्या शैक्षणिक वारशाची बौद्धिक प्रत खालावूं नये म्हणून सतत खपत असतो, व्यासंग करीत असतो. उद्योगप्रधान संस्कृतींत अपरिहार्य ते ' ओव्हर स्पेशलायझेशन ' आणि तंत्रशाहीचे धोके उद्‌भवूं नयेत म्हणून आतांच विश्वविद्यालयांचे आणि तांत्रिक संस्थांचे प्रचंड प्रयत्न चाललेले असतात. आणि रॉबर्ट एम. हचिन्स यांच्या योग्यतेच्या सुधारकाग्रणीनें या बाबतींत वारंवार अत्यंत कटु शब्दांत आपलीं मतें मांडून बौद्धिक एकात्मतेच्या आवश्यकतेचें जोरदार प्रतिपादन केलेलें आहे, एक प्रकारें मी म्हणतों त्या शैक्षणिक क्षेत्रांतल्या व्यापक उपक्रमाची स्फूर्ति दिली आहे आणि त्याला थोडीफार गतीही दिली आहे. अर्थात विश्वविद्यालयीन वर्तुळांतून त्यांच्या नांवाचे आवर्जून उल्लेख होण्याचें कारण नसतें, इतकी त्यांची प्रसिद्धि आधींच आहे.

चौथा मुद्दा: ज्ञानाची पिपासा, हांव. म्हणजे केवळ व्यावहारिक उपयुक्ततेच्या दृष्टीनेंच नव्हे तर मानवी मनाची एक मोठी गरज म्हणून.

देशभरच्या अमेरिकन तरुण वर्गांत ही पिपासा, हांव मी वर्षानुवर्षें पहात, अनुभवीत आलों आहे. एकंदर अमेरिकन समाजांतही–सुशिक्षित आणि अशिक्षित–या तहानेचा प्रत्यय येतो. इतरत्र निर्माण केली जाते तशी ही शिक्षणानें आणि शिक्षकांनीं निर्माण केलेली नसते. (एकेकदां तर ती मारण्याचाच प्रयत्न या दोहोंत स्पष्ट जाणवतो.) इथें ही एक नैसर्गिक गरज आहे, आणि विशषतः अमेरिकन समाजांत ही फार मोठी आणि उत्कट नैसर्गिक गरज मानली जाते.

पांचवा मुद्दा असा कीं, आध्यात्मिक गोष्टींची अमेरिकन जीवाला मूलतःच एक आंस लागून राहिलेली असते. याच्या खुणा तरुण पिढींत विशेष प्रमाणांत पहायला मिळतात. बहुतांश माणसांत तिला जाणतें स्वरूप नसतें. भोंवतालची परिस्थिती आणि जगण्याची अखंड धडपड यांत ती सतत कमी अधिक दडपून, चिरडून गेलेली असते. आणि तरीहि ती असते हें खरेंच; प्रत्यक्षपणें ती माणसाच्या प्रत्येक व्यवहारांत कमजास्त प्रमाणांत गुंतत असते.

गेलीं अनेक वर्षें याची जाणीव मला आहे; आणि योग्य वेळीं हें मला आवर्जून सांगता आलें याचें मला फार समाधान वाटतें आहे. कारण त्यावेळीं हें कोणाला खरें वाटण्याजोगें नव्हतें.

सुमारें वीस वर्षांमागें लिहून काढलेल्या आणि दिलेल्या एका व्याख्यानांत—त्याचा विषय होता Action and Contemplation—मी म्हटलें होतें कीं, अमेरिकेंत आत्मिक विकासाच्या कार्याला फार वाव आहे. वर वर दिसतें तें धांवपळीचें आणि गोंगाटाचें जीवन अनेकदां केवळ संभाव्य दारुण निराशेवर आणि भ्रमनिरासावर उपाय म्हणूनच जगलें जातें. त्यांतही उच्च सुखशांतीच्या ओढीचा आणि जाणीवेचा पुरेसा पुरावा आहे. ही जाणीव आणि ओढ मला मोठमोठ्या ध्येयवादी उद्दिष्टांनीं ढवळून निघण्याच्या अमेरिकन स्वभावांत दिसत होती. आणि अखेरीला मी म्हटलें होतें: 'आधिभौतिकता किंवा भोगवाद हा केवळ अमेरिकेंत आहे असें नव्हे. ही कल्पना, हा विचार मुळांत युरोपांतला. पोस्ट-रिनाइझान्स आणि पोस्ट-रिफॉर्मेशन काळांतल्या युरोपांतला. या नव्या भू-खंडानें, राष्ट्रानें असे कांहीं जुने विचार, कल्पना विलक्षण

हिरीरीनें आणि निष्ठेनें उचलून त्याच्या भूमींत लावले आणि त्यांच्या कमाल मर्यादेपर्यंत राबवले, इथेंच आपला नेमका गैरसमज होत असतो. अमेरिकेंत एकदां कांहीं थोड्या समाजाला आध्यात्मिक जीवनाची महत्ता, आत्मिक विकासाची आवश्यकता चांगली पटली कीं मी म्हणतों तो वाव, एका मर्यादित स्वरूपांत का होईना, पण आपोआप स्पष्टपणें प्रतीत होईल आणि पुरेशा सामर्थ्यानें क्रमशः इथल्या परिस्थितीवर त्या पंथाचे इष्ट ते परिणामही घडूं लागतील. ”

टॉम मेर्टनचे आध्यात्मिक जीवनावरचे ग्रंथ इथें केवढ्या तरी मोठ्या प्रमाणावर खपतात, वाचले जातात, ही वस्तुस्थिती याचीच निदर्शक आहे. ‘ ट्रॅप ऑफ गेथ्समानी ’ या आध्यात्मिक पंथाचें येथलें अनुयायांचें प्रमाण युरोपांतल्या असल्या कार्याला किती तरी मागें टाकणारें आहे; वाढतेंही आहे. इतरही आध्यात्मिक पंथांची इथें एवढी चलती आहे कीं नवे सदस्य वारंवार जागेअभावी नाकारावे लागतात.

मला विशेष वाटणारे अमेरिकन जीवनाचे कांहीं भाग मी उल्लेखिले. असेच आणखीही मी सांगत राहीन. तथाकथित ‘ अमेरिकन आधिभौतिकवादा’च्या असल्या अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण गोष्टी सांगाव्या तेवढ्या थोड्याच.

यांत एकच गोष्ट मला अखेरीस नमूद करूं द्या. ‘ मोबी डिक ’ आणि ‘ स्कार्लेट लेटर ’ पासून ‘ लुक होमवर्ड, एंजल ’ आणि ’रिक्विएम फॉर अ नन’पर्यंत—एडगर ॲलन पो आणि एमिली डिकिन्सनपासून हार्ट क्रेन, ॲलन टेट आणि टी. एस. इलियटपर्यंत ( अनिच्छेनेंही हा अद्याप वैशिष्ट्यानें अमेरिकनच राहिला आहे. ) सारें अमेरिकन वाङ्मय निर्विकारपणें आणि काळजीपूर्वक तपासलें तर, त्यांत माणसाच्या गूढ आणि चिरंतन व्यथा–वेदनांचें व्यापक आणि खोल दर्शनच फार आहे. या वाङ्मयांत व्यक्त होणारा मानव फार अशांत आणि बेचैन आहे-त्याच्यांतल्याच कांहीं मूलभूत आणि अपरिहार्य नश्वर गोष्टींशीं त्याचा आंधळा, कित्येकदां केविलवाणा झगडा चालला आहे–आणि कुठल्याही प्रकारच्या भौतिकवादी सुखसमृद्धीच्या प्राप्तीनें तो थांबणें वा संपणें शक्य नाहीं.

• • •

## कांहीं मर्मस्थानें

कांहीं नाजूक बाबींची चर्चा आतां करूं या.

पहिली बाब–हें तसें मर्मस्थान म्हणता येणार नाहीं–आपल्या देशावर सर्वांनीं लोभ करावा ही अमेरिकन समाजाची आंस. प्रेमाचा, लोभाचा तो भुकेला आहे. माझ्या मतें हें माणुसकीचें आणि फार उदात्त लक्षण मानलें पाहिजे. ( ही आंस आपल्याला इंग्लिशमनमध्यें आढळणार नाहीं. फ्रेंचांबद्दल बोलायचें तर आधींच ते आपण सर्वांना आवडतों याबद्दल इतका विश्वास बाळगून असतात कीं त्यासाठीं वेगळी इच्छा ते बाळगणार नाहींत. परंतु आपला विश्वास उगींच आहे असें त्यांना कळलें तर मात्र त्यांना मोठाच धक्का बसतो. ) ही लोभाची, प्रेमाची राष्ट्रीय आंस म्हणजेच मानवी बंधुभावावरच्या उपजत विश्वासाची खूण. या देशाच्या एकूण जीवनांत तिचें स्थान फार महत्त्वाचें आहे.

परंतु अव्वल अमेरिकनाला—बहुधा तो निर्दोष मानतो त्या अमेरिकन जीवनपद्धतीकडे वारंवार दोषैक दृष्टीनें पहाण्याच्या विशेष इच्छेपोटींच—अमेरिकेवर कोणी लोभ करावा असें वाटतें तितकेंच तिचें दोषदिग्दर्शन कोणी करावें म्हणूनही वाटत असतें हें मी विसरलेलों नाहीं. परिणामीं, या देशांतल्या उणीवांवर, दोषांवर कठोर कोरडे ओढणाऱ्या कोणत्याही लेखकाचें कितीही अप्रिय म्हणणें इथें लोक विशेष मनःपूर्वक आणि एका विषण्ण रसिकतनें ऐकून घेतात. आणि या देशाची प्रशंसा करणारा लेखक इथल्या लोकांना फार चांगला मित्र वाटतो, परंतु त्याची गणना मात्र ' सॉफ्ट हेडेड ' म्हणून होते! अमेरिकनांचें देशप्रेम हें केवळ मेहरबानीखातरचें नसतें. तें एक दिव्य असतें, तें ' सतीचें वाण ' असतें. त्यांत कसली उणीव म्हणून आलेली अमेरिकन मनाला खपत नाहीं. फ्रेंच लोकही या बाबतींत असेच असतात; परंतु आपल्या फ्रेंच बांधवांचें केव्हां कुत्सितपणें तर केव्हां मजेनें उणें दुणें काढल्यावांचून रहात नाहींत. याउलट अमेरिकन्स अमेरिकेचे दोष ऐकतांना, काढतांना फार कष्टी असतात.

बोलण्याच्या ओघांत एक गोष्ट मला आठवते आहे. आपल्या अमेरिकन बांधवांबद्दल, विशेष करून अमेरिकन तरुण पिढीबद्दल बोलतांना माझा एक विद्वान मित्र मला म्हणाला होता, " They have no roots. " ( त्यांना पाळेंमुळें नाहींत. )

एक खरें कीं युरोपांतल्या अत्यंत पाजी माणसालाही ' रूट्स ' असतात. बऱ्या अगर वाईटाकरतां, एकाद्या जुन्या मानवी वारशाला तो चिकटूं शकतो, आपला म्हणूं शकतो. परंतु इथें, मला वाटतें त्याप्रमाणें, माणसाच्या जीवनांत एक अस्थिरता आहे, चंचलता आहे. आहे हें असेंच अखेरपर्यंत चालेल अशी उपजत खात्री माणसाला नसते. एखाद्या कार्याबद्दल मी हें म्हणत नाहीं, माणसांच्या व्यक्तिगत जीवनाच्या दिशेबद्दल, ध्येयाबद्दल, हेतूबद्दल मी हें म्हणतों आहे. चंचलता आणि अस्थिरता आहे ती त्याच्या मनांत.

म्हणूनच, अमेरिकन समाज-मनाच्या अनेक वैशिष्टयांत–बरेच अपवाद मान्य करूनच, अर्थात्–एक वैशिष्टयपूर्ण उतावळी आणि परिणामीं त्वरित निराशेची शक्यता आपल्याला जाणवते. मला जरा हें अधिक स्पष्ट करूं द्या. संबंधित उतावळीला मी वैशिष्टयपूर्ण म्हटलें. अमेरिकन माणसें ( गाडीची वाट पहात असतां अगर या अद्ययावत् जीवनांतल्या एकाद्या आकस्मिक गैरसोयीपोटीं वा सरकारी ' रेड टेप'च्या तावडींत सांपडून ) ताटकळतात तेव्हां फ्रेंच माणसांहून तीं निःसंशय अधिक सहनशीलपणें वागतात. या देशांतले स्त्रीपुरुष गैरसोयी, नुकसानी, आपत्ती अत्यंत धैर्यानें आणि प्रसंगीं अगदीं विलक्षण अशा विरक्तपणें सोसतात. आणीबाणीच्या वेळींही ते धीर सुटूं देत नाहींत, डगमगत नाहींत. परंतु तरीही एकंदर जीवनांत ते सहनशील मात्र नसतात.

सर्वसाधारणपणें त्यांच्या वैक्तिक जीवनांत त्यांना सहनशीलपणें, दमानें वागणें जमत नाहीं. हातीं घेतलेल्या कामाला वेळउशीर लागूं लागला कीं ते फार लौकर बेचैन, हताश होतात. अमेरिकन चित्रकार घ्या, अमेरिकन कलाकार घ्या, त्याला त्याच्या कामांत समाधान हवें तें झटपट हवें, कामाचें काय मिळायचें तें फळ लौकर हवें. त्याला धीर कसा तो निघत

नाहीं. याउलट फ्रेंच कलाकार घ्या. सेझान घ्या, रोनॉल्ट घ्या—चांगलीं तीस, चाळीस वर्षें जगानें त्यांची उपेक्षा केली. आणि तितकीं वर्षें ते जिद्दीनें दम काढून आपलें काम आपल्या पद्धतीनें करीत राहिले. अमेरिकन तरुणाला हा बहुतेक मगरूर हट्टीपणा ठरेल कीं काय याची भीति वाटेल. तसलें कांहीं करायला तो कचरेल. त्याला लौकर मान्यता लाभली नाहीं तर तो स्वतःविषयींच संशय घेऊं लागतो, निराश होऊं लागतो. त्याला वाटतें, आपल्याला कांहींच जमलें नाहीं.

मला उपस्थित करायचा असलेला तिसरा मुद्दा दुसऱ्या मुद्याशीं जुळणाराच आहे. हा मुद्दाः असुरक्षिततेची भावना. ही अर्थात् तशी उघडी पडत नाहीं कारण तिला कृत्रिम आशावादाचा मुखवटा असतो. समाजांत रीत म्हणून दाखवावा लागतो त्या अमेरिकन मुद्रांवरच्या उत्कट आणि भल्या थोरल्या आशावादी आविर्भावावर माझा फारसा विश्वास नाहीं. त्याखालीं बहुशः चिंता आणि असुरक्षिततेची भावना झांकलेली असते.

वस्तुस्थिति अशी कीं, जगांत जणूं पाप नाहीं, खलवृत्ति नाहीं, वाईट नाहीं आणि केवळ बरें तेवढें आहे असें **मानून** वागणें ही यामागली कल्पना असते. एके काळीं प्रत्यक्षांतच या स्वरूपाचें एक तत्त्वज्ञान या देशांत अस्तित्वांत होतें. युद्धानें तें खलास केलें. आतां अमेरिकन तरुणांना माहीत असतें कीं पाप आहे, खलवृत्ति आहे, मरण आहे, सैतानाचें अस्तित्व आहे. मी म्हणतों आहे ती असुरक्षिततेची भावना यांतल्या कोठल्याही जाणीवेनें बिलकुल कमी झालेली नाहीं.

मला अनेकांच्या मनांतल्या या असुरक्षिततेच्या भावनेचें, बेचैनीचें, दबलेल्या उताविळीचें महत्त्व कळत नाहीं असें नव्हे. या गोष्टींविषयीं मला आदर आहे, कारण माणूस स्वतःला फसवीत नाहीं, मानवी जीवनांतल्या गुंत्याची, या गुंत्यापोटच्या अनेकानेक व्यापक प्रश्नांची त्याला कल्पना आहे याचाच हा पुरावा. तरी पण मला असेंही वाटतें कीं अखेर तसा विचार केला तर, या गोष्टी पुरेशा ठाम आणि परिपूर्ण वैचारिक निष्ठांच्या अभावांतून उद्भवलेल्या आहेत.

तें कसेंही असलें तरी एक खरें कीं इथल्या समाजाला वारंवार कांहीं वैचारिक उत्तेजन पुरवावें लागतें. कांहीं हम्या द्याव्या लागतात. त्यांचेंच बरोबर आहे, विशेषतः त्यांच्या ध्येयात्मक आचारविचारांच्या बाबतींत आणि सदिच्छा आणि औदार्य या त्यांच्या निष्ठांच्या बाबतींत त्यांचें चुकत नाहीं एवढें त्यांना त्यांच्याच बांधवांच्या हमीनें वा अधिक वजनाच्या सयुक्तिक सिद्धांतांनीं पटवून दिलें जावें लागतें.

यालाच जोडून पुढें मी असें सांगेन कीं या देशाच्या सदिच्छा खऱ्या न मानण्याच्या आणि त्यासाठीं कांहींतरी अश्रद्ध, सस्तें समर्थन जोडण्याच्या युरोपीय (आणि आशियांतल्याही) देशांच्या पद्धतीनें अमेरिकेच्या जिव्हारींच चिमटा बसण्याचा संभव असतो.

शेवटचा चौथा मुद्दा असा कीं अमेरिकनांना त्यांच्या पद्धतीनें जगण्याला आणि वागण्याला त्यांची देशकालपरिस्थिति लागते. अमेरिकेंतल्या अमेरिकनांहून परदेशांतल्या अमेरिकनांची वर्तणूक खूप वेगळी दिसते त्यामागें बहुधा हें कारण असावें.

इटली आणि फ्रान्समध्यें या गोष्टीचा मी अभ्यास केला आहे. पॅरिसमधल्या माझ्या मित्रांचें असेंच मत पडलें. या देशांतलीं त्यांच्या माहितींतलीं माणसें त्यांच्या देशांत त्यांना तींच, तशींच वाटलीं नव्हतीं. वेगळेपणा स्पष्टपणें जाणवला होता.

एक तर अमेरिकन माणसें परदेशीं असतात तेव्हां जरा अस्वस्थच असतात. कुणाला भेटायला नाराज असतात. संकोची होतात. आणि परिणामीं मग त्यांच्यांत उर्मटपणा येतो. अशा वेळीं त्यांचे उमदे, उत्साही शिष्टाचार आणि रीतिरिवाज कोठें जातात? ते रहातात मागें, त्यांच्या मोठाल्या देशांत, घरीं. प्रत्येकाला देश सुटला कीं मनोमन पोरकें, अनाथ, निराधारच वाटूं लागतें. इतकें कीं माणूस त्याचा त्यालाही परका होतो.

• • •

## वर्ण-भेदाचा प्रश्न

कांहीं आदरणीय अशा नीग्रो असामींच्या स्नेहापलिकडे तसा अमेरिकेंतल्या वर्णभेदाचा प्रश्न मी माझ्या अनुभवांत फारसा अभ्यासलेला नाहीं. सांगोपांगी कळतें तेवढें मला कळलें आहे आणि तसें पुष्कळच कळलें आहे. शिवाय या प्रश्नाला ऐतिहासिक आणि समाजशास्त्रीय महत्त्व असल्यानें तो थोडक्या पानांत आवरणें जास्तच अवघड झालें आहे. खालचा मजकूर ही त्या प्रश्नाची चर्चा नव्हे, ते त्या प्रश्नाबाबतचे कांहीं विचारच मानले जावेत.

अमेरिकेंतल्या वर्णविषयक प्रश्नाबाबत एक सर्वसामान्य सत्य म्हणजे याबाबत बहुसंख्य गौरवर्ण लोकसंख्येची भावना आणि फेडरल कायदा यांत असलेला विरोध. लिंकनच्या वेळीं फेडरल सरकारनें गुलामगिरीला विरोध केला, अशा मर्यादेपर्यंत विरोध केला कीं त्यांतूनच एक भयंकर देशव्यापी यादवी पेटली, त्याचप्रमाणें आजचा फेडरल कायदा त्याच्या कक्षेंत येणाऱ्या प्रत्येक क्षेत्रांत साऱ्या नागरिकांत सामानता मानतो, वर्णावर आधारलेले भेदाभेद त्याच्या लेखीं बाद आहेत. आणि म्हणून जेव्हां जेव्हां गौरवर्ण बहुसंख्य लोक आणि कायदा यांच्या दरम्यान भांडण पेटतें तेव्हां तेव्हा मोठा पेंचप्रसंग उद्‌भवतो.

या प्रश्नाचे माझ्या मतें दोन भाग पडतात. नागरिक-हक्क आणि कायदेशीर वर्णविभागणी यांचा संबंध येणारा एक भाग; आणि व्यक्तिगत व्यवहारांतल्या वर्णविषयक पूर्वग्रहाशीं संबंधित असा दुसरा भाग.

कायद्यानें प्रस्थापित केलेली वर्णविभागणी सामाजिक जीवनांच्या सर्व अंगोपांगांतल्या तिच्या विविध स्वरूपांनिशी दाक्षिणात्य राज्यांतून आजही जारी आहे. गुलामगिरीवर आधारलेल्या समाजरचनेचा हा शिल्लक राहिलेला वारसा आहे. जुन्या पूर्वग्रहांशीं तर हा कायदा जुळता आहेच, परंतु पिढ्यान्‌पिढ्या गौरवर्ण आणि नीग्रो नागरिकांत दैनंदिन जीवनांत घडून येणाऱ्या व्यवहाराचा आधार अशा जुन्या रीतिरिवाजांनाही तो

धरून आहे. या कायद्याच्या चौकटींतच नीग्रोंना अधिकाधिक सवलती आणि थोडाबहुत वर्णविषयक न्याय मिळत गेला होता. खरें बंधन होतें तें एकचः नीग्रोनीं आपलें समाजांतलें दुय्यम स्थान सोडता कामा नये. त्यांना तसेंच वागविलें जाईल आणि त्यांनींही स्वतःला तसेंच समजावें.

दक्षिणेपुरता वर्णभेदाचा विचार जरा वेगळ्या भावनेनें केला पाहिजे. तिकडे नीग्रोंविषयीं सहानुभूति वाटत असूनही अनेक कर्तव्य-जागृत माणसांना स्थानिक रूढींच्या चौकटींत राहूनच काम करावें लागलें आहे. या बाबतींत फार मोठ्या अडचणींना त्यांना तोंड द्यावें लागलें आहे. शिवाय असेंही असूं शकतें कीं, ( यादवीआधीं गुलामगिरीच्या काळांत असें होतें. ) अनेक नीग्रो कुटुंबांना वर उल्लेखिलेल्या कायद्याच्या चौकटींत जेवढें सुख—म्हणजे सुरक्षितता—वाटत असेल तेवढी स्वतःवर प्रौढ माणसाच्या साऱ्या जबाबदाऱ्या स्वतंत्रपणें येऊन पडल्यावर वाटणारही नाहीं. परंतु खरा प्रश्न मुळीं सुख-सुरक्षिततेचा नाहींच. प्रश्न आहे तो मानवी हक्काचा. आणि तो टाळणें शक्य नाहीं.

हा वर्णभेदाचा कायदा आज ना उद्यां, मार्गांतल्या स्थानिक संबंधितांनीं उपस्थित केलेल्या अडचणी दूर होऊन, कायमचा आणि पूर्णपणें नष्ट होईल याविषयीं मला तरी फार विश्वास वाटतो. दोन प्रकारच्या दडपणांनीं हें होईल. एक फेडरल सरकारचे प्रयत्न आणि सुप्रीम कोर्टाचे निर्णय यांचें दडपण; आणि दुसरें स्थानिक नीग्रो जमातीनें आत्मार्पण वृत्तीनें, संयमानें चालविलेल्या चळवळीचें दडपण. इथें मॉंटगोमेरी, अलाबामा, इथल्या नीग्रो जमातीचें आणि त्यांच्या रेव्ह० मार्टिन ल्युथर किंग या नेत्याचें मला सकौतुक अभिनंदन केलें पाहिजे. १९५६ च्या प्रसिद्ध बस-बहिष्कार चळवळीनें त्यांनीं वर्णविषयक आंदोलनाचा एक आदर्शच प्रस्थापित केला आहे. या चळवळीचें महत्त्व फार मोठें होतें. गांधीवादी अहिंसात्मक प्रतिकाराचा या देशांतला हा वैशिष्टपूर्ण आणि उद्बोधक उपक्रम.

यानंतर आतां प्रश्नाचा दुसरा भाग : व्यक्तिगत व्यवहारांतले वर्णविषयक पूर्वग्रह. हे फक्त दक्षिणेपुरतेच मर्यादित नाहींत. त्यांचें स्वरूप

राष्ट्रव्यापी आहे. मिस मार्गरेट मेड म्हणतात कीं, "परकी देशांतल्या नीग्रोंशीं खेळीमेळीनें वागलेल्या अमेरिकन सैनिकांच्या मनांत मुळांतच मुळीं एकूण नीग्रो जमातीविषयीं वा जगांतल्या नीग्रोंविषयीं कोणताही द्वेष नव्हता. त्यांच्या मनांत होती ती अढी, होता तो राग होता त्यांच्याच देशांतल्या नीग्रोंबद्दल. कारण एवढ्यापुरता हा प्रश्न झाला समाजांतल्या दोन गटांतल्या स्पर्धेचा, ओढाताणीचा. एका परकी घटकाच्या उपस्थितीच्या जाणीवेपोटच्या डांचणीचा. असल्या डांचण्यांवरच मानवी मनांतले सैतान पोसले जात असतात."

ही डांचणी आणि तिच्या पोटची ओढाताण, वैमनस्य केवळ दक्षिणेंतच नव्हे तर उत्तरेंतही, विशेषतः खूप उद्योगधंद्यांच्या भागांत नव्यानें, मोठ्या प्रमाणावर नीग्रोंची आयात होते तेव्हां प्रत्ययाला येतें. यांत थोडें भय असतें, थोडी असते वरिष्ठपणाची दुखावलेली भावना, दुसऱ्याची छळणूक करण्यांतलें एक विचित्र सुखही यांत कुणाकुणाला हवेंसें वाटतें. आणि मग विध्वंसाचीं, छळणुकीचीं बीजें पडतात. त्यांना क्वचित् अनपेक्षित तीं कडू जहर फळेंही येतात. गोऱ्या लोकांच्या वस्तींत रहायला येऊं पहाणाऱ्या कांहीं नीग्रो कुटुंबांना कांहीं वर्षांमागें शिकागो शहराच्या उपनगरांत असलीं कडू जहर, विषारी फळें सक्तीनें चाखण्याची पाळी आली होती. इथें मी गौरेतरांना मनाई असलेलीं हॉटेलें, क्लब्ज्, समुद्रकिनारे, आणि कांहीं सुखवस्तू वर्गांतून दिसून येणारे वर्णभेदाचे 'सुसंस्कृत' प्रकार (केवळ नीग्रोजविषयींच नव्हे तर ज्यूंच्याही संबंधांत आणि क्वचित् आयरिशमेनच्या बाबतींतही हे असले प्रकार प्रत्ययाला येतात...) याविषयीं कांहीं लिहित नाहीं.

इतकेंच म्हणतों कीं या गोष्टी उद्वेगजनक आहेत. आणि यांतूनच अधून मधून जाळून मनुष्यवधासारखे राक्षसी, जंगली प्रकार उद्भवतात. कायदेशीर वर्णभेद कदाचित् लौकरच्या काळांत घालवतां येईल; परंतु हे प्रकार मात्र या देशांतून लौकर नष्ट होणार नाहींत. मात्र ते अखेर नष्ट होणारच; कारण तशी या देशाची प्रतिज्ञाच आहे.

हे प्रकार हें या बंधुभावाचा मुबलक आणि अकृत्रिम आढळ असणाऱ्या देशाला लांच्छन आहे. या देशाच्या वेगळया अस्तित्वाच्या आणि जीवन-मूल्यांच्या मुळावरच असले घांव पडतात. याला हे शोभत नाहींत, साजत नाहींत. इथें हेंही सांगायला हवें कीं विशिष्ट वर्तुळांतून कोणाला, वर्णविषयक पक्षपाताला नैतिक अधिष्ठान या स्वरूपांत, नीग्रो जमातीच्या तथाकथित कनिष्ट लायकीविषयीं काढलेले दर्पोद्‌गार जरूर ऐकायला मिळतील; परंतु वर्णभेदाला तत्त्वज्ञानाचें स्वरूप मात्र या अमेरिकेंत नाहीं. तसलें कांहींच इथें आढळत नाहीं. नियम म्हणून असेंही म्हणतां येईल कीं, वर्णविषयक पक्षपाताच्या भावनेचे बळी असतात त्यांना त्या गोष्टींत बिलकुल अभिमान वा दर्प वाटत नाहीं. उलट वाटते बेचैनी. शरीराच्या, मनाच्या अनेक अपरिहार्य खोडी, तशीच ही एक. अरिहार्य म्हणूनच ती ते वागवीत असतात. मनच्या मनीं त्यांना हें कळत असतें कीं या पक्षपाताच्या भावनेला समर्थन नाहीं, खुलासाही नाहीं. मग अनेक निसर्गक्रमांप्रमाणें हाही एक मानण्याची प्रवृत्ति असते.

आणखी एक गोष्ट उल्लेखिली पहिजे ती अशी कीं, कोणाला आवडो, न आवडो, प्रत्यक्षांत नीग्रोज हे या राष्ट्राचा एक अंगभूत भाग बनलेले आहेत—युद्धकाळांत इतर नागरिकांप्रमाणें त्यांनाही देशाकरता प्राण कुरवंडण्याला आवाहन करण्यांत येत असतें. अशा तऱ्हेनें 'अंगभूत भाग' होऊन मूलतः गौरवर्णीयांशीं समान नात्यानेंच असलेली त्यांची जमात इतर सांस्कृतिक आणि सामाजिक दृष्टींनींही झपाट्यानें त्यांची बरोबरी करीत आहे. समाजांत जबाबदारीच्या जागा शोभविणारे सुसंस्कृत नीग्रो वाढत आहेत तसतसें वर्णभेदाचें तत्त्व आपोआप एकेका पावलानें मागें हटतच आहे.

वर्णभेद अमेरिकन समाज-मनाला साजत नाहीं आणि तो नष्ट करण्याची या देशाची प्रतिज्ञा आहे हें मी मागें म्हटलेंच. याचे पुरावेः एक तर फेडरल सरकारच्या कायदेकानूंच्या आणि अंमलबजावणीच्या, अशा दोन्हीं भागांतले अधिकारी या बाबतींत अधिकाधिक खंबीर भूमिला घेऊं लागलेले दिसतात. शिवाय सार्वजनिक जागृतीही वाढत्या प्रमाणांत आहे. त्याशिवाय या प्रश्नावर आपखुषीनें संघटित झालेल्या अनेक गटांचें

कार्य या बाबतींत सारखें चालूच आहे. परंतु हें सारें असलें तरी गोऱ्या माणसाच्या मनांतले पूर्वग्रह धुवून जातील तेव्हांच वर्णभेद खरा नष्ट होणार. या दिशेनें अनेक धार्मिक संस्थांचें कार्य फार मोठी कामगिरी बजावीत आहे असें म्हटलें पाहिजे. त्यांची जबाबदारी या कामीं फार मोठी आहे. भूतकालांत नीग्रोंपुरता मात्र बायबलचा पवित्र कायदा मोडण्याचें पापकृत्य करणाऱ्या पूर्वींच्या कॅथॉलिक आणि प्रॉटेस्टंटांना त्याबाबतींत क्षमा करणें कठीण आहे. चर्चच्या मर्यादेंत, ईश्वराच्या घरीं वर्णभेद ही कल्पनाच किती भयंकर ! परंतु आतां परिस्थिति झपाट्यानें बदलत, निवळत आहे. लुइजिआनाच्या आर्चबिशप रमेलनीं नुक्तीच वर्णविषयक समतेच्या बाजूनें घेतलेली ठाम भूमिका इथें उल्लेखनीय आहे. किंबहुना एकंदरीनें कॅथॉलिक आणि प्रॉटेस्टंट धर्मगुरू आपापल्या परीनें आज देवादारचा हा अन्याय्य, खोटा पक्षपात नष्ट करण्यासाठीं झटत आहेत. फादर जॉन ल फार्जनीं याबाबतींत कॅथॉलिकांना ( आणि इतरांनाही ) आज तीस वर्षें अप्रतिहतपणें आपल्या प्रत्यक्ष कृतीनें आणि उक्तीनें फार उत्तम मार्गदर्शन केलें आहे. त्यांचें या बाबतींतलें धैर्य आणि समज फार उपयुक्त ठरलीं आहेत. बऱ्याच काळापासून त्यांच्या कार्याचा परिचय मला आहे; आणि मी त्यांचा एक चहाता आहे. त्यांच्या ‘ The Journal of a Southern Pastor ’ या ग्रंथांतलें हें वाक्य पहा : “ आपण कॅथॉलिकांनीं प्रयत्नपूर्वक वर्णभेद पूर्णतया नष्ट करून आपल्या नीग्रो बांधवाला ईश्वराचें आपल्यासारखें लेंकरू म्हणून आपल्याजवळ घेतलें पाहिजे, आपलेंसें केलें पाहिजे. ”

थोडक्यांत, अमेरिकेंतल्या वर्णभेदाच्या प्रश्नाचा विचार आपण करतों तेव्हां स्वतःशींच, किंवा खरें तर स्वतःच्या अस्तित्वाचा भाग झालेल्या एका विषारी, सैतानी वारशाशीं, आपल्याच प्रजेच्या एका मोठ्या भागाशीं नेटानें झगडत असलेल्या देशाचें एक ओजस्वी चित्र आपल्या नजरेपुढें उभें रहातें. आपल्या प्रिय तत्त्वाशीं प्रतारणा करणाऱ्या गोष्टींपासून मुक्त होणें, आपली एकूण सर्वसामान्य पातळी आपल्या मनांतल्या आदर्शाप्रत नेऊन ठेवण्याचा शर्थीचा प्रयत्न करणें हे यामागले फार उदात्त उद्देश.

नीग्रोंची समस्या हा अमेरिकन राष्ट्राच्या मांसांत रुतून राहिलेला कांटा आहे. हा सल वागवीत, एकीकडे हरप्रकारच्या लहान लहान प्रश्नांच्या गुंत्यांतून मार्ग काढीत सर्वस्पर्शी न्यायाच्या साध्याकडे चांच-पडत परंतु अखंडपणें निघालेलें अमेरिकन राष्ट्र आदरणीयच मानलें पाहिजे.

• • •

## आणखी एक कांटा

वर्णभेदाइतकाच अमेरिकेंत लैंगिक प्रश्नही गुंतागुंतीचा होऊन बसलेला आहे. हा गुंता कमी होणें असेल तर एकच केलें पाहिजे. तज्ज्ञांची एक समिति नेमून, तिला या विषयाचा साकल्यानें अभ्यास करायला लावून त्याबाबतच्या निष्कर्षांचाच विचार करावा. या समितींत अर्थातच एक मानसशास्त्रज्ञ असेल. एक मानव-वंश-शास्त्रज्ञ असेल. एक समाज-शास्त्रज्ञ असेल आणि एक तत्त्वज्ञानांतला दर्दी असेल. व्यावहारिक पातळीपेक्षां एका तात्त्विक पातळीवर या समितीचें कार्य चालावें.

माझ्यापुरता मी कांहीं या थोडक्या पानांत या प्रश्नाची मोठीशी उकल करूं शकणार नाहीं. त्या बाबतींत वर्णभेदाप्रमाणेंच कांहीं विचार तेवढे मी नमूद करणार आहे. जाता जाता माझ्या पहाण्यांतल्या कांहीं गोष्टींचाही मी उल्लेख करीन.

माणसाला नित्य त्रासदायक ठरणाऱ्या साऱ्याच प्रश्नांच्या हाताळणी-बाबतची अमेरिकेची भूमिका वस्तुस्थितीला धैर्यानें तोंड देण्याच्या व्यावहारिक भूमिकेंतून उद्‌भवते. हे प्रश्न एकाद्या मार्गानें सोडवता आले तर पहावे हा प्रयत्न, त्यांना किंचित जास्तच अवाजवी सरळसाधें स्वरूप देऊनही, केला जातो. तरुणांच्या बाबतींत ( यांच्या दृष्टीनें 'गोइंग स्टेडी' म्हणतात ती पद्धत एकाद्या सामाजिक रिवाजाइतकी महत्त्वाची आहे. ) ही भूमिका तेवढी अवास्तव वाटत नाहीं; आणि या बाबतींतल्या लोकमान्य अशा सामाजिक नीतिमत्तेच्या यमनियमांशीं

युरोपीय भूमिकेपेक्षां ती मिळती जुळतीही आहे. परंतु त्याचबरोबर ती इतकी उघडी वाघडी वाटते कीं कांहीं अंशीं रानटी ठरावी. मला दिसतो तो तिचा अंतिम परिणाम युरोपीय भूमिकेच्या परिणामापेक्षां बिलकुल वेगळा नाहीं, उजवा नाहीं; परंतु डावाही नाहीं हें मान्य केलें पाहिजे. त्याशिवाय, या देशांतली सर्वसाधारण लैंगिक नीति ही युरोपमधल्या सर्वसाधारण लैंगिक नीतीच्याच पातळीवर आहे असें सांगण्यांत या दोन्हींनाही मोठेंसें भूषण नाहीं. आणि शिवाय मनुष्य–स्वभावालाही तें मोठेंसें भूषणास्पद नाहीं.

तरी पण माणसांच्या प्रत्यक्ष नैतिक व्यवहाराशीं माझ्या या विचारांचा तसा कांहीं संबंध नसून त्यांचा खरा संबंध या माणसांच्या वैचारिक व्यवहाराशीं आहे. या दृष्टिकोनांतून असें म्हणतां येईल कीं आमच्या आधुनिक पाश्चिमात्य जगांत सर्वसाधारणपणेंच लैंगिक गोष्टींबाबतचा एक वाढता ध्यास आणि अभ्यास प्रत्ययाला येतो. परंतु या देशांत मात्र ध्यासाला आणि अभ्यासाला कांहीं स्वरूपें प्राप्त होतात–हीं असतात तशीं युरोपांतल्या उच्च–वर्णीय वा वाङ्मयीन वर्तुळांत जें चालतें त्याहून किती तरी कमी वाईट ( अमेरिकेंतली सदिच्छेची मूलभूत भावना हें कारण. ) आणि अधिक खुळचट. ( अमेरिकेंतला आंकडेवारीवरचा, कागदी पुराव्यावरचा, ‘ शास्त्रा ’ वरचा आणि पढीक तंत्रावरचा विश्वास हीं याचीं कारणें. ) आजच्या इथल्या शिक्षित नागरिकाच्या मनांत एक विशेष प्रकारचा कामगंड वाढतो आहे. किंवा याहून खरें म्हणजे लैंगिक गोष्टींविषयींची एक श्रद्धाळू, उत्कट, अभ्यासू वृत्ति वाढत चालली असून ती या नागरिकाच्या मानसिक संवयी-खोडींचा एक भाग बनूं पहात आहे. जणूं ‘ प्युरिटॅनिझम ’ चें जूं दूर झुगारून होतांच अमेरिकन सदिच्छेला लैंगिक क्षेत्र नांवाचें एक अपार महत्त्वाचें क्षेत्रच उपलब्ध झालें आणि या क्षेत्रांतल्या कसोशीच्या संशोधनानें आमच्या आत्मज्ञानांत कांहीं महत्त्वाची भर पडून आमचें जीवन भलतेंच सुधारणार होतें.

जाहिरातींतून आकर्षण म्हणून नित्य वापरण्यांत येतो तो लैंगिक मूर्खपणा आपण सोडून देऊं. महत्त्वाची गोष्ट एकच. सर्व कांहीं, विशेषतः

मानवी संबंध, ही एका बाजूनें शिकवण्याची आणि शिकून समजण्याची गोष्ट आहे, आणि त्याचबरोबर ती उथळ स्पष्टीकरणयोग्य आणि तथा-कथित ‘शास्त्र’ बनवण्याइतकी सोपी गोष्ट आहे—आणि तिच्यांत बुद्धीनें वा साधनांनीं समजून घेऊन, मापून आणि कसें तें जाणून घेऊन सारें कांहीं साधतें, या कल्पनेचा मी म्हटलें त्या लैंगिक गोष्टींविषयींच्या वाढत्या अभ्यासू वृत्तीवर काय परिणाम झाला याचाच विचार केला पाहिजे.

त्यामुळेंच मानवी भावनांविषयींच्या साऱ्या मोठमोठ्या गुंतागुंतीच्या प्रश्नांचा विचार लैंगिक शब्दप्रयोगांच्या रोखठोक भाषेंत करण्याची प्रवृत्ति वाढली. त्याचप्रमाणें लैंगिक जीवन हें कांहीं अ-पार्थिव आणि उच्च जीवन-मूल्यांचें गुलाम बनवावें याविरुद्धही बुद्धिवादाच्या नांवाखालीं बंड करण्याची प्रवृत्ति अनेक चांगल्या चांगल्या माणसांत दिसूं लागली. त्याचबरोबर जीवनांतल्या ‘सत्यां’ विषयीं एक प्रकारची धार्मिक श्रद्धाही वाढूं लागली हें कोणालाही दिसून येईल. माझ्या मतें ही विलक्षण मूर्खपणाची होती. आणि आज अत्यावश्यक अशा, मानवविषयक ज्ञानाच्या इतर शाखांशीं निगडित अशा खरोखरीच्या पद्धतशीर लैंगिक शिक्षणाऐवजीं एक तथा-कथित ‘लैंगिक शिक्षण’ अंमलांत आलें. यांत एका स्वस्त्या, लोकप्रिय थाटाच्या ‘शास्त्रा’ बरोबरीनें खोटी भावनात्मकता आणि उच्चतर सुखाचा आंधळा, उत्कट शोध अंतर्भूत होता. अनुभवी डॉक्टर लोक, सौम्य, सावध आणि वडीलकीच्या शब्दांत कुटुंबांतल्या एकचित्त मातापित्यांना लैंगिक सुखाच्या तंत्राची कल्पना आणून देतात. शाळांतून यासाठीं वेगळे वर्ग भरतात, या वर्गांतून तरुण मुलींना प्रौढ आणि भारदस्त ‘मेट्रन्स’ पुरुषाची वासना चाळविण्याच्या आणि काबूंत राखण्याच्या उत्तमोत्तम पद्धति समजावून सांगतात; हेतु हा कीं या जात्या अननुभवी परंतु पढीक ज्ञानानें परिपूर्ण, आणि एकाच वेळीं खूप धीट आणि हिशेबी विद्यार्थिनींना एखादा उपवर मुलगा पकडून तो नवरा म्हणून राखता यावा.

या देशांतल्या एकंदर जागृतीकडे पहाता, असल्या गोष्टींना खरोखरी कांहीं वैशिष्ट्य प्राप्त होण्याऐवजीं त्यांचा गवगवा मात्र फार असतो. अखेर एक गोष्ट कायमच उरते ती ही कीं वास्तविक निसर्गानें जगाच्या आरंभापासून

...ग्रंथ संग्रहालय, ... २८-१८ ... १२३२ ... १७७५- १५/८/६०

लैंगिक आणि इतर शारीरिक सुखांच्या शोधाच्या... कांहीं सहजसाध्य गुरुकिल्ल्या माणसांकरता कोणताही कृत्रिम भेदभाव न करता उपलब्ध करून ठेवल्या असता शरीरशास्त्र आणि मानसशास्त्राद्वारें त्यांचा छडा लावण्याचे वा लावून देण्याचे हे मोठ्या प्रमाणावरचे प्रयत्न मोठे विचित्र वाटतात.

हें आणि यामागलें प्रकरण वास्तविक माझ्या मूळ आराखड्यांत नव्हतें; कारण माझा मूळ हेतूच मुळीं या देशांतलें मला काय आवडतें तेवढें सांगण्याचा होता. तर मग नंतर हीं प्रकरणें मी या ग्रंथांत कां घेतलीं ? कारणें दोन : एक, वाचकहो, तुमच्याकरतां. आणि दुसरें : लोकांची सर्व-साधारण प्रवृत्ति लक्षांत घेऊन. कारण अमेरिकेचे हे माझ्या मतें दोष मी दाखवले नसते तर माझ्या दृष्टीनें माझ्या विषयांत ते बसत नाहींत हें माझें कारण बाजूला राहून, लोकांनीं, अमेरिकेची निव्वळ भाटगिरी मी चालविली आहे म्हणून म्हटलें असतें. किंवा मला अडाणी समजण्यांत आलें असतें.

तसें म्हटलें तर हीं प्रकरणें माझ्या विषयाशीं विसंगतही नाहींत. कारण एकाद्या व्यक्तीवर आपण प्रेम करूं लागतों तेव्हां मुख्यतः मनुष्य-स्वभावांतल्या सामान्य उणीवांची आणि व्यथावेदनांची त्याच्या व्यक्ति-त्वांतली खूण शोधून, तसलीं कांहीं वैशिष्ट्यें हेरून, त्यांना तो तोंड कसें देतो तें जाणून घेण्यानेंच त्याच्याविषयींच्या आपल्या प्रेमाचीं कारणें आपलीं आपल्याला पुरतीं उमगतात. स्वर्गांतच फक्त सैतानाचा शिरकाव नाहीं. या जगांत, जगांतल्या प्रत्येक देशांत तो कोठें ना कोठें, कसा ना कसा आहेच. मुख्य सवाल असतो तो एकाद्या विशिष्ट देशाला याची जाणीव असते वा नसते, आणि असल्यास असल्या गोष्टींना उजळ रंग मारण्याकडे त्याची प्रवृत्ति असते कीं या गोष्टींचें निर्मूलन करण्याकरतां त्याची धडपड असते, हीच.

अमेरिकेचे दोष जाणूनच मी तिच्यावर प्रेम करतों. परंतु दोष न लपवतां ज्या आवेशानें ती ते उघडे करते, बोलून दाखवते, त्यांवर चर्चा करते, आणि एकदां त्यांच्या विषारी फैलावाची कल्पना येतांच त्याविरुद्ध तिची जी धैर्यशाली आणि अत्यंत निर्वाणीची धडपड चालते त्या

घडपडींत, आवेशांत मला एक अस्सल आणि चांगलें वैशिष्ट्य दिसतें. या वैशिष्ट्यामुळें माझें या देशावरचें प्रेम द्विगुणित होतें.

या प्रकरणाच्या विषयाबद्दल—लैंगिक भ्यासाच्या येथल्या सर्वसाधारण आणि चुकीच्या भूमिकेबद्दल–मी इतकेंच म्हणेन कीं एवढ्यापुरता हा देश, ही अमेरिका, दोष उघडा करण्याच्या प्रथमावस्थेंत आहे. दुसरी घडपडीची, प्रतिकाराची, निर्मूलनाच्या प्रयत्नाची अवस्था अद्याप यायची आहे. आज या गोष्टीला बव्हंशी जबाबदार असणाऱ्या मानसशास्त्रज्ञांना आणि मानसोपचार–तज्ज्ञांना आंकडेवारीनें आणि सारासार विचारानेंही या गोष्टीचे या राष्ट्राच्या प्रकृतीवर होणारे विध्वंसक परिणाम उमगूं लागले कीं सर्वांत आधीं तेच त्याविरुद्ध मोहीम उघडतील.

• • •

## अमेरिकन दयार्द्रता आणि बंधुभाव

अमेरिकेंतल्या दयार्द्रतेचा विचार करतांना, फ्रान्सचा पाडाव होतेवेळीं मी, माझी पत्नी आणि माझी मेव्हणी अमेरिकेंत आलों असतां आमच्या अमेरिकन स्नेह्यांकडून ज्या अगत्यानें आमचें स्वागत झालें आणि नंतरच्या भयंकर मानसिक अशांततेच्या काळांत ज्या परोपरीनें आमचें सांत्वन करण्यांत येत असे त्याचें स्मरण तर मला होतेंच, परंतु अगदीं अनोळखी आणि अज्ञात ठिकाणाहून देखील आमची जी विशेष कदर राखली जात असे तिचा विसर अशक्य आहे. टॅक्सींतून उतरतांना टॅक्सी ड्रायव्हर म्हणत, “ फ्रान्सचा विजय असो ! ”—Vive la France ! आम्ही फ्रेंच म्हणून फुलवाला फुलांचे पैसे नाकारीत असे. लिफ्टचा नीग्रो लिफ्टमन आमच्या भावना दुखावूं नयेत म्हणून फ्रान्सच्या नवनवीन पराभवाच्या बातम्यांचे मोठमोठे मथळे असलेलें वर्तमानपत्र दर दिवशीं खिशांत नीट लपवून ठेवीत असे. या तशा बारीक गोष्टी आहेत परंतु व्यथित मनःस्थितींत यांचेंच माणसाला फार वाटतें. असे किती म्हणून प्रकार सांगावेत.

यानंतर अधिक निश्चित असे कांहीं विचार मी मांडणार आहे.

मी असें म्हणणार आहे कीं, सर्वसाधारणपणें, दोन विरुद्ध प्रकारचीं मूल्यें युरोप आणि या देशांत दिसतात.

युरोपीय–विशेष करून फ्रेंच–माणसाच्या दृष्टीनें सर्वांत अधिक किंमत प्रगल्भतेला. सात्त्विकतेच्या विरुद्ध अर्थानें इथें प्रगल्भता घेण्यांत यावी. तसें म्हटलें तर आंतरिक चांगुलपणाचाच प्रश्न आला तर अमेरिकन लोकांइतकाच चांगुलपणा युरोपियनांतही आहे. युरोपांतही परमार्थ आणि मानवी बंधुभाव या जीवनांतल्या सर्वोच्च गोष्टी मानणारे प्रेमळ संत कित्येक होऊन गेले, अद्याप आहेत. आणि फ्रेंचांना त्यांच्यांतल्या अशा गुणांव्यतिरिक्त इतर कमी उजवे गुण दाखवण्याची इच्छा होत असेल तर त्यांच्यांतलें वाईट तें बाहेर टाकून जपण्यासारखें चांगलें तें सारें राखून ठेवण्याच्या इच्छेनेंच.

तरी पण मी वेगळ्याच एका गोष्टीबद्दल बोलतों आहे. मी म्हणतों आहे तें लोकांच्या मनांतल्या आणि दैनंदिन व्यवहारांत तसेंच बाह्य वागणुकींत दिसून येणाऱ्या सर्वसामान्य मूल्यांबद्दल.

आणि युरोपांत, त्यांतही फ्रान्समध्यें ‘ सात्त्विक वागणें ’ या गोष्टीचा अर्थ भाबडें, बुद्दू वागणें असाच करण्यांत येतो, असाच माझा अनुभव आहे. कुटिल बुद्धि, हेवादावा या गोष्टी बुद्धीच्या, चातुर्याच्या निदर्शक मानण्यांत येतात. त्यामुळें होतें असें कीं या देशांतून आपण युरोपांत परततों तेव्हां पहिली भावना होते ती गांधिलमाशीच्या घरट्यांत शिरत असल्याची. साऱ्या बाजूंनीं आपली लचकेतोड होते. ( पॅरिसमध्यें रहाणाऱ्या एका अमेरिकनानें त्याच्या एका मित्राला लिहिलेलें पत्र मला आठवतें. त्यानें लिहिलें होतें : “ अखेर एकदांचा मी या देशांतला मानला जाऊं लागलों आहे; कोणी फ्रेंच असल्यासारखेंच मला आतां वागवतात. आज मला माझ्या नोकरानें शिवी दिली, पोलिसानें हांसडलें, पोस्टांतल्या नोकरांनीं वसावस दुरुत्तरें केलीं आणि दोन ‘ आर्ट–क्रिटिक्स ’ नीं कडक शब्दांत प्रतिकूल लिहिलें. ” )

या प्रकारच्या मनोरचनेचे कांहीं फायदे आहेत. कितीही जोराची बौद्धिक स्पर्धा यामुळें मानवूं लागते. ‘ बळी तो कान पिळी ’—‘ जीवो

जीवस्य जीवनम्'—Survival of the fittest या कायद्याला युरोपीय संस्कृतींत फार महत्त्वाचें स्थान आहे. आणि या कायद्यांत तथ्यही आहे. हें खरेंच कीं बौद्धिक गुण आणि केवळ सात्विक गुण बरोबरीनें कधींही नांदूं शकत नाहींत. चूक होते ती प्रत्येक माणूस बौद्धिक बाबतींत 'जीनिअस' मानून, हेवेदावे करण्याचा आणि आक्रमक वागण्याचा, वागवून घेण्याचा त्याचा हक्क गृहीत धरण्यांत.

आतां या देशांतल्या मूल्यांकडे आपण वळलों तर अगदीं विरुद्ध दृश्य दिसून येतें. इथलें सर्वोच्च मूल्य म्हणजे सात्विकता, विश्वासपात्रता, सदिच्छेची भावना, त्यागी वृत्ति, सहाय्यतत्परता. आणि यापोटींच परकी प्रवाशांना वैशिष्ट्यानें येथें दिसून येते ती अमेरिकन दयार्द्रता, आपुलकी. अमेरिकन्स सहाय्यासाठीं सदा तत्पर असतात आणि त्यांत त्यांना सुखही वाटतें. साऱ्यांशीं त्यांचे संबंध सारख्या बंधुभावाचे. कां ? कारण सारींच अखेर माणसें. माणसांसारखीं माणसें. बांधव. मदत आणि सहानुभूति, अनेकदां फार उदार मदत आणि समंजस सहानुभूति यांकरतां एवढी पात्रता अमेरिकनांना पुष्कळ होते. या देशांत आपण पोंचतों तेव्हां आपल्याला या संबंधांत सुटकेची एक अविस्मरणीय जाणीव व्यापून टाकते. हलकें वाटतें.

या आधीं एकदां मी न्युगिनीच्या 'मानुस' जमातीबद्दल लिहिलें आहेसें वाटतें. या जमातीबद्दल अधिक लिहायला हवें. गेल्या पंचवीस वर्षांत ही जमात रानटी अवस्थेंतून सुसंस्कृत अवस्थेप्रत येऊन पोंचली. दुसऱ्या युद्धाच्या काळांत लाखों अमेरिकनांना त्या बेटाच्या मार्गानें जावें लागे, त्याचा या जमातीवर काय परिणाम झाला तेंही लक्षणीय आहे. प्रसिद्ध मानव-वंश-शास्त्रज्ञ मार्गारेट मेड यांनीं त्यांच्या 'न्यु लाइव्हज फॉर ओल्ड' या ग्रंथांत लिहिलेला कांहीं भाग इथें उल्लेखणें जरूर आहे. बाई म्हणतातः "या बेटांवरून आले गेले ते अमेरिकन्स अमेरिकेच्या लोकसंख्येचा एक वेंचक, वागणुकीला उजवा वा अधिक ध्येयवादी भाग होते असें म्हणता येणार नाहीं. ते चारचौघांसारखेच

चार प्रकारचे होते. परंतु 'मानुस' जमातीला मात्र ते वर्गभेद वा अन्य कृत्रिम भेदरहित असे परस्परांशीं केवळ माणुसकीनें वागणारे लोक वाटले."

लेखिकेला त्यांनीं सांगितलें, "अमेरिकनांनीं आम्हांला बरोबरीनें, भावांसारखें वागवलें."

"हातीं कामें करतांना माणसें लौकर थकून ऐन उमेदींतच मरण पावतात म्हणून अमेरिकनांना यंत्रांकडून कामें करवून घेणें पसंद असतें. माणसें म्हातारपणापर्यंत जगावीं असें त्यांना वाटतें."

"मानुस आज सांगतात त्याप्रमाणें, प्रत्येक माणसाचें जीवित आणि आरोग्य अमेरिकनांनीं फार मोलाचें मानलें. इतकें मोलाचें कीं त्यापुढें कालव्यय, प्रयत्न, खर्च, कशाची म्हणून त्यांनीं कधीं तमा केली नाहीं."

"इतर सारें पुनः पुन्हा मिळतें. आणि म्हणून असलेलें वायां गेलें तरी चालतें; परंतु मानवी जीविताचें तसें नाहीं आणि तें जपलें पाहिजे हें अमेरिकनांकडून आम्हांला शिकतां आलें."

"अमेरिकनांकडून आम्हांला कळलें कीं महत्त्व फक्त माणसांनाच."

यावरून असें म्हणावें काय कीं अमेरिकन आधिभौतिकतेचें बिनबुडाचें स्तोम मिरविणाऱ्या युरोपियनांपेक्षां हे 'मानुस' सूज्ञ आणि डोळस होते ? यापेक्षां असेंच म्हणावें लागतें कीं आपल्या बेटावर असतांनाच या जमातीच्या लोकांना अमेरिकनांचें 'घरगुती' वागणें जवळून पहायला मिळालें. त्या बेटावर गेले ते एकटे दुकटे अमेरिकन प्रवासी नव्हते; एक फिरतें अमेरिकन जगच त्या बेटावर प्रस्थापित झालें होतें. अमेरिकन सैन्य तिथें होतें.

वर उल्लेखिलेल्या विशिष्ट मूल्यांमुळें परिणामीं मी म्हटलें त्याप्रमाणें, इथें सर्वसामान्यतः व्यापक दयार्द्रता, कोणाच्याही वांट्याला येणारी दयार्द्रता मुबलक आढळते. आणि कितीही मर्यादेपर्यंत ती वाढते. परंतु यामुळेंच भांडणतंट्यांतून, हालकष्टांतून विकसित होत असतो तो परस्परांतला

अकृत्रिम जिव्हाळा इथें कमी. ( संभाषणही एकेकदां कदाचित् कठीण जात असावें. कारण माझ्या पत्नीला एकदां इथल्या एक बाई म्हणाल्या होत्या, " इथें शरीराबद्दलही बोलायचें नसतें आणि आत्म्याच्याही गोष्टी टाळायच्या असतात." ) म्हणून, सर्वसाधारण सहानुभूतीच्या, कळकळीच्या वातावरणांतच, इथल्या धांवपळीच्या समाजजीवनांत माणसांच्या मनांत एकलेपणाची व्यथा मोठ्या प्रमाणावर घर करून राहिलेली आढळते. 'सर्वांभूतीं परमेश्वर' मानण्याची एक वृत्ति आणि निकटवर्ती ऋणानुबंधांचें बंद जग या दरम्यानच्या विरोधाशीं याचा कांहीं संबंध असावा.

हा एक मुद्दा केवळ मी मांडून ठेवला आहे. मला नक्की सांगता येत नाहीं, पण त्यांत बराच अर्थ असावा अशी माझी अटकळ आहे.

या प्रकरणांत मी उपस्थित करणार असलेला शेवटचा मुद्दा आपापसांतल्या उदार वृत्तीचा आणि बंधुभावनेचा. वर्ण–प्रश्नाच्या बाबतींत एकादा बिकट प्रसंग उपस्थित झाला कीं तेवढ्यापुरतें पूर्वग्रहांमुळें या मुद्‌द्याला भारी उफराटें स्वरूप प्राप्त होतें. परंतु मागें मी म्हटलेंच कीं या देशाच्या जीवनपद्धतीच्या मूलभूत श्रद्धांत आणि आकांक्षांतच हा वर्णभेद कुठें बसत नाहीं आणि तो नष्ट करण्याचा चंग या देशानें बांधलाही आहे.

बौद्धिक औदार्याचा अभाव, बरोबरीच्या नागरिकांच्या धर्मविषयक वा तत्त्वविषयक श्रद्धांविषयीं द्वेषभाव याही गोष्टी अमेरिकन जीवनपद्धतीच्या मूलभूत श्रद्धा आणि आकांक्षांविरुद्धच होत. आणि अमेरिकन मनानें त्यावर विजय संपादन केलेला आहे. प्युरिटनांच्या कालांतल्या न्यु इंग्लंडच्या संस्कृतीबाबत लिहितांना पॉल एल्मर मोअरनें म्हटलें आहे: ही संस्कृति पाठोपाठच्या तीन अवस्थांतून ढवळून निघाली. धार्मिक कर्मठपणा, विचारांचा एकांडेपणा आणि दुर्बलतेपोटचें वंध्यत्व. हें सारें भूतकाळांत जमा झालें आहे. मानवी स्वभावांतल्या वेगवेगळ्या वैशिष्ट्यांतले मूलभूत धोके कायमचे नाहींसे होणें शक्यच नाहीं. कुप्रसिद्ध 'क्लॅन' अद्याप तिच्या जाळपोळीसह अस्तित्वांत आहे. तरीही मधून मधून

एकादे वेळीं वातावरण तंग होऊन किंवा भय वा संतापाची एकादी मोठी लाट उसळूनही सर्वसाधारणपणें अमेरिकन समाजमनानें आणि अमेरिकन कायद्यानें कोणाही भिन्न मताच्या वा श्रद्धेच्या माणसाविषयींच्या हिंसेच्या, जांचणुकीच्या, निंदानालस्तीच्या वा धाकदपटशाच्या उपयोगाला कडक शासनच केलें आहे. अमेरिकन समाज हाच मुळीं भिन्न भिन्न राष्ट्रीय, सामाजिक आणि धार्मिक थरांतून एकत्र येऊन तयार झाला आहे; या स्थितींत परस्परऔदार्याची भावना ही फार अत्यावश्यक अशीच गोष्ट झाली आहे. परस्पर-औदार्य नसतें तर जो तो दुसऱ्याच्या गळ्याशीं भिडला असता.

आणि एक प्रकारें ऐतिहासिक गरज म्हणूनच जी गोष्ट आवश्यक झाली ती दुसऱ्या प्रकारें मानवी संस्कृतीचा फार मोठा लाभ ठरली. ती गोष्ट : परस्परआदराच्या आणि औदार्याच्या वातावरणांत जगण्याला बांधला गेलेला समाज. इतक्या मूलभूत प्रमाणांत या गोष्टींना महत्त्व देणारें जगांतलें अमेरिका हें एकमेव राष्ट्र.

इथें हें सांगू या कीं एवढ्या मोठ्या कर्तृत्वाचें मूल्यमापनही कांहीं वेळा चुकीच्या दृष्टिकोनांतून होऊं शकतें. केवळ दयाबुद्धि, सद्बुद्धि म्हणजे सारें नव्हे. मी म्हटलें त्याप्रमाणें, इथें सद्बुद्धि आणि सदाचार यांचें आक्रमण बुद्धीवर होत नाहीं. तरीही तसें मुळीं घडत नसेलच असें नव्हे. आणि माझ्या माहितीच्या एका बाबतींत तें घडतेंच. दुय्यम शिक्षणाची ही बाब. या क्षेत्रांत उत्तम बुद्धिमत्तेचे सेवारत शिक्षक सद्बुद्धि आणि औदार्याचा वापर एवढ्या मर्यादेपर्यंत करतात कीं सर्वजण सारखे यशस्वी आणि सुखी होणें आणि आनंदी मुलांमुलींना त्यांच्या आवडीच्या कोणत्याहि ज्ञान-शाखेंत आणि सामाजिक क्षेत्रांत शिकवून तयार करणें हेंच श्रेष्ठ महत्वाचें मानलें जातें. इतकें कीं अव्वल आणि व्यापक सुसंस्कृततेकडे आणि सर्वांगीण ज्ञानाच्या मूलभूत आवश्यकतेकडे दुर्लक्ष होतें.

यानंतर अधिक तात्त्विक विचार करायचा तर, अधिक दृढ सामाजिक नात्यामुळें या देशांतली बौद्धिक जीवनाची परिस्थिति युरोपपेक्षां वेगळी आहे. मला नक्की म्हणायचें आहे तें असें कीं, सुनियोजित, संघटित बौद्धिक

प्रयत्न आणि देशांतलें एकूण सामुदायिक बौद्धिक कार्य, भावी वैचारिक सुग्यांकरतां आजची बौद्धिक नांगरट आणि एकूण संशोधनांतली प्रगति अशा दोन्ही दृष्टींनीं युरोपपेक्षां या देशाची भूमि अधिक सोयिस्कर आहे. संशोधन-क्षेत्रांत, परकी विद्वान, शास्त्रज्ञ आणि जिज्ञासूंना या देशांतल्या वैचारिक आणि शास्त्रीय विकासाकडे सतत अधिकाधिक लक्ष पुरवणें अपरिहार्य होऊन राहिलें आहे ही वस्तुस्थितीच आहे. या मानानें, थोड्यांनाच साधणाऱ्या आणि एकांड्या अमानुष चिकाटीची आणि एकरूपतेची आवश्यकता असलेल्या सृजनशील कार्यांचा विचार केला तर मात्र इथली परिस्थिति कमी उपकारक आहे हें मान्य केलें पाहिजे. कारण समाजापासून व्यक्ती वेगळी होण्याच्या कोणत्याही प्रयत्नाला ही परिस्थिति गैरसोयीचीच आहे.

वैशिष्ट्यानें मला जाणवते आहे ती, इतरांना आपल्या प्रभावानें फिकें पाडूं कीं काय याविषयीं येथल्या विश्वविद्यालयीन वर्तुळांतून प्रत्ययाला येणारी एक विलक्षण चिंता. बरोबरीच्या प्राध्यापकांहून अधिक उत्तम न शिकवण्याचा आणि अधिक प्रगल्भ वा विद्वान् न ठरण्याचा प्रयत्न अनेक प्राध्यापक इथें करतांना दिसतात. नाहींतरी अखेर ‘ जीनिअस ’ हा परस्पर-समजुतीला आणि परस्पर-औदार्याला, परिणामीं सामाजिक स्थैर्याला हानीकारकच नाहीं काय ? हेवादावा, संघर्ष आणि मत्सराला अशा प्रकारें निमित्त देण्यापेक्षां ‘ मेडिऑक्रिटी ’–अतिसामान्य बौद्धिक लायकी हीच समाजांत उत्तम लायकी नव्हे काय ?

हें खरें कीं सामाजिक जाणीवेबाबतची आत्यंतिक भक्ति जरा दुखावून वा ढोंसून थोडी करमणूक करून घेणें कोणालाही आवडेल. आणि तरीही एक गोष्ट उरते ती ही कीं, जीवनाच्या वैचारिक भागापुरतें बोलायचें तर ( या क्षणीं एवढ्या एकाच दृष्टिकोनांतून मी विचार करतों आहे. ) मी उल्लेखिलेला हा आत्यंतिक भक्तिभाव शैक्षणिक जगांत आणि त्याच्या इतर कमी महत्त्वाच्या अंगांत वैशिष्ट्यानें आढळतो. अधिक साकल्यानें असें म्हणूं कीं अमेरिकन वैचारिक जीवन आणि युरोपीय वैचारिक जीवन यांच्या दरम्यान एक भिन्नता आहे आणि बव्हंशीं एकाचीं वैशिष्ट्यें त्या दुसऱ्याच्या उणीवा आणि दुसऱ्याचीं वैशिष्ट्यें त्या एकाच्या उणीवा आहेत.

तरीही एकंदरीनें एक आणि दुसरें सारख्याच पातळीवर आहेत. त्याही-पलिकडे म्हणजे, अमेरिकन बौद्धिक जीवन, उफाड्यानें वाढत असल्यानें, दर क्षणीं संपन्न विकासाचीं अनपेक्षित लक्षणें प्रस्थापित करण्याला समर्थ आहे. आज अग्रस्थान शास्त्राला आहे. आणखी कांहीं दशकांनीं तत्त्वज्ञानासारख्या विषयांनाही तें प्राप्त होऊं शकेल. सृजनशील प्रतिभेच्या बाबतींत अमेरिकन कादंबरीकार, कवि आणि टीकाकार हे आज आधुनिक साहित्यांत आपल्या नवनवीन कर्तृत्वानें आणि संशोधनानें आघाडीवर आहेत.

माझ्या आवडीचा तत्त्वज्ञानाचा विषय सहाजिकच मला इथें विसरता येत नाहीं. एका अलिकडल्या लेखांत मॉर्टिमर ॲडलरनें म्हटलें होतें कीं चार्ल्स सँडर्स पीअर्स, जोसिआह रॉइस, विल्यम जेम्स आणि जॉन ड्युई यांच्या रूपानें हेंच सिद्ध होतें कीं यादवीयुद्धानंतरच्या सर्वसाधारण विकासांत अमेरिकेनें जगाच्या तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रांतही मोठीच भर घातलेली आहे. मला तें पटतें. या लोकांचें लेखन ( त्यांच्यांत कितीही परस्परविरुद्ध ग्रह आणि मतभेद असले तरी एक खरें कीं त्यांच्या लेखनांत सर्वसाधारणपणें वस्तुनिष्ठ दृष्टिकोनाचा प्रयत्न दिसतो आणि विश्वाच्या प्रत्येक लहान सहान भागाकडे विचारपूर्वक पहाण्याची वृत्तीही आढळते. ) एक आजही बराच प्रचलित असा खुळा समज कायमचा निकालांत काढतें. हा समज असा कीं अमेरिकन मनाला 'ॲब्स्ट्रॅक्ट' गोष्टींचा जात्या तिटकारा असतो, आणि निर्विकार, अखंड चिंतनाचा कंटाळा वाटतो.

हें सारें लेखन बाहेरल्या म्हणजे युरोपांत निर्माण झालेल्या विविध बौद्धिक प्रवाहांवर असें ना तसें बरेंच विसंबलें आहे हें खरें; तरीही तें स्वतंत्र आणि अस्सल आहे. कारण या लेखनांत बराच भरीव आणि मोठा तात्विक आशय अमेरिकेंतल्या नैतिक आणि सांस्कृतिक पार्श्व-भूमीवर मांडून, पडताळून, नव्यानें जोखून आणि वेगळ्या प्रकारें रचून त्याला स्वतंत्र तात्त्विक सिद्धांतांचें स्वरूप आणलें आहे. आणि आज, हर्बर्ट श्नेडर म्हणतात त्याप्रमाणें, नव्या पिढीकडून अमेरिकन तत्त्वज्ञानाच्या ग्रंथांत एक पूर्णतया नवें प्रकरण लिहिलें जात आहेत. इथें आज एक

'मॅटॅफिजिकल सोसायटी' आणि 'रिव्हयू ऑफ मेटॅफिजिक्स' सारखें नियतकालिक असणें हीच फार मोठी गोष्ट आहे. मानवी बुद्धीला आकळणारें शास्त्र एवढेंच एकमेव खरें ज्ञान असल्याच्या समजुतीविरुद्ध आणि सर्व प्रकारच्या 'पॉजिटिव्हिजम' विरुद्ध या दोहोंनीं ठाम भूमिका घेतली आहे. मॉर्टिमर ॲडलरनें अगदीं योग्य तेंच म्हटलें कीं "अमेरिका तत्त्वज्ञानापुरती आतां स्वतःच्या पायांवर उभी राहिली आहे हें नाकारून चालणार नाहीं. युरोपीय देशाच्या तुलनेनें आज कमी पडत आहे तो या बाबतींतला सार्वजनिक उत्साह आणि सहभाग; त्याचप्रमाणें देशाच्या बौद्धिक आणि राजकीय क्षेत्रांतही तत्त्वज्ञानाचा अधिक शिरकाव होणें अवश्य आहे. परंतु हेंही लौकरच्या कालांत घडेल."

तात्पुरता या अमेरिकन जीवनपद्धतींतही एक मुद्दा असा आहे कीं त्याचा कोणाला आनंद वाटणें शक्य नाहीं. अमेरिकन जनतेचा एकूण बुद्धिजीवींकडे, त्यांतही कलावंतांकडे पहाण्याचा दृष्टिकोन हा तो मुद्दा. फ्रान्समध्यें कलावंत राजा असतो. त्याच्या प्रत्येक कृतीबद्दल सर्वांना उत्सुकता असते. मोठमोठ्या कादंबरीकारांच्या, पेण्टर्सच्या राष्ट्रीय घडामोडींवरच्या मतांबाबत लोकांत एक औत्सुक्य वसत असतें. इथें, त्याविरुद्ध परिस्थिति आहे. मोठमोठ्या व्यापाऱ्यांपेक्षां यांच्या मतांची किंमत कमी लेखण्यांत येते. इतकेंच नव्हे तर यांच्या मतांकडे संशयी नजरेनेंच पहाण्यांत येतें. चहाता आणि कलावंत यांच्यांत जसें नातें असायला हवें तसें तें उरत नाहीं. तज्ज्ञ जाणकार आणि सामान्य समाज यांच्या दरम्यान एक रसिक चहात्यांचा वर्ग असतो त्याचे आणि कलावंतांचे संबंधच रहायला हवे तसे रहात नाहींत. तज्ज्ञ जाणकारांबद्दल इतकेंच म्हणतां येईल कीं या देशांत त्यांची अभिरुचि आणि कलाविषयक आवड नेहमींच उच्च राहिली आहे. (बाहेरदेशांतून वेळोवेळीं इकडे आणविलेल्या उत्तमोत्तम कलाकृतींचीं सुंदर संग्रहालयें या बाबतींत साक्ष देतील.) सर्वसाधारण समाजाची अभिरुचि इथें इतरत्रच्या समाजाप्रमाणेंच निकृष्ट आहे. परंतु येथल्या समाजांत अधिक उच्च गोष्टी समजून घेण्याची उत्कट इच्छा आहे आणि उपयोग करून

घेतला तर तीहि फार उपयुक्त ठरेल. परंतु मी म्हणतों त्या रसिक चहात्यांच्या वर्गाचें काय ? हे लोक कलावंतांकडून निरपवाद अपेक्षा करतात ती कोणत्या ना कोणत्या स्वरूपांतल्या अव्वल दर्जाच्या बौद्धिक आनंदाची; आणि साधारणतः असें म्हणतां येईल कीं त्या बाबतींतली त्यांची पारख सहसा चुकत नाहीं. परंतु हॉटेलांतून त्यांच्याकरतां खाद्य-पदार्थ बनवणाऱ्या भटाऱ्याच्या निर्मिति-क्रियेबद्दल त्यांना जितकी उत्सुकता असते त्याहून कलावंताच्या निर्मिति–क्रियेबद्दल असत नाहीं असा माझा समज आहे. खाद्य-पदार्थांचा आस्वाद घ्यावा तसा ते कलाकृतींचा आस्वाद घेतात. परंतु निर्मितीच्या क्रियेंतले कलावंताचे अनुभव आणि शोध, त्यासाठीं त्याला सोसाव्या लागणाऱ्या व्यथा–वेदना, यांनीं कोणीही थरारत नाहीं. याचें महत्त्व जाणतात कलावंत आणि कांहीं तज्ज्ञ जाणकार.

आतां हा लगतचा भाग सोडून माझ्या मुख्य विषयाकडे पुन्हां यायचें तर, परस्पर–समंजसपणाच्या आवश्यकतेबद्दलची एक संभाव्य गल्लत इथें उल्लेखिली पाहिजे. माझ्या मतें ती लक्षणीय आहे.

कांहीं कांहीं माणसें आपल्याला भेटतात. कोणत्याही तत्त्वावर वा सिद्धांतावर अढळ आणि निर्णायक निष्ठा न ठेवणें हा ते परस्पर–समंजस-पणाच्या पालनासाठीं एक मोठा नियम समजतात. मी म्हणेन, हेच लोक सर्वांत अधिक असमंजस आणि अनुदार असतात. कारण एकाद्या गोष्टीवर निरतिशय श्रद्धा बसण्याचा प्रसंग त्यांच्यावर आलाच तर ते इतरांच्यावर त्याच श्रद्धेचा अंमल कोणत्याही भल्याबुऱ्या मार्गांनीं बसविण्याला कमी करणार नाहींत. आंधळ्या माथेफिरूपणाचें वर्तन हातून घडूं नये म्हणूनच त्यांना सांपडणारा एकमेव मार्गः सत्यापासून लपणें, अश्रद्ध आणि अज्ञान रहाणें. परिणामीं दुसऱ्या एकाद्या निरतिशय श्रद्धाळू वा एकनिष्ठ माणसाला इतरांशीं मतभेद राखून औदार्यानें नांदता येईल हें त्यांना खरें वाटत नाहीं.

असें खरोखर असतें तर श्रद्धावान्, निष्ठावान् प्राणि हा जगांतला सर्वांत मोठा हिंस्र पशु ठरला असता. परंतु प्रत्यक्षांत माणूस आपली

श्रद्धा, निसर्गनियमानुसार, आग्रहानें वा युक्तिवादानें इतरांना पटवून त्यांना आपल्याबरोबरीला आणण्याचा प्रयत्न करतो. शास्त्र घ्या, मेटॅफिजिक्स घ्या, धर्म घ्या, कोणत्याही क्षेत्रांत ' पायलेट ' प्रमाणें ' सत्य काय आहे ? ' म्हणून विचारणारा माणूस हा उदार नव्हे, मानवतेच्या उरांतला तो एक दगाबाज आहे. सत्याविषयीं आपल्या परीनें बालंबाल खात्री पटलेला माणूसच परस्पर-औदार्याची खरीखुरी भावना समजूं शकतो, दाखवूं शकतो. तीही सत्यापासून इतरेजन मुक्त आहेत म्हणून नव्हे, तर आपापल्या परीं त्याचा शोध ते घेतच आहेत आणि तसा त्यांना तो घेता आला पाहिजे या जाणीवेनें तो ती भावना दाखवतो, मतभेद वागवतो आणि सामोपचारानें नांदतो. आणि अखेर आपल्याला दिसलें तेंच सत्य त्यांनाही दिसेल असा त्याला विश्वासही असतो.

मी टीका केली तो 'सत्य काय आहे ?' पंथ, परस्पर-समजुतीच्या जिण्याकरता अश्रद्धेची आवश्यकता मानणारा पंथ, केवळ अमेरिकेंतला नाहीं— मुळांत ' केल्सेन ' नें तो प्रसवला. या देशांत आपण या प्रकारचीं मतें बरेंचदां ऐकतों तीं आचरणीय अशा गंभीर विचारांपेक्षां वरवरच्या अभिप्रायांच्या स्वरूपांतलीं असतात. प्रत्यक्षांत माणसांना इतकेंच वाटतें कीं थोड्याशा लीनतेनें, सौम्यतेनें परस्पर-औदार्याचें वातावरण निर्माण होण्याला आणि वाढण्याला मदत होते. आणि तें मात्र खरेंच आहे.

तरीही संभ्रम आणि बौद्धिक भीरुता हीं परस्परऔदार्याचीं साधनें नव्हेत. आपल्याला खरोखर लीन, नम्र करतें सत्य, त्याविषयींचें अज्ञान नव्हे. सत्याच्या आपल्या जाणीवेंतच आपल्याला अगम्य अशा अनेक गोष्टींची उत्तम जाणीवही असतेच. आणि म्हणून नम्रता अपरिहार्यपणें येते.

• • •

# २

## “ आम्ही जखमी जीव आहों ”

या नंतरचीं तीन प्रकरणें एकाच मोठ्या चौकटींत बसवण्याचा माझा विचार आहे. या तीन प्रकरणांत मी विचार करणार आहे गूढ, आध्यात्मिक मूल्य असलेल्या, अजाणता आणि सहजपणें दैनंदिन बारीक सारीक व्यवहारांच्या स्वरूपांत प्रकट होणाऱ्या, क्रिश्चन परंपरेंतल्या एका लपलेल्या वारशाचा. येथल्या माणसांच्या मनोरचनेंतल्या एका धार्मिक वैशिष्टयाची ही चर्चा आहे. आधुनिक जीवनांतल्या हिंसा आणि कुत्सिततेचा बुरख्याखालीं हें फार पुरातन क्रिश्चन वैशिष्टय या देशाच्या आत्म्याच्या तळाशीं खोलवर राहून गेलेलें आहे असें माझें म्हणणें.

या दृष्टीनें माझ्या आरंभीच्या विचारांचें शीर्षक: “ आम्ही जखमी जीव आहों.”

अत्यंत आदरणीय आणि निकटवर्ती अशा एका अमेरिकन गृहस्थानें हे शब्द माझ्यापाशीं अनेक वर्षांमागें उच्चारले होते. मला ते विशेष वाटले. त्यांनीं हा देश वसविणाऱ्यांच्या हालअपेष्टांचें आणि व्यथावेदनांचें स्मरण चाळवलें. छळवाद आणि पूर्वग्रह यांच्या कचाट्यांत सांपडल्यानंतरच्या या व्यथा–वेदनांचा, जखमांचा आणि वणांचा आध्यात्मिक वारसाच जणू ते आपल्या या वंशजांकरतां ठेवून गेले. त्या शब्दांनीं हें सुचलें कीं

या पूर्वजांच्या छळवाद आणि हालअपेष्टांमागें त्यांच्या धर्मविषयक निष्ठा होत्या. म्हणून त्यांची पारध झाली, म्हणून त्यांच्या त्यांच्या मूळ समाजांनीं त्यांना झिडकारलें, म्हणून त्यांना दारिद्य आणि विपन्नावस्था सोसावी लागली. आणि म्हणून हा देश वसवण्याकरतां ते या भूमीवर एकत्र आले.

बाहेरून येऊन इथें वसणाऱ्या आपद्ग्रस्त माणसांचें येथल्या सामाजिक जीवनांतलें मूलभूत महत्त्व आणि त्याचें कारण आतां आपल्या ध्यानीं येईल. दर दिवशीं, दर साल स्त्रीपुरुषांचे नवनवीन, मोठमोठे जथे या देशाच्या किनाऱ्याला येऊन लागतात. जगांतल्या वेगवेगळया भागांतलीं, संस्कृतीच्या वेगवेगळया थरांतलीं हीं माणसें. नैतिक छळवादानें, हालअपेष्टांनीं वा 'जुन्या जगां'तल्या दारिद्यानें जेरीला आलेलीं हीं माणसें.

त्यांचें स्वागत करणाऱ्या आणि त्यांना 'लँड ऑफ प्रॉमिस' वाटणाऱ्या या भूमीवर ते उरलीसुरली शक्ति हिच्या कारणीं लावण्याचें ठरवून येतात. या मूळ माणसांच्या हालअपेष्टा त्यांच्या मुलाबाळांच्या मनांत ताज्या रहातीलच; त्याचबरोबर येथल्या उत्साहांत, आशावादांत, कर्तृत्वांत तीं आपला वांटा उचलतील आणि इथेंच समरस होतील. प्रत्यहीं येणाऱ्या या निर्वासितांच्या पहिल्या पिढ्यांच्या अश्रूंनीं आणि कष्टांनीं अमेरिकेची ही भूमि वारंवार स्वच्छ, सकस आणि सुपीक होत असते असें म्हटलें तर वावगें ठरणार नाहीं.

महत्त्वाची गोष्ट ही कीं या माणसांचे हे अश्रु वांया जात नाहींत. त्यांचा होतो नवा आशावाद आणि सृजनशीलता. मानवी जीवन अधिकाधिक सुधारण्याच्या, जीवन अधिकाधिक सुसह्य बनविण्याच्या अखंड आणि मोठ्या धडपडीकरतां असे अश्रू कामीं लागतात. या देशाचें हें एक मोठें वैशिष्टय मानलें जावें.

परंतु कंगालांच्या आणि व्यथितांच्या हालअपेष्टांचें आणि अश्रूंचें नव्या सामर्थ्यांत, नव्या आशावादांत रूपांतर होत असतें, याचा वस्तुनिष्ठ खुलासा काय ? खुलासा आहे तो एकचः येथल्या सामाजिक, राजकीय आणि इतर जीवनांत अस्तित्वांत असलेली अस्सल क्रिश्चन कुळी.

धर्मांच्या आणि ईश्वरी प्रेरणेच्या छायेंतच हें शक्य असतें आणि मानवाच्या इतिहासांत याला कांहीं अर्थ प्राप्त होतो.

मी ज्या उक्तीच्या संदर्भांत बोलतों आहे त्या उक्तींतली 'जखम' आध्यात्मिक आहे. मानवी आत्म्याला हळवा आणि दयार्द्र बनवतात त्या जखमा आध्यात्मिकच असतात. दैनंदिन व्यवहार आणि संभाषणांतल्या भौतिक लाभाच्या अखंड शोधापोटच्या कठोर आणि निर्दय वागण्यापलिकडे, अमेरिकन समाजमनांत पीडितांविषयीं, जी एक दयेची, जबाबदारीची जाणीव नेहमींच मोठ्या प्रमाणावर दिसते तिचें सर्वांत महत्त्वाचें कारण अशा तऱ्हेनें आपल्या हातीं येतें. या वाक्यांत—'आम्हीं जखमी जीव आहों' या वाक्यांत तें दडलें आहे. कित्येकदां ज्यांच्या ध्यानीं मनींही धर्म वा बायबल नसतें त्यांच्या रक्तांत हा असा या दोहोंचा एक महत्त्वाचा अंश कायम रुजून बसला आहे. आत्म्याच्या अस्तित्वाचा तो भाग झाला आहे. त्यावर अनेक सर्वसामान्य स्वार्थी इच्छा आकांक्षांचीं आणि इतर गोष्टींची आवरणें पडलीं आहेत त्यामुळें तो एरवीं बिलकुल दिसत नाहीं, भासत नाहीं. वैयक्तिक स्वरूपांत शोधूनही अनेकदां न मिळणारा हा धर्माचा उदात्त अंश राष्ट्र म्हणून आपण अमेरिकेचा अभ्यास करूं लागतों तेव्हां नेमका आढळतो. या कंगाल आणि बकाल जगांत इतकी पवित्र गोष्ट आज कुणा माणसांच्या अंतरीं वागते वावरते आहे याहून मोठा दिलासा तो कोणता ?

थोडा मागें मी, बाहेरून येथें कायम रहाण्याकरतां येणाऱ्या माणसांच्या महत्त्वाविषयीं म्हणालों. देशाची लोकसंख्या जसजशी दाट होईल तसतसा केव्हां ना केव्हां हा बाहेरच्या माणसांच्या वसनाचा प्रश्न अधिकाधिक बिकट होऊन बसेल. अशा स्थितींत, अमेरिकन संस्कृतीला प्रत्यहीं नवजीवन देणारा हा झरा आटणार नाहीं एवढी आशाच फक्त करायची. अमेरिकन जीवनांत बाहेरून येऊन मिसळणाऱ्या कंगाल आणि

पीडितांच्या अश्रूंचें आणि हालअपेष्टांचें येथलें खतपाणी गेलें तर अमेरिकेच्या आध्यात्मिक वैशिष्ट्याचा एक मोक्याचा भागच उणा होईल.

मी केलेल्या एवढ्या विवेचनावरून, मुख्यतः मध्यम–वर्गीय असलेलें हें राष्ट्र कोणत्याही दृष्टीनें 'बूर्ज्वा' राष्ट्र कां नाहीं त्याचें कारण उमगेल. आणखीही एक कारण आहे आणि तें समाजशास्त्रीय आहे. त्याचें विवेचन मी पुढें करीन.

अशा प्रकारें, आपल्यांत दरोडेखोर आहेत, नफेबाज आहेत, लुच्चे लफंगे आहेत, दुष्ट बुद्धीचे वकील आहेत आणि जुगारी आहेत, अवैध मार्गांनीं समाजांत उत्कर्ष साधूं पहाणारे संधिसाधु आहेत, सस्ते राजकारणी, इरसाल धंदेवाले, पुरुषी स्त्रिया, फॅशनेबल सधन माणसें, हें सारें आहे पण एक गोष्ट नाहीं. 'बूर्ज्वाजी' नाहीं. आपल्या या देशाला हा वर आहे.

• • •

## प्रतीकात्मक स्मित

सेंट तेरेसा ऑफ ॲव्हिलाचें एक वचन आहे : "काव्य नसतें तर जीवन असह्य झालें असतें." मला त्याचें वैशिष्ट्य अधिकच जाणवतें.

जीवनाचा भौतिक भाग अधिकाधिक संपन्न करतांनाच या देशांत जीवन सुसह्य करण्याचाही धीमा परंतु महान् प्रयत्न चालू आहे.

इथें जातां जातांच हें नमूद करायला हवें कीं या प्रयत्नांत आहे याच जीवनाकडे अधिकाधिक आशावादीपणें पहाण्याचा प्रयत्न नाहीं. कारण आहे हें जीवन तर बदललें पाहिजे.

तर मग, माझ्या स्वतःच्या प्रतिक्रियांकडे वळायचें झाल्यास, मी म्हणेन कीं या दिशेबांत अमेरिकेवर करण्यांत येणारे आधिभौतिकतेचे आणि अमानुष तंत्रशाहीचे—टेक्नोक्रॅसीचे— आरोप अन्यायाचे वाटतात. हें खरें कीं

जगांतल्या दुसऱ्या कोणत्याही औद्योगिक संस्कृतींतल्या देशाप्रमाणें येथेंही आधिभौतिकवादी तंत्रशाहीचा कमजास्त मोह रहाणारच. परंतु अधिक औद्योगीकरणामुळें येथें हा मोह मोठ्या प्रमाणावर असेल हा समज मात्र खोटा. उलट अमेरिकेलाच तो अधिक प्रमाणांत टाळतां येईल कारण आरंभापासूनच या देशाचे प्रयत्न माणसाच्या भल्याचे—आपल्यांतल्या प्रत्येकाच्या अस्तित्वांतल्या अपरिहार्य 'माणसा'च्या भल्याचे—रहात आले आहेत. या माणसाची नम्र अस्मिता पूर्वापार महत्त्वाची मानण्यांत आली आहे.

मोठे बँक अकौंट्स आणि उत्कृष्ट मद्याचा सांठा जवळ बाळगणाऱ्या उच्चभ्रू युरोपियनांना अमेरिकेंतल्या बहुसंख्य घरांतल्या बाथटब्ज, स्वैपाकाचीं साधनें, व्हॅक्यूम क्लीनर्स इत्यादि यांत्रिक साधनांची थट्टा करणें सोपें आहे, (हेच लोक शक्य त्या संधीला हीं साधनें प्रथम विकत घेतील!) परंतु सर्वसामान्य माणसांना या साधनांमुळें दैनंदिन जीवन थोडें तरी हलकें वाटतें आणि केवळ गृहकृत्यांपलिकडे अधिक आवडीचें कांहीं करण्याला माणसें यामुळें थोडींबहुत मोकळीं होतात. त्याचप्रमाणें घराच्या सुधारणांनीं माणसाला अधिक उजवी नैतिक परिस्थिति आणि कौटुंबिक जीवन उपलब्ध होतें. आणि एकंदरीनें बोलायचें तर, बहुसंख्य जनतेपर्यंत पोंचणाऱ्या या सुधारणांनीं अगदीं प्राथमिक पातळीवरच माणसांच्या मनांत आंतरिक मुक्तीची भावना प्रस्थापित होते.

उदाहरणार्थ, इथली स्त्री स्वस्त किंमतीच्या कपड्यांतही भरपूर आकर्षक स्वरूप धारण करूं शकते. आणि अनाकर्षक कपड्यांमुळें आपणाला कमीपणा येऊं नये अशी कोणत्याही स्त्रीची किती उत्कट इच्छा असते तें सर्वांनाच माहीत आहे.

जीवन सुसह्य करण्याचा येथला ध्यास, माझ्या मतें, अमेरिकन माणसाच्या स्मितांत चांगला व्यक्त होतो.

येथल्या रस्त्यांवर हंसरे, सस्मित चेहरे तुम्ही पहातां. नकळत अशा अनेक चेहऱ्यांच्या दर्शनानें तुमची वृत्ति खुलण्याला मोठी मदत होते. अर्थात या स्मिताला वा हास्याला व्यक्तीगणिक कोणताही वेगळा अर्थ असत नाहीं आणि त्यांत खोटेपणा फार असतो हें खरें; परंतु तो येथें जमेला धरण्यांत आला आहे. एका छोट्या गांवीं माझा दंतवैद्य होता. त्याच्याकडल्या नर्सेसना गिऱ्हाइकांशीं कसें वागावें याचें इतकें उत्तम

शिक्षण दिलें होतें कीं त्यांच्या रुंद स्मितानें आणि अविचल उत्साहानें माणसाला दिपल्यासारखें व्हायचें. मग दिवास्वप्नांतल्यासारखें असें वाटूं लागायचें कीं या असल्या सुंदर, उल्हसित, स्वर्गीय वातावरणांत मरण आलें तरी चालेल. त्यांतच सुख वाटेल. मरणाचें कांहीं वाटणार नाहीं. रिलॅक्स—टेक इट ईझी—झालं, संपलं. मग या स्वच्छ, उत्साही वातावरणांत प्रेत म्हणून मजेंत पडून रहाणं. भोंवती या नर्सेसची गोड किलबिल...

मृत्यूची क्रिश्चन कल्पना मनांतून ढळूं न देण्याकरतां मला या डेंटिस्टकडे जाणें सोडावें लागलें.

आणखी एक आठवण माझ्याकडे आहे. १९४० मधल्या एका दिवशीं फ्रान्सवर जर्मन आक्रमण झाल्याची वार्ता आली तेव्हां मी वॉशिंग्टनमध्यें होतों. अगदीं एकटें एकटें वाटत होतें. अनेक वैयक्तिक चिंता आणि एकूण मानसिक दडपण यांनीं मी कसा चुरगळून गेलों होतों. मनाच्या अशा अवस्थेंत एका छोट्या हॉटेलांत मी जेवण घ्यावें म्हणून गेलों. दिमतीला एक 'वेट्रेस' आली, तिच्या जिविणीवर गोडसें ठरीव अमेरिकन स्मित होतें. मला पुरतें कळत होतें कीं हें स्मित पार खोटें आहे आणि तरीही मला फार बरें वाटूं लागलें. या कृत्रिम पण गोड स्मिताहून अधिक अपेक्षा बाळगण्यांत अर्थ नाहीं हें कळत होतें त्यामुळें अपेक्षा-भंगाचा प्रश्नच नव्हता. त्यामुळें तर अधिकच बरें वाटलें.

आणि एकाएकी मला या 'प्रतीका' चा अर्थ उमगला. या देशांतली सर्वसाधारण, प्राथमिक, आणि खोलवर रुजलेली मनुष्यमात्राविषयींची बंधुभावनाच या खोट्या स्मितामागेंही होती. अखेर एकटें वाटणें, खचल्यासारखें वाटणें ही केवळ एक घटना होती. दारुण निराशेविरुद्ध मला या 'वेट्रेस' नें अशा प्रकारें त्या दिवशीं केलेल्या सहाय्याबद्दल मी तिचा कृतज्ञ आहे.

या अमेरिकन स्मितामागें एका आध्यात्मिक भावना असते—मानवाबद्दल कणव, जीवन सुसह्य करण्याची आंस. अत्याधुनिक यंत्रप्रधानतेच्या कचाट्यांतही अजिंक्य राहिलेल्या मानवी आत्म्याचा त्या राक्षसी यंत्रांना जबाब म्हणजेच हें स्मित.

● ● ●

रा. क्र. ९७६०

## अमेरिकन ' यात्रा '

या देशांत एका मजेशीर विरोधाला आपल्याला तोंड द्यावें लागत आहे. या जगाविषयीं कळकळ बाळगण्यांत, त्याच्या साधनसंपत्तीबद्दल आस्था दाखवण्यांत, त्याबाबत स्वतः कांहीं करण्यांत, तें बदलण्यांत (त्याचा अधिक उपभोग मिळावा म्हणून नव्हे, तें उजवें व्हावें म्हणून.) अमेरिकनांइतका पुढाकार कोणीही घेत नसेल. त्याच वेळीं त्यांच्यांत कोणाला एक प्रकारची विचित्र विरक्ती, अलिप्तता जाणवते.

स्वतःच्याच देशांत अमेरिकन्स यात्रेकरू असून कोणत्या तरी एका स्वप्नानें सारखे डिवचले जात आहेत असें वाटतें. सारखें त्यांचें आपलें कांहीं तरी चाललेलें असतें. जरा म्हणून स्वस्थता त्यांच्या जिवाला नाहीं. नवीन कामेंही पत्करतील आणि गांठीला असतें तें गमावण्याचीही मानसिक तयारी ठेवतील. अमेरिकेंत ते अद्याप तसे ' कायम ' झालेले नाहींत, त्यांची तिथें प्रस्थापना झाली आहे इतकेंच. युद्धापासूनच सुरक्षिततेच्या आणि स्थैर्याच्या ध्येयाच्या दृष्टीनें झटणारा एक मतप्रवाह प्रादुर्भूत झाला आहे. तरीही अद्याप ते खऱ्या अर्थानें बिलकुल ' कायम ' आणि स्थिर झालेले नाहींत.

या देशांतल्या मुबलक छोट्या छोट्या लांकडी घरांत मला, मी म्हणतों त्या, मनाच्या आध्यात्मिक ठेवणीच्या वैशिष्ट्याचा आढळ होतो. हीं घरें म्हणजे केबिन्स—कांहीं वर्षांत निकामी होणाऱ्या. तीं पहातांना कोणालाही सेंट पॉलच्या वचनाची आठवण होते. ' जणूं स्वतःच्या नसलेल्या जमिनीवर राहुटींत रहात असलेला...'

तुम्हांला माहीतच असेल कीं केवळ नव्वद वर्षांचा ' लीज ' असलेल्या 'प्लॉट'वर रॉकफेलर सेंटर बांधण्यांत आला होता. वाळवंटांतल्या

राहुटीइतकीच, काळाच्या धांवेंत शतकांच्या हिशेबांत टिकण्याची कुवत न्युयॉर्कमधल्या ‘ स्कायस्क्रेपर ’ मध्यें असते.

आणि आतां न्युयॉर्कभर अमेरिकन्स जुनीं घरें पाडून नवीं उभारीत आहेत. न्युयॉर्क नव्यानें उभें रहातें आहे.

क्षणभंगुरतेची, काळाच्या धांवेची आणि पृथ्वीवरच्या सगळ्यावरच्या कालाच्या प्रभुत्वाची जाणीव, यांचा खुलासा करायचा तर तो केवळ उपयुक्ततावादी शब्दप्रयोगांनींच करता येईल. या जाणीवेंतूनच कदाचित् बदलाची, क्षणभंगुरतेची पूजाही होऊं लागेल. यांतूनच, बौद्धिक, वैचारिक क्षेत्रांत कोणत्याही परंपरेविषयीं भय, कोणत्याहि टिकाऊ मूल्याची नावड इत्यादि लक्षणें दाखविणारी मनोरचनाही उद्भवेल. परंतु अशी मनोरचना उद्भल्यास ती मी म्हणतों त्या आंतरिक मानसिक अवस्थेचें अधोगत स्वरूपच ठरेल. या मानसिक अवस्थेचें अव्वल महत्त्व ठरवायचें तर क्रिश्चन विरक्तीशीं, क्रिश्चन धर्मांतल्या नश्वरतेच्या कल्पनेशीं तिची तुलना करावी लागेल. अधिक उजवें कांहीं यायचें असेल तर आहे हें जायलाच हवें.

या क्षणभंगुरतेच्या आणि नश्वरतेच्या भावनेंत आध्यात्मिक मूळ असलेली जाणीवच अखेर कोणालाही दिसूं लागेल. दैनंदिन जीवनांत याचेंच प्रतिबिंब सांपडतें.

• • •

## अमेरिकन विनय

जगांतली सर्वांत मोठी मोटार किंवा सर्वांत प्रचंड उद्योगधंदा आपल्या हातीं आहे म्हणून बढाई फुंकणारा 'यांकी.' हें चित्र माझ्या मतें मोठें गैरसमज निर्माण करणारें आहे. अमेरिकन विद्यार्थ्यांच्या सहवासांत मी वेगळेंच कांहीं अनुभवलें. त्यांच्या विनयाचा, भिडस्तपणाचा परिणाम माझ्यावर फार झाला. त्या त्या विषयावरल्या इतर तज्ज्ञांचीं मतें साकल्यानें माहीत करून घेतल्याविना दिलेल्या स्वतःच्या एकाद्या मताला कोणी किंमत दिली तर त्यांना त्याचें मनापासून नवल वाटे.

बरोबरीच्या सहकाऱ्यांविषयींचा माझा अनुभव असाच आहे. प्रिन्स्टन-च्या ग्रॅज्युएट स्कूलमधला माझा एक विद्यार्थी जेसुइट फादर होता. आरंभाआरंभाला प्राध्यापक आणि तो फादर यांच्यांत वारंवार खटके उडत. थॉमस ॲक्विनॉसविषयीं (बराच चांगला) प्रबंध लिहून प्रिन्स्टनमधून पीएचडी मिळवणारा तो पहिलाच जेसुइट फादर असावा. पुढें पुढें मात्र प्राध्यापक आणि तो यांच्या दरम्यान परस्परांविषयीं आदर वेगानें वाढत गेला आणि माझा एक प्राध्यापक स्नेही मला एक दिवशीं म्हणाला, "तुमचा तो जेसुइट फादर आपल्याला फार पसंत आहे. आमच्या चर्चा मोठ्या चांगल्या असतात. त्याची विचारपद्धति अस्सल अमेरिकन आहे. त्याच्याकडे सारीं उत्तरें तयार नाहींत आणि केव्हांही तो 'मला माहीत नाहीं' म्हणून कबूल करतो."

पुढें मला कळलें कीं स्वतःच्या मतांबाबत ठामपणाचा अभाव आणि अविश्वास हा सर्वसाधारण अमेरिकन वृत्तीचा एक भाग होता. तरी पण मला

या देशांतले कोठल्याही माहितीविना युरोपीय राष्ट्रांबाबत तुच्छतेचे वा कडक शेरे मारणारे महाभागही परिचित आहेत. माझ्या या प्रतिक्रियेंत सत्यांश असल्यास, असें म्हणायला हवें कीं हे महाभाग (यांचें प्रमाण माझ्या मतें घटत आहे) मनाची एक 'अन्‌अमेरिकन'—विजातीय रचना सिद्ध करतात. प्रत्यक्ष जीवनांत जीवनापुढें आणि वस्तुस्थितीपुढें अमेरिकन नेहमींच विनयशील आणि नम्र असतो. हा गुण नैतिक दृष्ट्या फार मोठा आणि महत्त्वाचा आहे.

वस्तुजाताच्या रचनेंतली गुंतागुंत, आपल्या नजरेंत न मावणारी जीवनाची पृथगात्मता, आणि एकाद्या वस्तुस्थितीला असलेले, आपले अंदाज खोटे पाडणारे अनेकानेक पैलू, यांच्या परिपूर्ण जाणीवेंतून माझ्या मतें हा गुण विकसित होतो. म्हणूनच कोणताहि निर्णय घेण्याआधीं साकल्यानें विचार; 'ब्लूप्रिंट्स' बद्दलची आवड; युरोपीयांच्या नाकीं दम आणणारा प्रारंभिक पूर्वतयारींतला धीमेपणा; आणि प्रत्यक्ष अंमलबजावणींत पराकाष्ठेची त्वरा आणि निश्चयीपणा; अखंड बदल, नवीनीकरण आणि ऐतिहासिक विकासाशीं जमवून घेण्याच्या प्रयत्नांचें असामान्य सामर्थ्य.

•

या सावध विनयशीलतेचा संबंध अपरिहार्यपणें 'प्रयोगात्मक मनोभूमिके' शीं–experimental approach शीं–असतो. या 'ॲप्रोच'च्या बाबतींत, सर्व प्रकारचा प्रत्यक्ष पुरावा, सर्व प्रकारचे दृष्टिकोन आणि मतमतांतरें विचारांत घेऊनच निर्णय घेण्यांत येतो–तोही तात्पुरता.

आतां असें पाहूं : एकाद्याच कल्पनेनें, ती अचूक ठरली तर, अनेकानेक कष्टप्रद अनुभवांचा आपला त्रास वांचण्याचा संभव एकेकदां असतो. (म्हणूनच फ्रेंचमन स्वतःच्या कल्पनेपासून प्रत्येक गोष्टीला आरंभ करीत असतो.) परंतु त्यासाठीं ती कल्पना बरोबर ठरायला हवी. ती चुकली तर दुप्पट कष्ट, दुप्पट त्रास. अशा प्रकारें कोणत्याही तत्त्वज्ञानाविषयीं जाणता अविश्वास ही व्यवहारांत उपयुक्तच गोष्ट ठरते. विशेषतः कोणत्याहि नव्या विचाराचा वा कल्पनेचा शोध लागतो तेव्हां त्या कल्पनेबरोबरच

अनुक्रम 26018 क्रमांक 1231 दि. 1956 ९४/५८

एक फसवी हुलकावणीही आपल्या डोक्यांत आली आहे हें अशा वेळीं माणसानें ध्यानीं बाळगलें पाहिजे.

या देशांत तत्त्वज्ञानाविषयींचा सर्वसामान्य अविश्वास, अंदाज घेतां न येणाऱ्या आणि सुधारावयाच्या वस्तुस्थितीबाबतच्या मी म्हणतों त्या उत्कट मर्यादशीलतेच्या भावनेंतून निघत असतो. केवळ प्रयोगात्मक धडपडींतून तो निघत नाहीं.

तरीही–चित्राची ही दुसरी बाजू–हाच अविश्वास आंधळ्या, प्रयोगात्मक धडपडीकडे वळण्याचा, त्यांतून पद्धतशीर कल्पनांविषयीं, विचारांविषयीं एक भय निर्माण होण्याचा संभव मोठा असतो. ही मनोरचना–नवकल्पनांच्या आणि बौद्धिक उत्स्फूर्ततेच्या भयानें ग्रासलेली–वाढली तर बौद्धिक सृजनाची हानी होण्याचा धोका–सहजच उद्भवतो. उदाहणार्थ जुन्या सिद्धांतांचे नवीन प्रयोग नव्हेत परंतु शास्त्रीय क्षेत्रांतले अति–अवघड नवे शोध यामुळें कमी लागतील किंवा थांबतील.

बद्धमूल अशा कांहीं बौद्धिक श्रद्धाही यामुळें उखडल्या जातील आणि त्या तर माणसांच्या जीवनाला फार आवश्यक आहेत.

न्याय, स्वातंत्र्य, समता, मानवी हक्क हीं स्वतंत्र समाजाचीं नैतिक मूल्यें बुद्धीला पटणारीं वस्तुनिष्ठ मूल्यें म्हणून न रहाता केवळ भावनेचा प्रश्न, राष्ट्रीय परंपरेचा प्रश्न वा वस्तुस्थितीशीं जमवून घेण्याचीं साधनें म्हणून उरतील.

मग, एकीकडे, हीं नैतिक मूल्यें व्यक्ती व्यक्तीगणिक वास करणारें त्यांचें आंतरिक सामर्थ्य गमावतील. तो केवळ ज्याच्या त्याच्या परिस्थितीचा आणि आवडीनिवडीचा वा लहरीचा प्रश्न होऊन राहील. आणि त्याच वेळीं, त्यांची सुगम सर्वव्यापकता, दुसऱ्यांच्या मनावरचा या मूल्यांचा परिणाम, त्यांचें मन जिंकण्याचें ओजस्वी, ‘ मिशनरी ’ सामर्थ्य नष्ट होईल.

इथें एका विशेष महत्त्वाच्या मुद्द्याला हात घालणें जरूर आहे. मुद्दा : अस्सल मानवी संबंधांच्या आणि व्यवहाराच्या दृष्टीनें योग्य अशा

ध्येयवादाची—खरें तर योग्य बौद्धिक अभिव्यक्तीची-किंवा निश्चित तत्त्वज्ञानाची आणि ध्येयाची आवश्यकता.

विचारांच्या द्वारें आपण इतरांच्या मनाशीं संबंध ठेवतों, व्यवहार करतों. विचारांच्या द्वारेंच आपण साध्य केलेल्या वा शोधून काढलेल्या कशाचीही कल्पना आपण प्रत्यक्ष जीवनांत इतरांना आणि स्वतःला देखील देत असतों.

आतां, विचारांबाबतचा अविश्वास, मी म्हणतों ती फार मोठी ध्येयवादात्मक मर्यादशीलता, मोठी घोक्याची ठरते ती अशीः यांतून बौद्धिक अलगता उद्भवते. अमेरिकेंतली वस्तुस्थिति, अमेरिकन समाजाचें महान् मानवी आणि सामाजिक कर्तृत्व इतर राष्ट्रांना समजावणें अशक्य होईल. तें अमेरिकेंतच बंदिस्त राहील. ध्येयवाद किंवा तत्वज्ञान जोंवर प्रत्यक्ष आणि व्यवहारांतल्या वर्तणुकीपासून खूप मागें रहातें तोंवर त्याला अमेरिकेच्या सीमांबाहेर वाट मिळणें कठीण.

• • •

## अति मर्यादशीलता

## निश्चित तत्त्वज्ञानाची जरूर

निश्चित तत्त्वज्ञानाची गरज सिद्ध करणारें एकच विशेष महत्त्वाचें उदाहरण मी इथें देईन. या देशाच्या सामाजिक क्षेत्रांतल्या कर्तृत्वांतून आणि संशोधनांतून घेतलेलें हें उदाहरण. ऐतिहासिक दृष्ट्या फार महत्त्वाच्या अशा एका अपूर्व चमत्काराबाबत मी बोलतों आहे. हा चमत्कार म्हणजे 'अव्यवस्थित अमेरिकन व्यवस्थे'चें मोठें यश : गेल्या पन्नास एक वर्षांत या देशाच्या अर्थव्यवस्थेंत घडलेली उत्क्रांति.

युरोपकडून घेतलेली उद्योगप्रधान व्यवस्था आतां या देशांत ओळखूं न येण्याइतकी बदलली आहे. अद्याप अपूर्ण असलेल्या, पृथगात्मक अवस्थेंतल्या नव्या अर्थरचनेचें तिच्यावर बरेंच वर्चस्व प्रस्थापित झालेलें असून यामुळें भांडवलशाही आणि समाजवाद या दोन्ही गोष्टी भूतकाळांत जमा होतात.

अनिर्बंध व्यापार आणि खाजगी मालकी या गोष्टी एकोणिसाव्या शतकाहून साफ वेगळ्या, एका वेगळ्या सामाजिक उपयुक्ततेच्या दृष्टीनें आतां चालतात.

या संबंधांत विशेष महत्त्वाच्या दोन घटना इथें नोंदविल्या पाहिजेत. (१) संघटित मजूर वर्गाची वाढ. (२) उद्योगधंदे आणि त्यांची व्यवस्था यांतली उत्क्रांति.

संघटित मजूरवर्गाबाबत इथें थोडें लिहिलें पाहिजे.

एका शतकामागें, तरीही या शतकाच्या आरंभीच्या फार आधीं नव्हे, येथल्या मजुरांची परिस्थिति युरोपमधल्या औद्योगिक क्रांतीच्या काळांतल्या तत्सम परिस्थितीहून बिलकुल वेगळी वा उजवी नव्हती. मार्क्सनें केलेलें कामकरीवर्गाच्या दुरवस्थेचें वर्णन तिला लागू पडत होतें. संघटनेचे आरंभीचे प्रयत्न मोडून तोडून फेकून देण्यांत येत होते—आणि कांहीं वेळा मजूरच ते मोडत होते.

विसाव्या शतकाच्या पहिल्या कांहीं दशकांत संघटनेसाठीं आणि त्याविरुद्ध शिकस्तीचे प्रयत्न करणारांचे अत्याचारी झगडे–सर्व प्रकारचे अत्याचार यांत घडत-चालूच होते. यांत विजय मिळवायचा तर तो धैर्यशाली आत्मार्पण वृत्तीनेंच–आणि अमानुषपणानें–मिळाला तर मिळणें शक्य असे. (१९०३ मध्यें दीर्घ कालपर्यंत चाललेल्या अँथ्रासाइट कोल मायनर्सच्या संपाच्या काळांत जॉर्ज एफ. बेअरनें त्याचें प्रसिद्ध 'ईश्वरी हक्का' चें पत्र लिहिलें. १९१४ त लुडलोची कत्तल झाली.)

अमेरिकेंतल्या सामाजिक कारभाराच्या प्रगतीचा परमोच्च बिंदु १९३५ च्या राष्ट्रीय मजूर संबंध कायद्यानें गांठला गेला. या कायद्यानें मजुरांना त्यांचे मूलभूत हक्क दिले. मजुरांच्या आणि त्यांच्या ताठर नेत्यांच्या कणखर प्रयत्नानीं आणि त्यागानेंच हें साधलें. या कायद्याचा आणि येथल्या एकूण सामाजिक कारभारांतल्या प्रगतीचा भाग मी म्हणतों त्या उत्क्रांतींत फार सहाय्यप्रद ठरला आहे.

आणि आतां अमेरिकन मजुरांचें सरासरी जीवनमान जगांत श्रेष्ठ मानलें जातें. त्यांच्यांतल्या बहुसंख्यांना आज मानानें आणि सुखानें जगतां येतें. संघटित मजूरवर्गाचें सामर्थ्य एवढें वाढलें आहे (आर्थिक ताकदीच्या जोरावर त्यांच्या संघटनांना समाज–कल्याणाच्या संस्था, इस्पितळें, प्रसिद्धीचीं साधनें, सर्व कांहीं उपलब्ध करून घेता आलें आहे.) कीं मोठमोठ्या कार्पोरेशन्सपुढें कामगार-संघटनेचे प्रतिनिधि बरोबरीच्या नात्यानें वागतात; मालकांना नमवूं याबाबत पक्का विश्वास बाळगून असतात. या संघटनेच्या वरिष्ठ नेत्यांचें धोरण उत्पादनाची प्रगति न अडवता अधिकांत अधिक मिळेल तें

मिळवणें असें असतें. कारण या संघटनेचा व्याप वाढता, खर्च मोठा, आर्थिक मिळकत सारी मजुरांच्याच रोजगारांतून. यामुळें अधिकाधिक संपन्न होऊं पहाणारे उद्योगधंदे ही मजूर संघटनांनाही अत्यावश्यक गोष्ट वाटते. म्हणजे उद्योगधंद्यांच्या सुबत्तेला समर्थ मजूरवर्ग आवश्यक तर मजुरवर्गाच्या सामर्थ्याला उद्योगधंद्यांची सुबत्ता आवश्यक अशी ही परस्परावलंबी वस्तुस्थिति आज अस्तित्वांत आहे. अमेरिकन संघटनांत अर्थातच अंतर्गत ओढाताण आणि संघर्ष आहेतच. कांहीं युनियन्समध्यें नको असलेलीं माणसें मूळ धरून राहिलेलीं असतात; मोठ्या व्यापापोटचे आणि संस्थेचें स्वरूप येण्यांतले अनेक धोके उद्‌भवत असतातच. तें असलें तरी, आपल्याला असें धरून चालण्याला हरकत नाहीं कीं, या संघटनांची वाढती ताकद, जबाबदारीची जाणीव, भोंवतालच्या सर्वसाधारण समस्यांबाबतची वाढती मनःपूर्वकता, या जोरावर या राष्ट्राच्या आणि मानवतेच्या इतिहासांत त्या फार मोठें कार्य करून जातील.

आतां आपण उद्योगधंद्यांतल्या आणि तद्‌विषयक व्यवस्थेंतल्या उत्क्रांतीशीं येतों. अमेरिकन मजूरवर्गाच्या झटपट आणि यशस्वी उन्नतीहून ही उत्क्रांति अधिक आश्चर्यकारक मानली पाहिजे; कारण तिचा संबंध खुद्द भांडवलशाही रचनेंतल्याच बदलाशीं आहे. हीहि वैशिष्ट्यानें अमेरिकन आहे. या बाबतींत लक्षांत घेण्याजोगी एक गोष्ट म्हणजे, उद्योगधंद्यांतल्या कार्पोरेशन्स एकीकडे वाढत असता त्याच वेळीं त्यांच्यांत सखोल असा कांहीं अंतर्गत बदलही झालेला आहे; या संदर्भांत म्हणूनच एका पत्रकाराला १९५१ मध्यें कॉनिंग ग्लास वर्क्सतर्फे भरलेल्या एका परिषदेच्या संबंधांत लिहिता आलें कीं, "माझ्या पूर्ववयांत 'निष्प्राण कार्पोरेशन' हा एक नेहमींच्या प्रचारांतला शब्दप्रयोग होता. परंतु नंतरच्या आयुष्यांत यांत बदल झालेला मी पहातों आहे. कार्पोरेशन्समध्यें 'प्राण' आला आहे कीं काय तें मला माहीत नाहीं, परंतु त्यांच्यांत 'हुषारी' मात्र आली आहे." सामुदायिक प्रमाणावर

घडलेल्या आणि चालविल्या जाणाऱ्या या मोठ्या संघटना अद्यापही स्टॉकहोल्डर्सच्या डिव्हिडंडबद्दलच आवडीनें विचार करीत असतात; परंतु तेवढाच विचार त्या करीत नाहींत; किंवा त्यालाच अग्रस्थानही देत नाहींत. कारण निव्वळ अस्तित्व टिकविण्यासाठीं आणि उत्पादन-क्षम रहाण्यासाठींही आपल्याला अधिकाधिक समाजाभिमुख आणि समाजकल्याण-तत्पर राहिलें पाहिजे हें त्यांना पटलें आहे. अशा तऱ्हेनें, कोठल्याही मानवतायुक्त उच्च भावनेपोटीं नव्हे, तर स्वार्थाच्या धूर्त हिशेबापोटींच, स्वतःच्या 'अस्तित्वासाठीं औदार्य' या मानवी नियमानें या मोठ्या संस्थांतून मानवी कल्याणाच्या विचाराला-केवळ संबंधित मानवांपुरत्याच नव्हे तर एकूण समाजाच्या कल्याणाच्या विचाराला-अधिकाधिक महत्त्व प्राप्त होत आहे. मी असें मात्र म्हणत नाहीं कीं स्वतःच्या कल्याणाहून समाजकल्याणाला या संस्थांतून अधिक महत्त्व दिलें जात असेल-इतकेंच खरें कीं आपल्या कल्याणार्थ समाज-कल्याणाचें कार्य हितप्रत ठरतें हें त्यांना उमजलें आहे.

'फॉर्च्युन' मासिकाच्या संपादकांनीं त्यांच्या 'U. S. A.-The Permanent Revolution' या पुस्तकाच्या जाहिरातींत म्हटलें होतें त्याप्रमाणें 'उद्योगपति मृत झाला आहे'-किंवा होत आहे. परि-णामीं, या कार्पोरेशन्सचें स्वरूप उत्तरोत्तर स्वयंशासित समाज-गटांचें होत असून एकहाती कारभाराच्या जागीं सामुदायिक कारभाराची नवी घडी निर्माण होत आहे; यामुळेंच अंतर्गत गुंतागुंत आणि बदल वाढून एक नवेंच कार्य त्यांच्यामार्फत घडून येऊं लागलें आहे. मानवी संबंधांतल्या मार्गदर्शनाचें हें कार्य. विशिष्ट उद्योगधंद्यांच्या विविध शाखोपशाखांना व्यवहारोपयोगी मानसशास्त्र या संस्थांमार्फत शिकविलें जाऊं लागलें आहे. या शाखोपशाखांत परस्पर-मेळाचें आणि समंजसतेचें वातावरण या संस्थांमार्फत पसरतें आहे.

योजकता भरपूर आढळते. उत्स्फूर्त (प्रत्येक मोठ्या कार्पोरेशनच्या पदरीं पगारी अर्थशास्त्रज्ञ हल्लीं ठेवलेले असतात.) आणि राज्य आणि मध्य सरकारच्या कायदेकानूंशीं निगडित असें तिचें दुहेरी स्वरूप दिसतें.

व्यवस्थापक आणि मजूर यांतले निर्दय आणि कडाक्याचे संघर्ष संपले

असून त्यांच्यांत एक नवा संबंध प्रस्थापित झाला आहे. हा शंभर टक्के खेळीमेळीचा नाहीं. दुराग्रही वृत्ति अद्याप मोठ्या प्रमाणावर दिसते. परंतु अखेर बघितलें तर तिच्यांतही, सहकार्याला बाध न आणणारी एक तंगी तेवढी निर्माण करण्याची ताकद राहिली आहे. बाजूनें भली मोठी सामाजिक प्रगतीही झालीच आहे. उदा० कांहीं मोठ्या उद्योगधंद्यांत मजुरांना वार्षिक कमाईची देण्यांत येणारी हमी. तसेंच कमाई आणि उत्पादनक्षमता यांची सांगड ठेवणारे करार, आजच्या मतप्रवाहाविरुद्ध एकाद्या दिवशीं मजूरवर्गाला उद्योग-व्यवस्थेंत आणि मालकींत वांटा देण्याचें सृजनशील अमेरिकन बुद्धीनें घेतलें तर मला मुळींच आश्चर्य वाटणार नाहीं. आणि तें कांहीं असलें तरी एक नक्की कीं येत्या पिढीला येथें घडलेले दिसतील त्या मोठमोठ्या बदलांत कामगार संघटनेच्या युनियनच्या स्वरूपांत आणि कार्यांत मोठा बदल झालेला दिसेल. एकूण आर्थिक घडीशीं मूलतः या संघटनांची सांगड बसून, जुन्या भांडवलशाही व्यवस्थेंत मजुरांच्या हितरक्षणार्थ निकरानें भांडणाऱ्या या संघटना नव्या आर्थिक घडींत एक आवश्यक आणि जबाबदार अशी, समतोल राखणारी ताकद म्हणून कार्य करतांना दिसतील. अमेरिकन उद्योगधंद्यांच्या घडीचा त्या बराच धीमा आणि तरीही परिणामकारक घटक होऊन रहातील.

शेवटीं, अमेरिकन जीवनांतलें एक ठळक वैशिष्ट्य, खाजगी मंडळें, अभ्यास-मंडळें, असोसिएशन्स, कमिट्या आणि असेच छोटे छोटे असंख्य खाजगी गट-यांचा विचार केला पाहिजे. समाजहिताचें एक ना एक कार्य हें यांचें उद्दिष्ट असतें. सरकारी एजन्स्या, इतर खाजगी वर्तुळें, विश्वविद्यालयें, व्यापारी क्षेत्र आणि उद्योगधंदे अशा सर्वांशीं यांचें कार्य एकजीव होण्याइतकें निगडित असतें. सबंध देशाच्या अवाढव्य प्रयत्नांचें नियमन आणि प्रत्यक्ष प्रेरणा देण्याचें कार्य यामुळें केव्हांही चुटकीसरसें आणि सातत्यानें होतें.

औद्योगिक रचनेचें मानवीकरण (Humanization of the industrial regime) या प्रचंड आणि अवघड कार्याचा हा कोठें प्रारंभ आहे. मोठ्या कार्पोरेशन्सच्या संबंधांत, मी नमूद केलेल्या सामाजिक सुधारणांमुळें कांहीं उणीवाही निर्माण झाल्या आहेत. कोणत्याही

अति प्रचंड उपक्रमांत त्या निर्माण होणें अपरिहार्यच आहे. तसेंच वरिष्ठ अधिकारी वर्गांत प्रादुर्भूत होणाऱ्या ‘प्रमोशन न्युरॉसिस’ या नव्या ‘रोगा’ चाही उल्लेख इथें केला पाहिजे. मोठ्या भांडवलाचें प्रचंड सामर्थ्य अद्याप कायमच आहे. कार्पोरेशन्स आणि त्यांच्या व्यवस्थेची यंत्रणा यांचें सामर्थ्य त्यांच्या विकासाबरोबर वाढत असतें; समाजहिताच्या दृष्टीनें कायद्यानें त्याला इतर प्रकारच्या सामर्थ्यांचा सम-तोल उपलब्ध झाला पाहिजे. प्रचंड उद्योगधंद्यांच्या सरकारशीं होणाऱ्या अधिकाधिक प्रमाणांतल्या घसटीमुळें आणि समाजहिताच्या दृष्टीनें—त्या संदर्भांत एकुण राष्ट्राच्या राजकीय हिताच्या दृष्टीनें—आपलीं कर्तव्यें काय याबाबत त्यांत होत असलेल्या वाढत्या जागृतीनें गंभीर स्वरूपाच्या कांहीं समस्या निर्माण झाल्या आहेत. कारण एक प्रकारें हे उद्योगधंदे या लोकशाही समाज-व्यवस्थेंत एक राजकीय भूमिकाच बजावूं लागले आहेत. याविषयींच्या, आणि संघटित मजूरवर्गालाही राजकीय ताकद म्हणून भविष्यकाळांत पार पाडाव्या लागणाऱ्या जबाबदारीपोटच्या साऱ्या समस्या समाधानकारक रीत्या सुटतील असें मी मानतों. परंतु या गोष्टीला फार वेळ लागेल. निःस्वार्थ असे फार प्रयत्न लागतील. लोकांचा आत्मा आणि औद्योगिक रचनेचें अपरिहार्य कार्य यांतला संघर्ष नवनवीन अवस्था आणि स्वरूपें धारण करील, आणि हें घडतांनाच शास्त्रीय प्रयत्नामुळें उद्योगधंद्यांच्या क्षेत्रांत नव्या तंत्रविषयक क्रांत्या घडून येतील. सर्वांना समान संधि या अमेरिकन आदर्शाला क्रमशः मूर्त स्वरूप येईल, सामाजिक न्यायात प्रगति घडेल. परंतु तें अनेक पिढ्यांच्या प्रयत्नांनीं होईल. परंतु रस्ता आतां खुला आहे. मूल्यें निश्चित ठरलीं आहेत. जुन्या औद्योगिक व्यवस्थेचे पाश तुटले आहेत.

मी आतां रेखाटलेलें चित्र अधिक स्पष्ट करण्याकरतां फ्रेडरिक लुई ॲलन यांच्या ‘The Big Change’ या ग्रंथांच्या अखेरच्या प्रकरणांतले कांहीं उतारे मी इथें देत आहे. हें प्रकरण १९५२ जूनच्या ‘हार्पर्स मॅगेझिन’ मध्यें प्रसिद्ध झालें आहे.

“ ‘धिस वुईक’च्या ४ मार्च १९५१ च्या अंकाकरता संपादक विल्यम आय. निकोल्स यांनीं ‘Wanted: A New Name for Capitalism’ (भांडवलशाहीच्या तत्त्वज्ञानाला नवें संबोधन हवें) या नांवाचा एक लेख लिहिला होता. आजच्या अमेरिकन अर्थव्यवस्थेला ‘कॅपिटॅलिझम’

हें संबोधन साजत नाहीं, कारण बऱ्याच-विशेषतः जगांतल्या उर्वरित भागांतल्या-लोकांच्या मनांत त्या संबोधनानें एकोणिसाव्या शतकांतली एक रानटी अर्थव्यवस्था उभी रहाते असें त्यांचें म्हणणें होतें. त्यांनीं विचारलें होतें : “ ही अर्थव्यवस्था एका शब्दांत कशी वर्णन करावी ? ही अद्याप परिपूर्ण नाहीं परंतु सतत सुधारते आहे, अधिक सुधारणेचीं लक्षणें दाखवते आहे. हिच्यांत माणसें एकत्र प्रगति करतात, एकत्र झटतात, एकत्र उभारणी करतात, सतत अधिकाधिक उत्पादन करीत असतात आणि वाढल्या उत्पन्नाचा फायदाही एकत्रच वांटून घेत असतात. हिला काय म्हणावें ? ” त्यांनीं म्हटलें होतें, आपण या बाबतींत बऱ्याच सूचना ऐकल्या आहेत. उदा० ‘ न्यू कॅपिटॅलिजम, ’ ‘ डेमॉक्रॅटिक कॅपिटॅलिजम ’ ‘ आर्थिक लोकशाही ’ औद्योगिक लोकशाही ’ ‘ डिस्ट्रीब्युटिजम ’ ‘ म्युच्युअॅलिजम ’ आणि ‘ प्रॉडक्टिव्हिजम. ’ परंतु त्याहून अधिक उजवें संबोधन हवें असें त्यांना वाटत होतें. मासिकांत एक कूपन ठेवून त्यांनीं वाचकांकडून सूचना मागवल्या.

पंधरा हजार सूचना आल्या. त्यांतला ‘ मॅनेजमेंटिज्म ’ हा शब्द मि. अॅलेन यांना पसंत पडलेला दिसतो. माझ्या मतें श्रवणमाधुर्य आणि अचूकता अशा दोन्ही दृष्टींनीं ‘ इकॉनॉमिक ह्युमॅनिजम ’ ( आर्थिक मानवतावाद ) हेंच संबोधन उजवें ठरतें.

भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या अपरिहार्य यंत्रणेमुळें, मि. अॅलेननीं म्हटलें होतें, “ या शतकाच्या आरंभाला अमेरिका ही धनवंतांना अधिक धनवंत आणि इतरांना अधिकाधिक कंगाल बनविणारी, कांहीं मूठभर भांडवलवाल्यांच्या हातीं केवळ अर्थव्यवहारांचीच नव्हे तर राजकीय व्यवहारांची देखील नाडी असलेली भूमि बनण्याचा धोका मोठ्या प्रमाणांत उद्भवला होता. ” ते पुढें म्हणतात, ( आणि याला माझ्या मतें फार महत्त्व आहे. ) “ देशाचें लोकशाही ध्येय आणि तशीच राष्ट्रीय न्यायबुद्धीदेखील निरर्थक होण्याचा समय निर्माण झाला. आणि म्हणून आम्ही हें सारें बदलण्याकरतां कामाला लागलों-क्रांतीच्या मार्गानें नव्हे, होती त्याच अर्थव्यवस्थेच्या प्रयोगात्मक अशी विविध आवृत्त्या आम्ही राबवून पाहिल्या. या शतकाच्या अगदीं सुरवातीची सुधारणा मोहीम—थिओडोर रुझवेल्ट, थोरले ल फोलेट, आणि वुड्रो वुइल्सननीं

प्रेरणा दिलेलें तें अमेरिकन जनमनाचें प्रचंड उत्थान—त्याच्यांतून आम्हांला हें समजलें कीं रूढ व्यवस्थेंतच थोडो फार मोडजोड करून—करविषयक कायदे, किमान वेतनाचे कायदे, आर्थिक मदत, विविध स्वरूपाचे वटहुकूम आणि गॅरंटीज, यांच्या आणि याशिवाय कामगार संघटनांचें दडपण, उद्योगधंद्यांच्या सूत्रधारांचे नवे नवे पवित्रे यांच्या द्वारें–आम्हीं 'आयर्न लॉ ऑफ वेजेस' निष्प्रभ केला होता, निकालांत काढला होता. सधन वर्गांपासून आम्ही कमी सधन वर्गांकडे उत्पन्नाचें आपसूक चालणारें वांटप यशस्वी रीत्या वळवलें होतें...नवें क्षितिज आम्हीं आमच्यापुढें खुलें केलें होतें : निर्धनांची क्रयशक्ति.

"माझ्या दृष्टीनें 'ग्रेट अमेरिकन डिस्कव्हरी' चा निष्कर्ष हा असा आहे. त्याचा अपरिहार्य असा पुढलाही एक परिणाम आहे. अशा तऱ्हेनें, पूर्वीं कुंचबलेलें जिणें जगणाऱ्या समाजाच्या एका मोठ्या वर्गाला तुम्ही नव्या सोयी, सवलती उपलब्ध करून दिल्यानंतर तोही येणाऱ्या संध्या पकडून आज ना उद्यां जबाबदार नागरिकांच्या पातळीप्रत पोंचणार."

अशा तऱ्हेनें या देशांत एक नवीच सामाजिक आणि आर्थिक घडी बसत असून कार्ल मार्क्सचें भविष्य तिनें खोटें पाडलें आहे. ही अस्तित्वांत आली ती मार्क्सनें उपेक्षिलेल्या, भांडवलशाहीच्या उत्क्रांतींतल्या एकाद्या अंतर्गत गरजेंतून अस्तित्वांत आली नसून अमेरिकन समाजमनाच्या सत्प्रवृत्तींतून, आणि अमेरिकेंतल्या वैचारिक आणि निर्मितिविषयक सामुदायिक प्रयत्नांतून विकसित झाली आहे.

तत्त्वज्ञानाच्या भाषेंत बोलायचें तर व्यक्तिगत स्वार्थाचा, नफ्याचा भाग अद्याप कायम आहे आणि मानवी मनाला अत्यावश्यक अशी स्फूर्ति म्हणून तो रहाणारही; परंतु त्याचें अग्रेसर महत्त्व आतां जात आहे. आणि आर्थिक वैपुल्याच्या तत्त्वावर 'करारात्मक' संबंधांतल्या नफ्यांतल्या वांटपाच्या तत्त्वाचा प्रभाव निश्चित स्वरूपांत दिसत आहे.

ही नवी सामाजिक आणि आर्थिक घडी अद्याप प्रयोगावस्थेंत आहे; अपुरी आहे. तरीही मानवी इतिहास तिनें भांडवलशाही आणि समाजवाद यांच्या पलिकडे खेंचला आहे. हाच लेखक म्हणतो त्याप्रमाणें, "अमेरिका समाजवादाकडे जात नसून समाजवादापलिकडे जात आहे...कम्युनिझमविरुद्ध आपण लढतों म्हणजे भविष्यकाळाशीं लढत नसून भूतकाळाशीं लढतों हें आपण उमजलें पाहिजे."

आधुनिक इतिहासांतलें हें एक निर्णायक सत्य होय. अमेरिकन मनाला प्रिय असणाऱ्या प्रयोगशील पद्धतीच्या भरीव यशाचाच हा पुरावा मानला पाहिजे.

हें झालें. आतां पुन्हा माझ्या मुद्याकडे मी वळतों. मुद्दा : सुयोग्य अशा तत्त्वज्ञानाची, ध्येयवादाची गरज. या संबंधांत मी विचारतों : आपण आतांच चर्चिलें त्या निर्णायक सत्याची जाणीव जगांत कोणाकोणाला आहे ?

खुद्द या देशांत देखील, घडणाऱ्या घटनांबरोबरीनें विकसित आणि परिपूर्ण होणाऱ्या तात्त्विक आणि वैचारिक सूत्रीकरणाअभावीं, सर्वसाधारण आणि अधिकृत शब्दप्रयोगांनीं अशीच कोणाचीही कल्पना होते कीं, अमेरिकेनें कम्युनिझमचें आव्हान स्वीकारलें आहे तें कम्युनिस्ट प्रचाराबरहुकूम : एक मातबर **भांडवलशाही** राष्ट्र म्हणून.

माझ्या मतें हें मोठें दुर्दैव आहे. विशेषतः अमेरिकेबाहेरच्या, "भांडवलशाही" या शब्दाचा अव्वल अर्थच जाणणाऱ्या, केवळ या शब्दाबद्दल देखील एक तिडीक बाळगणाऱ्या, आणि असल्या अनिष्ट गोष्टींकरता मरायला बिलकुल तयार नसणाऱ्या जागतिक म्हणजे आशिया, आफ्रिका आणि युरोप या खंडांतल्या जनतेच्या दृष्टीनें ही मोठीच गैरसमजमूलक बाब होऊन बसली आहे.

त्याशिवाय भाषेच्या अचूकपणाच्या दृष्टीनेंही हें गैरच आहे. कारण वास्तवांत अमेरिका भांडवशाहीच्या तत्त्वज्ञानाला संथपणें रजा देऊन कोणत्याही आकस्मिक, हिंसात्मक, विध्वंसपर क्रांतीविना विधायक, धीम्या आणि पद्धतशीरपणाचा अभाव असलेल्या एका मार्गानें त्या शब्दापलिकडे निघाली आहे.

संबंधित सत्याचा मागोवा घेणारे वा त्याबद्दल विवेचन करणारे अनेक चांगले ग्रंथ अर्थातच लिहिले गेलेले आहेत. हे चार नमुने पहा : फ्रेडरिक लुइ ॲलनचा ' द बिग चेंज.' ॲडॉल्फ बर्लेचा ' दि ट्वेंटिएथ सेंच्युरी कॅपिटॅलिस्ट रेव्होल्युशन. ' पीटर ड्रूकरचा ' दि न्यू सोसायटी.' आणि डेविड लिलिएन्थालचा 'बिग बिझिनेस : ए न्यू एरा.'

परंतु हे सारे ग्रंथ लिहिले गेले ते घटना घडून गेल्यानंतर. काय घडलें त्याचें वैचारिक आणि चिंतनपर विश्लेषण त्यांत आढळतें. झालें त्याला मार्गदर्शन करण्याची तात्त्विक स्पष्टीकरणात्मक भूमिका त्यांमागें नव्हती. माणसांचीं मनें पेटवून त्यांना कृतीस प्रवृत्त करणारे विचार त्यांत सांपडणार नाहींत. आणि शिवाय अमेरिकन प्रयोगशील पद्धतीच्या वर्णनांनीं, वैशिष्ट्यानें अमेरिकन अशा तपशिलानें ते इतके भरले आहेत कीं या देशाची जाण नसणारांना ते फारसे उपयुक्त नाहींत.

थोडक्यांत, पूर्ण विकासाला निदान एक शतक तरी लागेल अशा एका स्थित्यंतराच्या पहिल्या चाहुलीचें विश्लेषण करणारे हे ग्रंथ आहेत. याउलट, बाकी जगांतल्या जनतेला आकर्षण वाटण्याचा संभव तो या स्थित्यंतराच्या अंतिम उद्दिष्टांच्या संबंधांत.

प्रत्यक्षांत,अमेरिकेंतल्या घडामोडींशीं सतत परिचय ठेवणाऱ्या कांहीं युरोपीय विद्वानांना मी म्हणतों या स्थित्यंतराची कल्पना आहे. तेथल्या जनतेला मात्र नाहीं.

रात्रीच्या अंधारांतून तुम्ही, शेवटीं मानव जातीला जिकडे वळा-वेसें वाटेलच असे दीप घेऊन पुढें निघालां आहां. परंतु हे दीप तुम्ही केवळ प्रयोगशील मार्गाच्या, केवळ उपयुक्ततावादी वैचारिकतेच्या धुक्यांत अवगुंठित ठेवले आहेत. सर्वभर त्यांचा प्रकाश जाणवेल असें तुम्हीच कांहीं करीत नाहीं. साजेशा तत्त्वज्ञानाअभावी हे तुमचे दीप कोणाला दिसूं शकत नाहींत.

मला वाटतें, हा विनय फार होतो आहे.

हें विषयांतर उदाहरणादाखल केलें. यानें हेंच दिसतें कीं या देशानें, त्याला लाभदायक ठरलेला प्रयोगशील मार्ग कदापि सोडूं नये आणि तो तो सोडणारही नाहीं. परंतु त्याच वेळीं या मार्गाला एका परिपूर्ण आणि साजेशा निश्चित तात्त्विक बैठकीची, तत्त्वज्ञानाची जोड हवी. समजण्यासारख्या भाषेंत या मार्गामागलें उद्दिष्ट मांडलें जायला हवें.

म्हणजे प्रचाराकरतां खास कोणी तरी एक तत्त्वज्ञान बनवावें असें नव्हे. तसें न होवो! परंतु तात्त्विक भागाबद्दल वाढती जागृति मात्र हवी. कारण त्याशिवाय खरोखरीची वैचारिक देवघेव अशक्य आहे.

समाजांत हें कार्य चालू रहायचें असेल तर विचारवंतांची गरज आहे. जीवनांतल्या घडामोडींच्या आधीं जरी नव्हे तरी त्या घडत असतांना प्रत्यक्ष त्यांच्या समक्ष त्यांवर तात्त्विक विवेचन करणारे विचारवंत आज हवेत. स्वातंत्र्याचा जाहीरनामा घ्या, घटनेचें लेखन घ्या, दोन्ही वेळा ही क्रिया इतिहासाचा एक भाग म्हणून घडून गेली.

हें इथेंच स्पष्ट करूं द्या कीं त्या काळांत, पाश्चिमात्त्य जगांत उलथापालथी घडविणाऱ्या तात्त्विक चळवळींत अमेरिकेचा प्रत्यक्ष एक वांटा, एक भाग होता. कांहीं वेळा तर अमेरिकेनें पुढाकार घेतल्याचेंही दिसतें. फ्रेंच राज्यक्रांतीवर आणि तिच्या कमी वादग्रस्त वैचारिक बैठकीवर बराच परिणाम व्हावा इतकेंच या पुढाकाराचें सामर्थ्य होतें.

आजच्या परिस्थितींत, घटनांच्या धांवत्या वेगामुळें जागतिक प्रमाणांत एकादें तात्त्विक सूत्रीकरण करता येईल हें कमी संभवत असलें तरी, सामाजिक तत्त्वज्ञानाच्या स्वरूपांत, घडल्या घटनांचें व्यापक स्पष्टीकरण शक्य होईल, त्यांचा पुढील पद्धतशीर क्रमही विस्तारानें ठरवता येईल.

• • •

## प्रचंड बदनामी

अमेरिकेविषयींच्या एका विशिष्ट नावडींत, बदनामींत एक रहस्यमय आशय आणि गूढ भाव भरलेला आहे; त्याचें विश्लेषण करून पहाण्यासारखें आहे.

ही बदनामी डी. एच्. लॉरेन्स यांच्या ‘ Plumed Serpent ’ या कादंबरींतल्या खालील उताऱ्यांत व्यक्त झाली आहे तितक्या स्पष्ट

आणि परिणामकारक स्वरूपांत इतरत्र मिळणें कठीण. या कादंबरींत लेखक, केट लेस्ली या प्रमुख व्यक्तिचित्राविषयीं लिहितो :

' आणि कांहीं वेळा तिचें तिलाच कळेनासें होई कीं, ही अमेरिका म्हणजे एक मोठा मृत्यु-खंड (death-continent), युरोपीय, आशियाई आणि आफ्रिकन ' हो ' काराला बलवत्तर ' न ' कार तर नव्हे ? तिला एकेकदां ही एक प्रचंड भट्टी वाटूं लागे. या भट्टींत सृजनशील भूखंडांतलीं माणसें पुन्हां वितळवण्यांत येत—नव्या घडणीकरतां नव्हे, तर एकजिनसी मरणांत कायमचीं विलीन करण्याकरतां. तिला वाटे हें विध्वंसांचें राज्य आहे आणि इथले लोक या गूढ विध्वंसाचे दूत आहेत. माणसांतल्या आत्म्याला टोंचून टोंचून, त्याचे लचके तोडून आंतलें वाढतें बीज इथें उपटून काढून टाकण्यांत येतें. आणि मग त्याला यांत्रिक, स्वयंप्रेरित क्रियाप्रतिक्रियांचा एक जंतू म्हणून सोडून देण्यांत येतें. यामागची स्फूर्ति केवळ एकच : हरेक जित्याजागत्या स्वाभाविक प्राण्याचें मर्मस्थानच उखडून टाकण्याची पाशवी इच्छा.

" अमेरिका समजून घेण्याची हीच तर गुरुकिल्ली नसेल असें तिला अनेकदां वाटे. हा मृत्यु-खंडच होता काय, इतर भूप्रदेशांनीं घडवलें त्याचा पुनरपि नाश करणाराच हा भूप्रदेश होता काय हा प्रश्न तिला अस्वस्थ करून टाकी. केवळ ईश्वराच्या मुद्रेवरचे चक्षूच बाहेर काढण्याकरतां वखवखलेला आणि झगडणारा हा देश. अमेरिका असाच होता का ?

" आणि तिथें जाणारीं माणसें, युरोपियन्स, नीग्रोज, जपानी, चिनी, साऱ्या रंगांचीं, वंशांचीं, हीं खरोखर शुष्क, ईश्वरी अस्तित्वाला पारखीं झालेलीं, अशींच होतीं काय ? म्हणूनच कदाचित् विश्वाचा प्राणच हासडण्याचें स्वातंत्र्य जाहीर करणाऱ्या मानवी जिद्दीनें युक्त अशा या महान् नकारात्मक भूखंडाकडे तीं धांव घेत असतील. असेंच खरोखर होतें काय ? या ' नव्या जगा 'कडे लागलेल्या प्रचंड रिघीचा, शुष्क जीवितांच्या निरीश्वर लोकशाहीकडे, उत्साही नकारात्मकतेकडे चाललेल्या प्रचंड धांवेचा हाच खुलासा होता काय ? ही नकारात्मकता

—आधिभौतिकतेचा केवळ प्राणच. आणि अखेर ही अमेरिकनांची सामर्थ्यवान् नकाराची खेंच विश्वाचा आत्मा ढांसळविणार काय ?

हा विचार तिच्या मनांत वारंवार येई. ”

यांत हें स्पष्टच दिसतें कीं केटच्या निमित्तानें लॉरेन्स स्वतःचेंच मनोगत, स्वतःचे विचार, व्यथा इथें बोलून दाखवीत आहे. कलेच्या मर्यादेंतल्या इथल्या स्वप्नसदृश कल्पनेंत लेखक आणि व्यक्तिरेखा यांची सरमिसळ झालेली होती. त्यांनीं इथें अनेक प्रश्नांच्या स्वरूपांत हा आशय व्यक्त करणें, मेक्सिकन निरर्थकतेपासून (“ तो तिला सारखा खालीं खेंची, खालींच खेंची—व्यर्थतेच्या अंधाऱ्या विवरांत. ” ) भोंगळ आरंभ करून अमेरिकेंवर झेंप घेणें, अमेरिकेबाबत—म्हणजे औद्योगिक अमेरिकेच्या सारें कांहीं वितळवणाऱ्या प्रचंड भट्टीबद्दल, शंका उपस्थित करणें, या साऱ्याचा अर्थच असा कीं, त्यांच्या मनाला झपाटणाऱ्या विचाराला एखाद्या दिवास्वप्नाची केविलवाणी कटुता आणि द्विधा अवस्था चिकटून, भारून राहिली होती. डी. एच्. लॉरेन्सचा अमेरिकेविरुद्धचा हा दावा विशेषच महत्त्वाचा मानला जाणें अवश्यक होतें कारण त्याच्या द्वेषाचा, तिरस्काराचा विषय ती अमेरिका केवळ त्याच्या कल्पनेंतलीच नव्हती, तर त्याच्यासारख्या परंतु त्याच्या प्रतिभेचा अभाव असलेल्या अनेकांच्या कल्पनेंतली होती. अमेरिकेच्या या बेफाम वर्णनांतली गल्लतच मला इथें विचारांत घ्यावीशी वाटते.

खुद्द डी. एच्. लॉरेन्सच्या व्यक्तिमत्वाबाबत, माझ्या मतें, महत्त्वाची गोष्ट ही कीं मोठ्या प्रमाणांतली कोठली तरी गूढ निकड दिवसरात्र त्याचें अस्तित्व भक्षण करीत होती आणि ही गरज त्यानें रितेपणाच्या अनुभूतीकडे, स्वतःला मुक्त मानणाऱ्या लैंगिक उन्मादाच्या खूळलाव्या नकारात्मकतेकडे वळवून निष्प्रभ, निष्फळ करून टाकली. गूढतेच्या विश्वाशीं ज्या मार्गांनीं आणि साधनांनीं तो संबंध राखी ते मार्ग आणि त्या पद्धति, यांविषयीं आपणा कोणापेक्षां लेडी चॅटर्लीलाच अधिक माहिती होती. ज्यांच्या वतीनें तो बोलत असे त्या माणसांमधली गूढात्मक विफलता मात्र इतर अनंत प्रकारांनीं, आका-

रांनीं व्यक्त होतांना दिसते. नव्या स्वरूपांतल्या Quetzalcoatl विषयीं नव्या, ताज्या, जीवनदायी श्रद्धेचें तत्त्वज्ञान हें अशा जीवांना विश्रब्धतेचा एकादा क्षण पुरवूं शकणारें अनेकांपैकीं एक मृगजळ असतें.

हीं माणसें स्वतःवरच चिडलेलीं असल्यानें एकंदरीनें माणसावर, त्याच्या दैनंदिन आशा, व्यथा, कष्ट यांवर चिडचिडलेलीं असतात. तीं नेहमींच द्विधा असतात; मध्यें दुभंगलेलें, फाटलेलें नाहीं असें कांहीं त्यांना पहावत नाहीं, सहन होत नाहीं. अमेरिकेच्या ध्येय-तत्त्वांविषयीं त्यांना तिरस्कार असावा हें नैसर्गिकच होय. मानवी स्वातंत्र्य, मानवी बंधुभाव असल्या पाणचट, हलक्या ध्येयांनीं आणि तत्त्वांनीं कंटाळून त्यांचा जीव जाऊं पहातो. सामान्य माणसांचा तीं तिरस्कार करतात. ( " लॉरेन्सच्या वैचारिक भूमिकेशीं जुळती भूमिका घेणारी ' केट ' तर नक्कीच सामान्य माणसांकडे तुच्छतेनें पहाते."—विल्यम यॉर्क टिंडाल, लॉरेन्सच्या सदर पुस्तकाच्या प्रस्तावनेंत. ) तो दैनंदिन व्यवहार, रोजचे घाईगर्दीचे कार्यक्रम, ती धडपड आणि ती स्पर्धा, अनंत हातांचें तें बेचैन चलनवलन, मानवी, अतिमानवी उद्दिष्टांकरतां ( असें त्यांना वाटतें. ) आणि अखेर मानवाला साजेशा ( उत्साही नकारात्मकता असें त्यांचें याला नांव. ) अशा, सर्वांसाठीं असणाऱ्या जीवनाकरता मानवी कार्याचें तें दडपण, प्रत्येक जड पदार्थ माणसाच्या सेवेंत राबवण्याचे ते ( त्यांचें नांव : आधिभौतिकवाद. ) प्रयत्न, आणि सर्व वर्णांच्या, वंशांच्या गांजलेल्या माणसांची नव्या आशेनें विमुक्त वातावरणांत नवें जीवन जगण्याकरता लागलेली रीघ ( हिला ते शुष्क जीवांची विध्वंसाच्या जगाकडे रीघ मानतात. ) हें सारेंच त्यांना चीड आणतें. माणसाला त्याच्या आपत्तींत सहाय्य करण्याच्या इच्छेमागील विनम्र, धार्मिक प्रेम त्यांना तिडीक आणतें.

आणि मग, या साऱ्या गोष्टींवर—आणि आत्मच्छळावरही—सूड उगवण्याकरतां, त्यांच्या अभद्र कल्पनेंत, अमेरिका नांवाचा एक शुद्ध यांत्रिक-नरक ते कल्पितात. या अमेरिका नांवाच्या नरकांत केवळ यंत्रें आणि चालती प्रेतेंच जगतात, वावरतात. याला ते ' मृत्यु-खंड ' ( Death Continent ) म्हणतात.या खंडांत त्यांना नको तें, त्यांचें

मर्मस्थान फोडतें तें सारें प्रभुत्व गाजवीत असतें. नकारात्मकता—negation—हा त्याचा प्राण. जगाचें सारें सत्व, सृजनशीलतेचें बीज शोषून घेणें एवढीच त्याची वखवख. यामागली इच्छा साऱ्यांना स्वयंप्रेरित राक्षस बनवण्याची. त्यांच्या नीच कल्पनेंतल्या अमानुष अमेरिकेला ते land of 'mystic distruction,' जगाचा आत्मा हांसडूं पहाणारी शक्ति, ईश्वरी मुद्रेवरचे (म्हणजे या लोकांच्या बेगडी-ईश्वराच्या मुद्रेवरचे) चक्षू बाहेर काढूं पहाणारें सामर्थ्य इत्यादि शिव्याशाप देतात यांत आश्चर्य तें काय ?

अमेरिकेविषयीं विचार करतांना डी. एच्. लॉरेन्सच्या केटला बेचैन करणाऱ्या भयांत एक विशेष गोष्ट सूचित होते ती जरा गंभीरपणें विचारांत घेण्याजोगी आहे.

जगभरचे, नफ्यामागें असणारे व्यापारी, अमेरिकेविषयीं एक आस्था बाळगून असतील, तिच्यापासून बरेंच कांहीं शिकूं पहात असतील, तिच्या आधिभौतिक कार्याचें कौतुक करीत असतील,—त्यांना तिचा हेवा वाटतो. आणि मनापासून कधींच त्यांना ती आवडणार नाहीं, तिच्यावर ते जीव लावणार नाहींत. अस्सल आध्यात्मिकतेचा स्पर्श असलेले अनेकजण अमेरिकेविषयींच्या अज्ञानापोटीं अमेरिकेचा तिरस्कार आणि तिच्याविषयीं निंदेचेच उद्‌गार काढणार हेंही तितकेंच उघड आहे. परंतु माझ्या मतें विशेष गोष्ट अशी कीं, खरोखरीचा चिंतनशील, उच्च पातळीवर विचार करणारा आणि जगणारा, अव्वल आध्यात्मिकतेचा व्यासंग ठेवणारा, वैयक्तिक अनुभवांतून आणि रोखठोक व्यवहारांतून अमेरिकेला समजून घेणारा आणि तरीही दैवी सामर्थ्याविषयीं बाळगतो त्या आदराशीं, मानवजातीवर करतो त्या प्रेमाशीं संबद्ध असें प्रेम अमेरिकेवर न करणारा असा महाभाग मला तरी अद्याप भेटायचा आहे. या पुस्तकांत इतरत्र उल्लेखिल्या आहेत तशा सर्व मानवी उणीवा जमेला धरूनही, खरोखरीचे आध्यात्मवादी लोक अमेरिकेविषयीं एक जिव्हाळा बाळगतात. तिचे सर्वांत मोठे शत्रू : ढोंगी आध्यात्मवादी.

अमेरिकेची निंदाच करायची किंवा तिच्याविषयीं न्यायाची चाड न ठेवता द्वेषबुद्धीनेंच बोलायचें, लिहायचें तर अनेक मार्गांनीं, पद्धतींनीं तें करणें शक्य आहे. अमेरिकेला राजकीय शत्रू तर आहेतच. हे अमेरिकेविषयीं एक तिडीक बाळगून आहेत आणि ही ते जास्तींत जास्त तारस्वरानें व्यक्त करीत असतात. परंतु हेंही खरें कीं धोरणाच्या, डावपेंचांच्या दृष्टीनें योग्य वाटलें तर इतक्याच तारस्वरानें ते अमेरिकेची स्तुतीही करूं शकतात. अमेरिकेचे स्वाभाविक शत्रू ढोंगी आध्यात्मवादी. आत्म्याच्या वतीनें बोलणारे बनावट साक्षीदार. त्यांचा अमेरिकेबद्दलचा तिरस्कार सीमेचा, बिलकूल न हटणारा आणि गूढात्मक असतो.

ईश्वराचा शोध घेण्याचा मिषानें नश्वरतेंत लोळणारे, रितेपणांत तडफडणारे, आध्यात्मिक अनुभवासाठीं आसुसणारे आणि अखेर त्याऐवजीं खोट्या पर्यायांकडे वळलेले हे लोक. केवळ त्वेषांत आणि चिडीपोटींच, कुणातरी किंवा कशातरी विरुद्धच ते, साध्य करण्यांत अपयश आलेल्या आध्यात्मिकतेच्या गोष्टी झोंकूं शकतात, स्वतःला सांवरूं शकतात. त्यांच्या स्वतःच्या नैराश्याच्या आणि तळतळाटाच्या भरपाईकरतां त्यांना एक ‘ जागतिक ’ बळी हवा असतो, माणसाच्या आशा अपेक्षा वाढवणारा आणि त्यांचा मात्र अपेक्षाभंग, त्यांच्या कल्पनेंतल्या एका स्वप्नाचा भंग करण्याइतका आग्रही, तेढा, विरोधी असा एकादा समर्थ भूखंड हवा असतो.

• • •

## कांहीं अमेरिकन गैरसमजुती

या प्रकरणांत मी निर्देशिणार आहे त्या गैरसमजुती वैशिष्ट्यानें अमेरिकन बिलकुल नाहींत. परंतु या मोठ्या देशांत मला त्या मोठ्या प्रमाणावर दिसतात हें मात्र खरें. इथला त्यांचा सर्वसामान्य आढळ लक्षांत घेऊनच मी त्यांना ‘कांहीं अमेरिकन गैरसमजुती’ म्हणतों आहे.

समजूत क्रमांक एक : कांहीं कांहीं बाबतींत अमेरिकेंतली जीवन-विषयक कल्पना ही मानव आणि निसर्ग यांबाबतच्या अठराव्या शत-कांतल्या आशावादी कल्पनांचाच पुढला भाग वाटते.

प्रथमदर्शनीं असेंही वाटेल कीं या देशाची निसर्गाच्या चांगुलपणा-वर, मानवी चांगुलपणावर Rousseauist अर्थानें श्रद्धा आहे. म्हणजे निसर्ग दडपला नसता आणि त्याला मुक्त वाव देण्यांत आला असता तर सारें कसें चांगलें चाललें असतें. ( माणसाचे मूलभूत गुणधर्म आणि परिस्थितीसापेक्ष आणि व्यक्तिसापेक्ष असा प्रत्येक माणसाचा वेगळेपणा विचारांत न घेता केलेली कल्पना. ) वेगळ्या शब्दांत, आपल्या स्वभावांत पापाचें, वाईटाचें बीज मुळांत नाहीं, आणि म्हणून ईश्वरी कृपेची उणीवही नाहीं. कुठें कुठें स्वीकारण्यांत आलेल्या परंतु एकंदरीनें वरवरच राहिलेल्या या विचारसरणींत, भरीव विचार वा तर्कशुद्ध सिद्धांतांऐवजी शब्दांवर आणि संभाषणपद्धतीवर मुख्यतः विसंबून असणाऱ्या या विचारप्रणालींत, निसर्गवादाकडे-Naturalism कडे—जाणारा एक प्रवाह असा आहे कीं ज्याचा विचार आपण आधिभौतिकतेच्या भयापेक्षां गंभीरपणें केला पाहिजे. यांत असें गृहीत धरण्यांत येतें ( आजच्या जगांत सर्वसाधारणपणें सर्वत्रच. ) कीं, माणूस केव्हां ना केव्हां नैसर्गिक परिपूर्णतेच्या आणि विशुद्ध नैसर्गिक सुखाच्या अवस्थेप्रत पोंचणार आणि पापावर, वाईटावर तो कडी करील तो केवळ त्याच्या जवळील आंतरिक मानवी जोमावर, मानवी शास्त्राच्या बळावर; आणि त्याचा उद्धारकर्ता तो स्वतःच आहे. यांत भरीला अवश्य तर एक धार्मिक हमी, कीं ईश्वराला हें मंजूर आहे आणि त्याच्या कृपेचा हात यांत सदैव हजर आहे. )

तरीही या 'निसर्गवादांत'च कांहींतरी बरीच मोठी विसंगति आहे कारण यांतच एका पूर्णतया विरोधी प्रवृत्तीला आपल्याला तोंड द्यावें लागतें. ही प्रवृत्ति माझ्या मतें जुन्या कर्मठवादा ( Puritanism ) विरुद्धच्या कटुतेतून निर्माण झालेली आहे.

या वेगळ्या दृष्टिकोनांतून निसर्ग फारसा भला दिसत नाहीं. एक कल्पना अशी कीं, मानवी स्वभाव मूलतः फारसा समर्थ नाहीं, तो

दुबळा नबळा आहे—एकमेकांशीं झगडणाऱ्या पाशवी प्रवृत्ति आणि वासना—आंतून एकाद्या नैतिक जाणीवेकडून सुसूत्रपणें चालविल्या जाण्याऐवजीं बाहेरून समाजाच्या यमनियमांखालीं फक्त चिरडल्या जाणाऱ्या—म्हणजे हा मानवी स्वभाव.

परिणामीं, मानस-शास्त्रज्ञ आणि स्थापत्यविशारद नसते तर आपल्याला प्राचीन ग्रीकांसारखेंच म्हणावें लागलें असतें कीं, "माणूस न जन्मता तर फार बरें झालें असतें..."

समजूत क्रमांक दोन: यश ही आपल्या परीनें फार चांगली गोष्ट आहे आणि नीतिपर दृष्टिकोनांतून पहाता, तिच्याकरतां झटणें हें आवश्यकच आहे.

अमेरिकेंतल्या यशाच्या या कल्पनेंत वखवख नाहीं आणि 'अहं-वाद'ही नाहीं. माझ्या मतें जरूर त्याहून सरळ सोपी केलेली ती, 'यशस्वी होणें म्हणजे स-फल होणें, म्हणजेच मानसशास्त्रदृष्ट्या आणि नैतिकदृष्ट्या आपण अपयशी नाहीं हें सिद्ध करणें' अशा स्वरूपाची कल्पना आहे.

ही कल्पना फार जुनी आहे, सॉक्रेटिसनें तिचा निषेध केला होता. त्यानें तिचें स्वरूप विशद केलें होतें तें असें : माणसाच्या आध्यात्मिक जीवनाशीं असंबंधित अशा उत्तम स्नेहसंबंध, हुषारी, व्यवहारांतल्या अर्थानें चांगलें दैव, अशा बाह्य गोष्टींवर अवलंबून असणाऱ्या वर-वरच्या यशाला महत्त्व देऊन, आंतरिक अशा अस्सल मानवी सुखाकडे, सॉक्रेटिस म्हणाला होता त्याप्रमाणें 'आत्म्याच्या सौंदर्याकडे, भलेपणाकडे' दुर्लक्ष करणें.

समजूत क्रमांक तीन : या समजुतीला फार जबाबदार माणसेंही बळी पडण्याची शक्यता फार मोठी आणि याचा सारांश 'आंधळे आणि हत्ती'च्या गोष्टींतल्याप्रमाणें शेपूट किंवा पाय किंवा सोंड हाच सबंध हत्ती मानणें असा सांगता येईल.

म्हणजे असें कीं एकादें विशिष्ट उद्दिष्ट-उदा० विशिष्ट गटाचे हितसंबंध किंवा व्यापारी हितसंबंध किंवा राष्ट्रीय हितसंबंध—नेमून दिल्यानंतर वा घेतल्यानंतर, तें त्यांच्यापुरतें कितीही चांगलें असलें तरी कांहीं जबाबदार माणसें या विशिष्ट हिताला सर्वव्यापी किंवा अंतिम कल्याणाचें स्वरूप देतात आणि या उत्साहांत आपल्या वर्तनाचें औचित्य अवलंबून असणाऱ्या याहून मोठ्या आणि अधिक व्यापक अशा हिताकडे दुर्लक्ष करतात.

मग त्यांना असें वाटूं लागतें कीं त्यांच्या विशिष्ट धंद्यांत वा विशिष्ट कार्यक्षेत्रांत चांगलें तें साऱ्या अमेरिकेलाहि चांगलें, मानवतेलाही चांगलें. यावर ते बालंबाल श्रद्धा ठेवतात—अगदीं स्वच्छ मनानें. अधिक अश्रद्ध माणसांना याचा संताप येतो. परंतु यांना हेंही कळत असतें कीं खुद्द त्यांनाच त्या कार्यपद्धतींतून जावें लागतें तर कोणत्याही नैतिक समर्थनाचा विचार न करता त्यांनीं तेंच केलें असतें.

समजूत क्रमांक चार : कोणत्याही उच्चनीचतेच्या कल्पनेला समानतेच्या नांवानें विरोध करणारे तरुणतरुणी प्रत्येक प्राध्यापकाला केव्हां ना केव्हां भेटतात. ज्ञानक्षेत्रांतल्या पदव्यांच्या बाबतींतही त्यांची नापसंति असते. ( म्हणजे शास्त्राहून विद्वत्ता मोठी किंवा केमिस्ट्रीहून फिलॉसॉफी मोठी असें म्हणणें त्यांना अपमानास्पद वाटतें. )

समजूत क्रमांक पांच : कांहीं कांहीं वेळा, विचारवंत हा भयंकर रुक्ष आणि कंटाळवाणा, विटका माणूस असतो असें अमेरिकनांना वाटत असल्याचें दिसतें. त्यांच्या दृष्टीनें विचार करणें म्हणजे भारी गांभीर्याचें आणि डोकें कुरतडणारें काम.

समजूत क्रमांक सहा : कायदाच आपण मानतों; बाकी कोणत्याही माणसाला मानत, वचकत नाहीं असें समजण्याची प्रवृत्ति. यांत मग

हेंही येतें कीं कायद्याच्या नांवाखालीं आणि कायद्यानुसार कोणी माणसांना तुमच्यावर अधिकार गाजविण्याचा हक्क नसून स्वतंत्र माणसें म्हणून तुम्ही फक्त कायद्याचें राज्य—फक्त कायद्याचें राज्य—तेवढें जाणतां. आणि कायदा ही एक अघळपघळ, अॅब्स्ट्रॅक्ट अशी चैतन्यहीन, स्वतःचे हात नसलेली चीज आहे.

समजूत क्रमांक सात : विवाह म्हणजे ‘ रोमँटिक ’ प्रेमाची सुयोग्य परिपूर्ति त्याचप्रमाणें संबंधित जोडीदारांची परिपूर्ण वैयाक्तिक आत्मज्ञानाचा शोधही मानण्याची, अनेक अमेरिकनांची प्रवृत्ति.

• • •

## विवाह आणि सौख्य

आतांच मी बोलत होतों त्या अमेरिकन गैरसमजुतींपैकी अखेरची—विवाहविषयक—ही फार महत्त्वाच्या समस्यांना कारण ठरत असून वैशिष्ट्यानें विचारांत घेणें जरूर आहे.

याबाबतींत कांहीं सर्वसाधारण चर्चेच्या अनुषंगानें हा मुद्दा अधिक स्पष्ट करणें योग्य होईल. त्याचप्रमाणें सर्वप्रथम ‘ रोमँटिक ’ प्रेम म्हणून मी म्हटलें त्याचा सुस्पष्ट खुलासाही करावा लागेल.

माझ्या मनीं, ‘ रोमँटिक ’ प्रेम म्हणजे लैंगिक प्रेमच, परंतु ज्यांतून असें लैंगिक प्रेम उद्भवतें त्या पशुत्वापलिकडे तें पोहोंल्यानंतर सुयोग्य अशा मानवी भूमींत बहरणारें, मानवी अस्तित्वाचीं, भावना, विचार, सृजनशीलता अशीं मानवाच्या मूलभूत वासनेनें भिजलेलीं आणि चाळविलीं जाणारीं विविध अंगें उच्च पातळीवर नेणारें, रमणीय बनविणारें लैंगिक प्रेम म्हणजे माझ्या मतें ‘ रोमँटिक ’ प्रेम.

अशा प्रेमानें माणूस त्याच्या कल्पनेंत त्याच्या मानवी मर्यादा मागें टाकून एका काव्यमय नंदनवनांत पोंचतो आणि असेंच मानतो कीं

अनुक्रम २८०१८ क्रमांक ९२-३१ दि. १५४५- ९५१/५२०

हें जीवित यानंतर पूर्णतया आणि निरंतर आपल्या प्रिय सख्याच्याच मालकीचें; त्याच्यासाठीं जगणें, त्याच्यासाठींच मरणें. प्रत्यक्षांत मात्र ही प्रेमविषय अशी व्यक्ति इतकी प्रिय आणि श्रेष्ठ मानली जाणें प्रथमतः लैंगिक वासनेच्या पूर्तीसाठीं, लैंगिक स्वामित्वासाठीं. मुळांत लैंगिक वासना हीच या गोष्टीची प्राथमिक अत्यावश्यक अशी स्फूर्ति असते.

या रोमँटिक प्रेमाची व्याख्या कशी करता येईल ? विविध उच्च प्रतिमा धारण करणाऱ्या आणि विशुद्धतेचा आणि निःस्वार्थतेचा, विशुद्ध आणि चिरंतन प्रेमाचा आव घेतलेल्या लैंगिक वासनेची सर्वस्व व्यापणारी झिंग.

तर मग आतां, लैंगिक आकर्षण आणि तृप्ति हीच अत्यावश्यक स्फूर्ति आणि उद्दिष्ट मानल्यानंतर, असेंही म्हटलें पाहिजे कीं, 'रोमँटिक' प्रेम—l'amour passion—केवळ अतिसमर्थ अशा पाशवी गुणधर्माची सर्वव्यापी मानवी अभिव्यक्ति असल्यानें निसर्गतः तें एक तर सातत्याला, चिरस्थायीपणाला पारखें आहे. तें ओसरणेंच नैसर्गिक. दुसरें असें कीं तें निष्ठेला पारखें आहे. त्याच्या विषयांत बदल अपरिहार्य. तिसरें: तें जागृत करतें ती दुसऱ्या व्यक्तीविषयींची निःस्वार्थ प्रीति आणि त्याचाच मूलतः अहं-मय स्वभाव यांत त्याची चिरफाड आणि ओढाताण साहजिक असते.

परिणामीं, 'रोमँटिक' प्रेमावर विवाह उभारणें आणि विवाह ही 'रोमँटिक' प्रेमाची सुयोग्य परिपूर्ति असावी असें मानणें ही, मी म्हटलें त्याप्रमाणें, मोठीच गैरसमजूत मानावी लागते.

माणसाला याची जाणीव नाहीं असें नाहीं. गेलीं अनेकानेक शतकें, विवाह ही केवळ एक सामाजिक बाब मानण्यांत येत असे आणि तिचा व्यक्तिगत ओढा, व्यक्तिगत प्रेम यांच्याशीं कोणताही संबंध मानला जात नसे. यावेळीं माझ्या मनांत आहेत ते पालकांनीं कौटुंबिक हितार्थ वा जमातीच्या हितार्थ वा राजेराण्यांच्या बाबतींत राष्ट्रीय हितार्थ देखील जमवून आणलेले विवाह. यांत कांहीं वेळा विवाहवेळेआधीं वरानें वधूला वा वधूनें वराला पाहिलेलेंदेखील नसे.

या कल्पनेंत, रोमँटिक प्रेम आणि वैवाहिक प्रेम या दोन स्वतंत्र गोष्टी होत हें आणि विवाहाचें उद्दिष्ट रोमँटिक प्रेमाची सुयोग्य परिपूर्ति नव्हे हें गृहीत मानलेलें होतें तेवढ्यापुरतें एक उदासवाणें, दुष्ट असें शहाण-पण होतें.

तरी पण, इतिहासाच्या ओघांत व्यक्तीला त्याच्या वा तिच्या मूल्याची आणि महत्तेची जाणीव जसजशी अधिकाधिक होत गेली, तसतसें, त्याच प्रमाणांत विवाहाच्या या केवळ सामाजिक बाब या कल्पनेला अधिकाधिक अमानुष आणि हानीकारक स्वरूप प्राप्त झालें. कारण, विशेषतः अलिकडल्या काळांत, याचा परिणाम असा झाला कीं, अनेक बाबतींत पुरुष आणि स्त्रिया परस्पर व्यक्तिगत प्रेमाकरता, रोमँटिक प्रेमाकरता ( माणसाचें हें अंगभूत सुखस्वप्न. ) विवाहाबाहेर पाहूं लागल्या. अशा प्रकारें माणसांना समजून आलें कीं परस्पर व्यक्तिगत प्रेम आणि आरंभापुरतेंदेखील नांममात्र रोमँटिक प्रेम यांची विवाहाच्या अस्तित्वाला तशी जरूर नसली तरी विवाहाचा अत्यावश्यक असा बोज रहावा म्हणून आणि तो यशस्वी व्हावा म्हणून या गोष्टींची आवश्यकता आहेच आहे.

शेवटीं, मला दिसतो तो या गोष्टींतला वैय्यर्थ असा कीं, आरंभ-बिंदु म्हणून, प्रारंभीची स्फूर्ति म्हणून तरी वासना आणि 'रोमँटिक' प्रेम या स्वरूपांत शक्यतोंवर प्रेम हें विवाहांत जमेला असलेंच पाहिजे. एरवीं, पुढें जेव्हां जेव्हां अशा प्रेमाच्या पूर्तीची संधि विवाहबाह्य संबंधांत उद्भवेल, तेव्हां तेव्हां तें आमीष झिडकारणें, नजरेआड करणें माणसाला फार कठीण होईल. कारण, माणसाचें सर्वांत मोठें दुःख असतें तें, त्याच्याजवळ होतें तें हिरावलें गेल्याचें नव्हे, तर त्याच्याजवळ नव्हतें आणि त्याला खरोखर माहीतही नव्हतें असें कांहीं-तरी हिरावलें गेल्याचें.

दुसरें असें कीं, रोमँटिक प्रेमाच्या सुयोग्य परिपूर्तीपेक्षांही विवा-हाला मानवी अंतःकरणांत एक वेगळें कार्य करायचें असतें—कितीतरी पटीनें सखोल, अधिक रहस्यमय, 'आल्कोमिकल' असें हें कार्य असतें. म्हणजे असें कीं, विवाहाला 'रोमँटिक' प्रेमाचें वा आरंभीं

अस्तित्वांत असलेल्या त्याच्या शिल्लक भागाचें भरीव आणि अविनाशी, खरोखरी निःस्वार्थ, निरपेक्ष अशा मानवी प्रेमांत **स्थित्यंतर** घडवायचें असतें. यांत लैंगिक भाग अर्थातच वर्ज्य नसतो. परंतु लैंगिक वासनेपासून अधिकाधिक स्वतंत्रपणें, हें प्रेम वाढतें. आणि कांहीं कांहीं वेळा त्याच्या अतिउदात्त स्वरूपांत लैंगिक वासनेपासून आणि संबंधापासून पूर्णपणें विलग असें त्याचें एक आध्यात्मिक रूप प्रत्ययाला येतें. पूर्णतया दुसऱ्याच्याचकरतां एकानें दुसऱ्याला दिलेलें परिपूर्ण आणि अविनाशी दान असें हें रूप असतें.

अशा प्रकारें विवाह हें स्त्री आणि पुरुष यांच्या दरम्यानचें वाळूवर नव्हे तर खडकावर उभारलेलें, पाशवी नव्हे तर विशुद्ध मानवी, आध्यात्मिक, खरोखरी व्यक्तिगत असें प्रेमाचें नातें होऊं शकतें. यासाठीं आत्मार्पण वृत्ति आणि चुकांची प्रांजल दुरुस्ती मात्र हवी. असें घडल्यास मग भावना, संवेदना आणि विचार यांच्या एकाच मुक्त, अखंड प्रवाहांत, प्रेमाच्या बळावर, प्रत्येकाला दुसऱ्याच्या व्यक्तिगत जीवनांत, अस्तित्वांत खरोखरी सहभागी होता येईल. आणि मग प्रत्येकजण दुसऱ्याचा सदा क्षमाशील असा ' गार्डियन एंजल ' होऊं शकेल. कारण माझ्या मतें परस्पर—क्षमा-शीलतेचा धर्मांतला दंडक केवळ अतिमानवी जगालाच लागू नसून मानवी व्यवहारांत, घरगुती आणि अगदीं राजकीय अशा मूलतः नैसर्गिक संबंधांतही त्याची गरज फार मोठी आहे. वेगळ्या शब्दांत, त्या स्थितींतच प्रत्येकजण खरोखरी दुसऱ्याच्या हितार्थ आणि कल्याणार्थ आत्मार्पण वृत्तीनें झटूं शकेल.

या बऱ्याचशा सर्वसाधारण प्रतिपादनानंतर मी अमेरिकेच्या अवस्थेशीं येतों. माझ्या विषयाची सारांशानें एक रूपरेखाच तेवढी मी इथें देणार आहे—कारण तसें समाधानकारक अभ्यासानें लिहायचें तर तो एक वेगळा ग्रंथ होईल.

ग्रंथाचा विषय आला म्हणून सांगतों, किंचित् वरवरच्या परंतु चतुर आणि मौलिक अशा अभ्यासाच्या दृष्टीनें डेविड एल. कॉह्न

यांचा ‘ Love in America ’ हा ग्रंथ बराच रंजक आहे. मी तो कांहीं वर्षांमागें वाचल्याचें आठवतें.

प्रथम मी हें नमूद करतों कीं मालक आणि मजूर, गोरे आणि काळे यांच्या संबंधांपेक्षांही या देशापुरतें मी लैंगिक संबंधांना अधिक महत्त्व देतों. माझ्या दृष्टीनें हे संबंध अधिक नाट्यपूर्णही आहेत.

यानंतर, मी असें म्हणेन कीं, माझ्या दृष्टीनें अमेरिकन स्त्री-पुरुषांनीं सामाजिक महत्त्व, कौटुंबिक हितसंबंध, आर्थिक स्वार्थ इ. विचार न करता परस्पर–प्रेमावर विवाहाची प्रतिष्ठापना करण्याचा आणि हक्क आणि आब अशा दोहीं दृष्टींनीं समसमान अशा पतिपत्नींना विवाहायोगें दोन मानवी जीव म्हणून सुख प्राप्त करून देण्याचा उपक्रम जो धडाडीनें आणि सदिच्छेनें आरंभला आहे, तो श्रेष्ठच होय.

असें असलें तरी हा उपक्रम फारसा यशस्वी झाल्याचें, होत असल्याचें दिसत मात्र नाहीं याचाही विचार झालाच पाहिजे. बऱ्याच बाबतींत सदिच्छेचा शेवट दुःख आणि झगड्यांत होतो. मला वाटतें, आतां मी उल्लेखिला त्या आदर्शाचा अर्थ लावतांना झालेल्या कांहीं मूलभूत चुकीपायीं हें होत असावें. म्हणजे मुळांत आदर्श बरोबर परंतु त्याचा अर्थ चूक ( म्हणजेच प्रेम म्हणजे कुणाच्या मतें ‘ रोमँटिक ’ प्रेम आणि सुख म्हणजे व्यक्तिगत आत्मज्ञानाची पूर्ति असेल तर तें चूकच. )

माझा अखेरचा मुद्दा असा कीं, मी बोलतों आहे हा प्रश्न, हा अगणित जोडप्यांच्या सुखाच्या शोधाचा अंत भ्रमनिरासांत आणि निराशेंत करणारा प्रश्न, एकाच परिस्थितींत, मानवी व्यवहारांत शक्य त्या मर्यादेंतच, सोडविला जाऊं शकेल. अमेरिकन मनानें प्रथम त्याकरता दोन स्वतंत्र गोष्टींची जाणीव करून घेतली पाहिजे.

पहिली गोष्ट : प्रेम म्हणजे लैंगिक आकर्षण नव्हे; आणि ज्या प्रेमावर विवाह उभा करायचा तें प्रेम म्हणजे प्रथमतः लैंगिक भूक नव्हे आणि ‘ रोमँटिक ’ प्रेमही नव्हे, शरीरसुखाच्या अपेक्षेनें चढते ती झिंगही ती नव्हे—तर तें प्रेम म्हणजे अधिक सखोल, अविनाशी

प्रेम. विवाहाआधींचें ' रोमँटिक ' प्रेम मी मागें म्हटलें त्याप्रमाणें, विवाहानें या अशा मानवी प्रेमांत रूपांतरित केलें पाहिजे. या नव्या प्रेमांत लैंगिक भावना आणि भूक या प्राथमिक स्फूर्तीसारख्या, निमित्तासारख्या असतात. हें सखोल, अविनाशी प्रेम योग्य अशा मानवी आणि आध्यात्मिक पातळीवर अंकुरित आणि विकसित होतें. या पातळीवर एकजण दुसऱ्याच्या सर्वांगीण जाणीवेची आणि जोपासनेची जोखीम खुषीनें स्वीकारतें आणि पूर्णतया दुसऱ्याच्या हितार्थ, सुखार्थ आत्मार्पणपणें झटतें, झिजतें.

दुसरी गोष्ट : आपापल्या समसमान अस्मितेच्या भूमिकेवरून कोणी लग्नाकडे पाहूं लागलें आणि त्याच्या मतें त्याच्या असलेल्या व्यक्तिमत्वाच्या ( ही खरी तर स्वयंकेंद्रितता. ) जोपासनेचाच विचार आणि अपेक्षा करूं लागलें तर अखेर त्याच्या वांट्याला निराशा आणि कटुताच येणार. कारण खऱ्या मानवी प्रेमाशिवाय विवाह म्हणजे गुलामगिरीचीच अवस्था. आणि खरें मानवी प्रेम हें आत्मार्पण स्वभावाचें, म्हणजेच स्वयंकेंद्रिततेच्या बरोबर विरोधी असें असतें.

परिणाम असा कीं, स्वतःच्या व्यक्तिमत्वाचा विचार विसरल्यानेंच खरें प्रेम स्त्रीपुरुषाला मुक्ततेच्या आणि सुखाच्या एका उच्चतम, विशुद्ध आध्यात्मिक प्रकाराप्रत नेतें. या प्रकारांत प्रत्येकाचें व्यक्तिमत्व विकसित होऊन उन्नत होतें. प्रत्येकजण यानंतर मुख्यतः दुसऱ्यांत व्यग्र असतें; आपल्याला त्या प्रिय माणसांत पहातें. वासनामय प्रेमाच्या विरुद्ध असें हें खऱ्या आध्यात्मिक अर्थानें समाधीमय प्रेम असतें. स्वर्गीय प्रेम असतें. यांत माणूस त्याच्या अस्तित्वापलिकडे पोंचतो.

म्हणजे या देशांत या गोष्टींचा वापर आहे त्याहून बाहेरल्या जगांत तो खूप मोठ्या प्रमाणांत आढळतो असें मला सुचवायचें नाहीं. वा वैवाहिक आयुष्य या दोन्ही गोष्टींवर उभारणें सोपें असतें असेंही मला म्हणायचें नाहीं.

परंतु मला असें मात्र म्हणायचें आहे कीं, केवळ परस्पर प्रेमावरच वैवाहिक आयुष्य उभारण्याच्या अमेरिकन उपक्रमाला यश मिळायचें असेल, या व्यवस्थेंत समान हक्क आणि अस्मितेच्या पति–पत्नींना

सुख लाभायचें असेल तर या दोन गोष्टींचाच विचार झाला पाहिजे.

वेगळ्या शब्दांत, विवाहाची अमेरिकन कल्पना ज्या उद्दिष्टासाठीं आहे त्याचा एकच एक सत्य आणि वैशिष्ट्यानें मानवी असा अर्थ या गोष्टींत व्यक्त होतो.

● ● ●

## अमेरिकेंतला दिलाचा खुलेपणा आणि बुद्धिवादी कदर

इथें आढळणाऱ्या आणि अमेरिकन संस्कृतीचा एक विशेष समजावा अशा या दोन गुणांचा मी फार चहाता आहे. विश्वामागल्या महान् सत्याचा कांहीं ना कांहीं भाग प्रकाशांत आणण्याच्या अव्वल संशोधनाचें आणि प्रयत्नांचें इथें होतें तेवढ्या उताविळीनें स्वागत इतरत्र कुठें मला तरी शक्य वाटत नाहीं. ज्ञानपिपासेशीं, परस्पर समजुतीशीं, मानवी प्रयत्नांच्या आदराशीं निगडित अशी ही उतावीळ. मानवाविषयींच्या वैशिष्ट्यपूर्ण अमेरिकन उत्सुकतेचाच, ही नवनवीन बौद्धिक संशोधनाच्या अनेकानेक अंगाविषयींची अवाढव्य उत्सुकता हा भाग मानला पाहिजे. अमेरिकन जनतेला—म्हणजे केवळ विद्या-संस्था, संशोधन केंद्रें, फौंडेशन्सच नव्हेत तर आश्चर्य वाटावें इतक्या वैय्यक्तिक स्वरूपांत—मानवी मनाच्या सामायिक खजिन्यांत कांहीं भर घालूं शकतील अशीं माणसें शोधण्याचा, त्यांना मदतीचा हात देण्याचा एक सोस आहे. त्यांचें मानवी हिताचें कार्य चांगल्या प्रकारें नांवारूपास यावें हा ध्यास आहे. हें सर्व विलक्षण विचारपूर्वक आणि कदर बाळगून केलें जातें.

अमेरिकन लोकसंख्येच्या कांहीं भागांत दृढ असा वंशद्वेष वसत आहे हें सर्वांनाच माहीत आहे. त्याशिवाय धार्मिक द्वेषही आहे. तरी पण बौद्धिक किंवा वैचारिक द्वेषाचें काय ? तोही येथें आहे काय ?

येथल्या माझ्या दीर्घ अनुभवांत एक गोष्ट मला कळून आली आहे कीं युरोपच्या मानानें असला बौद्धिक वा वैचारिक हेवादावा आणि द्वेष इथें खूप कमी प्रमाणांत आढळतो.

म्हणजे असें नव्हे कीं विद्वान, शास्त्रज्ञ, प्राध्यापक आणि इतर व्यावसायिकांतले वैयक्तिक हेवेदावे युरोपसारखे इथें नाहींत. ते तर जसे इतरत्र तसे इथेंही आहेत. आणि उगीच विक्षिप्त दिसणें, वागणें, भयंकर प्रखर आणि आक्रमक सुधारक असल्याचा बहाणा करणें, प्रस्थापित सामाजिक यमनियमांना न जुमानता 'खेळ खेळणें,' हे प्रकार इतरत्रप्रमाणें इथेंही चालू दिले जात नाहींत.

परंतु या गोष्टींचा संबंध सामाजिक जीवनाशीं आणि सामाजिक यमनियमांशीं, माणूस प्रसारित करीत असलेल्या वैचारिक संदेशाच्या आंतील गाभ्याशीं, आशयाशीं नाहीं. बुद्धिवादाच्या आणि वैचारिकतेच्या प्रत्यक्ष जोपासनेबाबत, आणि कार्याबाबत इथें मनाचा एक खुलेपणाच मला आढळत आला आहे. औदार्य आणि न्यायबुद्धीचाच तो एक भाग आहे. आणि सर्वसाधारण सांस्कृतिक प्रगतीला त्यानें फार मोठी मदतच झालेली आहे.

मला चांगल्या प्रकारें माहीत असलेल्या माझ्याच तत्वज्ञानाच्या क्षेत्रांतलीं कांहीं उदाहरणें मला येथें देऊं देत.

मी, तुम्हांला माहीत असेल तर, Thomist तत्त्वज्ञानी आहें. युद्धाआधीं फ्रान्समध्यें या पंथाचा मोठा जोर होता; परंतु सत्य वाटेल तें तारस्वरानें ओरडून गांव दणाणून टाकणाऱ्या मूठभर बंडखोरांच्या प्रयत्नांभोंवतीच हा जोर केंद्रित होता. अधिकृत बुद्धिवादी वर्तुळांतून या मूठभर तत्वज्ञान्यांच्या कार्याची दखलही न घेण्याचें धोरण सतत ठेवण्यांत आलें होतें आणि अद्याप त्यांत बदल झालेला नाहीं. याचें कारण इतकेंच कीं आजच्या नव्या काळाला तेराव्या शतकांतल्या थॉमस ॲक्विनास नांवाच्या एका वेदान्त्याच्या, संताच्या विचारांचा काय उपयोग? अशी भूमिका.

आणि आतां अमेरिकेंत, ॲक्विनासला आजच्या काळचा विचारवंत मानणारे तत्वज्ञ केवळ कॅथॉलिक नव्हे तर धर्म-पंथ-भेदातीत विश्वविद्यालयांतून देखील अध्यापन करीत आहेत.

प्रिन्सटन विश्वविद्यालयांत थॉमस ॲक्विनासच्या विचारसंपदेच्या अनुरोधानें मी मॉरल फिलॉसॉफी शिकवीत असतां मला जें स्वातंत्र्य मिळालें, ज्या समजुतीनें माझ्या विचारांकडे पहाण्यांत आलें, तें स्वातंत्र्य, ती समजूत कोणत्याहि युरोपीय विश्वविद्यालयांत माझ्या वांट्याला आली नसती.

प्रिन्सटनविषयीं बोलायचें तर त्याचे अध्यक्ष हॅरोल्ड डॉड्स यांच्याविषयींची माझी कृतज्ञता येथें व्यक्त करून कांहीं वैयक्तिक आठवणी नमूद करूं द्या. १९४७ च्या डिसेंबरांत, मेक्सिको सिटीहून रोमकडे परततांना विमान बदलण्याच्या निमित्तानें कांहीं तास मी न्यूयॉर्कमध्यें थांबलों होतों. प्रेसिडेंट डॉड्स तेव्हां तिथें मला भेटायला आले होते. व्हॅटिकनमधली माझी वकिलातींतल्या अधिकाराची जागा सोडण्याला मी तयार असल्यास मला त्यांनीं त्यांच्या विश्वविद्यालयांत प्राध्यापकाची जागा देऊं केली होती. तीहि थॉमस ॲक्विनासच्या पंथांतल्या माझ्या तात्त्विक मतांची कदर ठेवून ! प्रिन्सटन हें प्रेस्बिटेरियन उगमाचें धर्म-पंथ-भेदातीत असें विश्वविद्यालय आहे या गोष्टीनें तर तिथें मी शिकवावें हें त्यांना जास्त आवश्यक वाटत होतें.

मी म्हणतों त्या स्वातंत्र्याच्या वातावरणाची, आत्मटीकेच्या आणि आत्मसुधारणेच्या अखंड चालणाऱ्या क्रियेशीं तशीच सांगड आहे. ही क्रिया आणि हें वातावरण छोट्या कॉलेजांतून (इथल्या शिक्षण-यंत्रणेचा हा कणाच.) आणि मोठ्या विश्वविद्यालयांतून सारखेंच प्रत्ययाला येतें. नोत्रदॅमच्या मोठया कॅथॉलिक विश्वविद्यालयांत तें दिसतें आणि शिकागोच्या प्रिन्सटन विश्वविद्यालयासारख्या मोठमोठया निधर्मी शिक्षणसंस्थांतही त्याचा आढळ होतो. हल्लीं नोत्रदॅम आणि शिकागो अशा दोन्ही ठिकाणीं आणि हंटर कॉलेजांतही मी नियमीतपणें शिकवीत असतों.

या वैयक्तिक गोष्टींनंतर पुन्हां विषयाकडे वळायचें तर, ( या गोष्टी इथें संपल्या असें मात्र नव्हे. ) खरी गोष्ट अशी कीं, वेगवेगळ्या पंथांच्या तत्त्वज्ञानविषयक समीक्षणांतून नेहमीं ही गोष्ट गृहीत धरण्यांत येते कीं, ' निओ-थॉमिजम ' हा अमेरिकन तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रांतला आजचा एक वहाता झरा आहे. नॅशनल सोसायटी फॉर द स्टडी ऑफ एज्युकेशन या संस्थेतर्फें एका थॉमिस्ट तत्त्वज्ञाला १९५५ च्या संस्थेच्या वार्षिकांत एक प्रकरण–' आधुनिक तत्वज्ञानें आणि शिक्षण ' या नांवाचें–लिहायला सांगण्यांत आलें होतें. ( या वार्षिकांत नमूद आहे त्याप्रमाणें, थॉमिजम हें आधुनिक तत्त्वज्ञानांपैकीं एक आहे. सॉरबोनचे एम्. इमिल ब्रेहिए यांनीं वा त्यांच्या सहकाऱ्यांनीं ही गोष्ट कधींही मान्य केलेली नाहीं. )

या गोष्टी वैचारिक औदार्याच्याच निदर्शक होत.

आणखी एक, विशेष असें दुसरें उदाहरण इथें सांगू द्या. सतराव्या शतकांत होऊन गेलेला जॉन ऑफ सेंट थॉमस हा थॉमस ॲक्विनासच्या तत्त्वज्ञानाबाबतचा मोठा विचारवंत मानला जातो. मी आणि माझ्या सह-पंथीयांच्या दृष्टीनें तो आमचा मोठा स्फूर्तिदाता रहात आला आहे. आमची त्याच्यावर भक्ति आहे. परंतु फ्रान्समध्यें आम्ही या बाबतींत एकटे पडलेलों होतों. मी मघां उल्लेख केला त्या फ्रेंच बुद्धिवादी वर्तुळांना या विचारवंताची दखलही नव्हती— त्याहीपलीकडे म्हणजे, थॉमस ॲक्विनासच्या तत्त्वज्ञानाबाबत विचार करणारीं बहुसंख्य माणसें Summa चा ग्रंथ वाचण्याकरता आपल्याला कोणाच्या चष्म्याची जरूर नाहीं, आपली नजर तीक्ष्ण आणि बुद्धि प्रखर आहे असेंच मानीत आणि या तत्त्वज्ञाबाबतचे सारेच मंडनकार, त्यांतल्या त्यांत जॉन ऑफ सेंट थॉमस याचा ते तिरस्कार करीत. कां ? तर त्याची शैली क्लिष्ट आणि अत्यंत तांत्रिक होती. तरीही अखेर, त्याच्या ग्रंथांच्या आवृत्त्या लॅटिनमध्यें, फ्रेंचमध्यें आणि इटालियनमध्यें काढतां आल्या आणि माझ्या पत्नीनें त्याच्या इतरही (Treatise on the gifts of the Holy Spirit) लिखाणाचें एक पुस्तक फ्रेंचमध्यें काढलें आहे. परंतु त्यांच्याविषयींच्या अधिकृत वर्तुळा-

तल्या उपेक्षावृत्तीनें आणि दावेदारीनें आम्हीं थोड्या लोकांना तो आम्हां निवडक माणसांनाच ज्याची ज्ञानसंपदा उपलब्ध असावी असा द्रष्टा वाटे.

इथें अर्थात त्याचें ' Material logic ' हें सहाशें पन्नास पानांचें पुस्तक इंग्रजींत प्रसिद्ध झालें आहे. शिकागो विश्वविद्यालयानें तें प्रसिद्ध केलें आहे. या देशांतल्या तत्वज्ञांच्या वर्तुळांतुन त्याचें स्वागतही उत्तम प्रकारें झालें आहे. बर्कले किंवा लेब्निट्झ वाचणें जितकें प्रचारांतलें, तितकेंच जॉन ऑफ सेंट थॉमस वाचणेंहि प्रचारांतलें वाटतें. पंचवीस वर्षांमागें अशक्य वाटला होता तो हा जुनाट गैरसमजांवरचा आणि पारंपारिक समजुतींवरचा विजय आम्हांला प्राप्त करतां आला याचें कारण अमेरिकन संस्कृतींतला मनाचा खुलेपणा.

कृतज्ञता हें आदराचें अत्यंत सुयोग्य लक्षण आहे.

अमेरिका तिच्या मोठ्या माणसांना जीवन कष्टप्रद करते. म्हणजे उत्तरक्रियेच्या वेळच्या स्मशानांतल्या भाषणांतच तिला इतर कांहीं राष्ट्रांतल्याप्रमाणें रस वाटतो असें मात्र नव्हे. ती आपल्या मोठ्या माणसांची सत्वपरीक्षा घेते. त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांकडून त्यांची लांडगेतोड होतांना समाधानानें तें पहाते. परंतु त्यांच्या हयातींतच त्यांच्यावर ती प्रेमही करते.

दैनंदिन जीवनांत, जेथें मोठ्या नव्हे तर साध्या सुध्या माणसांचा संबंध असतो तिथें संधी मिळेल तेव्हां अमेरिकन्स आपली कृतज्ञता बाळगतात, व्यक्तहि करतात. या बाबतींत न कचरण्याइतकें औदार्य त्यांच्याकडे असतें.

चॅटयुब्रिअंडचें एक चांगलें वचन होतें : "Les hommes sont ingrats, mais L'humanite' est reconnaissante." माणसें कृतघ्न असतात परंतु मानवजात कृतज्ञतेंत चुकत नाहीं.

असें म्हणूं या कीं, माणसें आणि मानवजात यांतलें अंतर या देशांत तेवढें अतूट वाटत नाहीं.

• • •

## काम आणि फुरसद

बाहेरदेशच्या अनेक अमेरिका-विरोधी व्यंगचित्रांतून डॉलरची नोट मिरवणारा 'अंकल सॅम' किंवा 'सॅम काका' हें अमेरिकन संस्कृतीचें प्रतीक म्हणून वापरलें जातें. या प्रकारांत मत्सरापेक्षां अज्ञानच अधिक आहे. प्रत्यक्षांत पैसा नव्हे तर काम अमेरिकन संस्कृतींत फार महत्त्वाचें मानलें जातें.

इथें प्रत्येकजण काम करतो. तेंही कसून. या अर्थानें सारे काम करणारीं ( त्याचप्रमाणें मॉर्टगेजेसखालीं आणि डिफर्ड पेमेंट सिस्टिमखालीं दबलेलीं ) माणसें म्हणून समान आहेत. सारीं चरितार्थाकरता कष्ट करतात आणि त्या नियमीत कष्टाबाहेर पुन्हा कांहीं ना कांहीं कामांत रहातात. कोणी हस्तव्यवसाय करतो तर कोणी आपलें घर सुधारीत असतो, कुणी आपलें घर बांधत असतो—डॉ. बटरफील्डनीं असें बांधलें होतें. स्वतः बांधलेल्या त्या लांकडी घराचा, वेसलेयान विश्वविद्यालयाचें अध्यक्षपद भूषविण्याकरतां निरोप घेतांना त्यांना फार दुःख झालें होतें. आणि हे अमेरिकन्स आपल्या मुख्य रोजगारापेक्षां या छंदवजा कामाचा अभिमान अधिक बाळगतात.

अमेरिकन संस्कृतींत, अशा तऱ्हेनें, काम करण्याचा आब आणि जड वस्तु त्याचप्रमाणें निसर्ग यांत बदल घडविणाऱ्या कामाची fecundity या गोष्टी फार महत्त्वाच्या मानल्या जातात. आधुनिक युगांत कितीही बाऊ करण्यांत येत असला तरी या मूलभूत गोष्टी आहेत; माणूस आणि समाज यांच्या दृष्टीनें फार मोलाच्या आणि पुरातन संस्कृतींनीं जवळपास उपेक्षिलेल्या.

असें सर्व असूनही एक गोष्ट उरतेच. ती ही कीं, कामाच्या आत्यंतिक ध्यासानें आणि फुरसतीचें मानवी जीवनांतलें महत्त्व उपेक्षिल्यानें कांहीं प्रमाणांत एक ताण आणि त्यापोटीं औदासीन्य निर्माण होतें. चित्राची ही दुसरी बाजू.

काळाबाबतची अमेरिकन भूमिका आपण जरा इथें विचारांत घेऊं. एकाद्या माणसाला कांहीं एक न करण्याकरता थोडाही मोकळा वेळ मिळावा याबाबत एक धास्तीच इथें बाळगली जाते असें मी म्हणेन. स्वस्थ बसण्याचें आणि आपल्या एकाद्या स्वप्नांत रंगण्याचें महत्त्व या देशांत फारसें मानण्यांत येत नाहीं. उदाहरणार्थ, कमिट्यांच्या बैठका आणि अशाच इतर कारभारविषयक नाना भानगडी, प्रोफेसरांना त्यांच्या लेक्चरांनंतर मुक्त चिंतनाला वा स्वतंत्र संशोधनाला मोकळा वेळ मिळूं नये म्हणूनच तर शोधून काढण्यांत आल्या नसतील, असें एकाद्याला वाटेल.

मैत्रीला, स्नेहाला फुरसत हवी, वांया दवडण्यासाठीं भरपूर वेळ हवा. सृजनशील चिंतनाला खूप सवड आणि निश्चिंतता मिळाली पाहिजे. अशा तऱ्हेनें, फुरसद हा अमेरिकन जीवनांतला एक महत्त्वाचा प्रश्न बनला असून एकंदर सामाजिक आणि तांत्रिक प्रगति, स्वयंचलित यंत्रें, यांनीं कामाचे तास घटत आहेत आणि या प्रश्नाचें गांभीर्य वाढतच आहे.

मुद्दा असा कीं, या मोकळ्या वेळाचा व्यय चित्रपट आणि टेलिव्हिजनमुळें होऊं लागला आहे तसा मूढ अकरणात्मकतेंत न होता तो माणसाच्या अधिक फायद्याकरता कसा वापरता येईल? जोंवर आध्यात्मिक सुखासीनतेची जोड असलेली मनाची एक नवी जडण-घडण अस्तित्वांत येत नाहीं, तोंवर कामाच्या दर्जाइतका दर्जा फुरसतीचा, या आधुनिक जगांत, रहाणें शक्य नाहीं.

हें खरें असेल तर, ॲरिस्टॉटल आणि थॉमस ॲक्विनासला वाटलें होतें त्याप्रमाणें, माणसाला कांहीं ना कांहीं प्रमाणांतल्या विरंगुळ्याशिवाय, आनंदाशिवाय जगणें अशक्य आहे आणि जेव्हां आध्यात्मिक आनंद आणि सुखें त्याच्यापासून काढून घेतलीं जातात तेव्हां तो नीच, नश्वर अशा सुखांकडे वळतो. म्हणजेच आधुनिक जगांत हिशेबी कामापोटच्या सर्वसाधारण कंटाळ्यामुळें टेकीला आलेली मानवजात, उच्च असें कांहीं न दिसल्यास कामगंडाचा बळी ठरणें सहाजिकच होय.

ज्ञानाचा, कलेंतला, काव्यांतला, महान मानवी ध्येयांकरतां झटण्यांतला आनंद लुटायचा असेल, मनींच्या चिंता, सुखस्वप्नें इतरांकडे बोलायचीं असतील, आत्मचिंतन करायचें असेल वा ईशचिंतन करणें असेल तर माणसाला कितीही फुरसद कमीच पडेल.

काम, कष्ट ही आपल्या अस्तित्वाची एक मूलभूत गरज आहे. परंतु तेंच ध्येय वा उद्दिष्ट नव्हे. मानवी जीविताच्या उन्नतीकरतां आपण कष्ट करतों. परंतु आपल्यांतली आणि इतरांतली ही उन्नति अखेर अधिक कष्ट आणि पुन्हां कष्ट अशा रगाड्यांत गुंतून रहाणार कीं काय ? कीं त्याहून अधिक उच्च, शांतिदायक, विश्रांतिदायक असें कांहीं आपणाला प्राप्त करून देण्याकरता ती उपयोगी येणार ? विश्रांति अनेक प्रकारची असूं शकते. आळस हें पाप होय. चैन मौज चांगली परंतु कामापेक्षां, कष्टांपेक्षां डावीच. परंतु विश्रांतीचा वेगळा प्रकार, मनाला कार्यरत ठेवून चिरंतनाच्या आसपास नेऊन सोडणारा—हा कामापेक्षां उजवा होय.

विश्रांतीचे असे उच्च प्रकार यानंतर ‘ विश्रांती ’ या सदरांत येण्याचें कारण नाहीं; ती कामाची परिपूर्ति मानली जावी. विश्रांतीचा सर्वोच्च प्रकार : आत्मचिंतनाचें काम—बायबल म्हणतें त्याप्रमाणें, ‘ स्वस्थ व्हा आणि मी ईश्वर आहे हें जाणा. ’

आतां, खुद्द कामाच्या संदर्भात आणखी कांहीं विचार मांडणें शक्य आहे. कामाच्या संबंधांतल्या तांत्रिक आणि कृत्रिम अशा सर्व सोयी तशा ठीक आहेत; त्याबाबत शंका नको. परंतु मानवाच्या नैसर्गिक प्रवृत्ति आणि शक्तियुक्ति यांच्या मोबदल्यांत या सोयी वाढणार असतील तर त्यांतून अंतीं ‘ ओव्हर सिव्हिलिझेशन ’—अतियांत्रिकीकरणच उद्भवेल आणि आपण आपलीं मूलभूत सामर्थ्यें आणि प्रवृत्ति गमावून बसूं. कामाच्या यांत्रिकीकरणापोटच्या मानसिक संवयींनीं कांहीं प्रमाणांत, विशेष करून कांहीं प्रकारच्या नाजुक कामांत बोटांची संवेदनाक्षमता आणि चतुराई बिघडते असा अनुभव आहे.

तसेंच व्यवस्थितपणें पूर्वनियोजित अशा योजना आणि ठरीव ठोकताळे यांबरहुकूम काम कारण्याची संवय झालेला सर्वसाधारण अमेरिकन मजूर हा त्याच्या युरोपीय बांधवांपेक्षां आकस्मिक परिस्थितींला तोंड देतांना कांहीं वेळां कमी पडतो, हेंही मी नाकारीत नाहीं. परंतु या गोष्टींतून कांहीं भयानक धोका उद्‌भवेल असेंहि मला वाटत नाहीं.

कांहीं अमेरिकनांना वाटतें कीं, तरुण पिढीचा उत्साह आणि टव-टवी जमेला धरूनही, यांत्रिक साधनांच्या अतिरेकी उपयोगाच्या सोंसानें हा देश इतर जगापेक्षां फार 'म्हातारा' झाला आहे. प्रोटीन्सनीं, माल्टोजनें, डेक्स्ट्रिन्सनीं, कॅल्शमनें, फॉस्फरसनें, लोहानें, पोटॅशम बायकार्बोनेटनें, दुधाच्या पावडरीनें, मधानें, लोण्यानें, मसाल्यांनीं आणि कृत्रिम गंधानें सुधारलेले, शुद्ध केलेले, अधिक सकस बनविलेले, अनेक खुळचट व्हिटॅमिन्सनीं पौष्टिक बनविलेले अन्नपदार्थ सोडून निव्वळ आणि शुद्ध कांहीं मागणें जेथें अवघड झालें आहे (तरी बरें फळांना येथें व्हार्निश मारण्यांत येतें परंतु अद्याप अँटि-व्हिटॅमिन्स वा ट्रॅन्क्विलिझर्सची इंजेक्शनें देण्यांत येत नाहींत!). त्या शहरांना काय 'तरुण' का म्हणायचें?

या प्रकारच्या युक्तिवादाचा परिणाम माझ्यावर केव्हांही फारसा झालेला नाहीं. केलें तें वर्णन अर्थातच गंमतीपोटीं जरा अतिशयोक्त होतें. माझ्या मतें निसर्गाच्या किमयेला कलाचातुरीची वा युक्तीची जोड मिळाल्यानें ज्यांना 'म्हातारें' वाटतें त्यांच्यांत मुळांतच फारसें तारुण्य, जवानी नसली पाहिजे. या बाबतींत तरी स्वाभाविक प्रति-क्रियेची उणीव नाहीं. जवळ जवळ प्रत्येक अमेरिकनाच्या मनांत शेती करण्याचा विचार जोपासला जात असतो आणि अनेकांना ती संधि मिळतेही. आणि या अतिऔद्योगीकरण झालेल्या देशांतच, मौज म्हणजे स्वैर पर्यटन, नव्या प्रदेशाचें संशोधन, जमिनीचा कस वाढ-वण्याकरतां प्रयत्न, जंगली प्रदेशांत वसतीचे उपक्रम, वा डोंगरांत, रानांत किंवा तशा एकाकी जागीं एकाकी जीवन, या प्रकारच्या उप-क्रमांबद्दल विलक्षण आवड आढळते.

अमेरिकन्स 'तरुण' नाहींत असें म्हणायचें असेल तर त्याचें

कारण यांत्रिक सोयींची आवड हें मात्र नव्हे, वेगळ्याच अर्थानें हें विधान सत्य ठरतें—तो अर्थ हा कीं, एकीकडे स्कायस्क्रेपर्स आणि सायक्लोट्रॉन्स उभारण्यांत हे लोक गर्क असतांच, दुसरीकडे जुन्या दुःखी कष्टी आणि दुर्दैवी जगाच्या अनुभवाच्या जखमा त्यांच्या उरांत वहातच आहेत आणि त्यांच्या मनाचा एक भाग बिनबोभाटपणें मानवतेच्या जुन्या स्वप्नांशीं, व्यथांशीं, थकव्याशीं, झपाटलेल्या पिशाच्चांशीं झगडावें तसा अविरत झगडत आहे. इतिहासाच्या मत्सरीपणाचा हा त्यांच्यावर सूड...

• • •

## राजकीय आणि सामाजिक तत्त्वज्ञानाचे अमेरिकन पाठ

या प्रकरणांत, माझ्या विशेष आवडीच्या कांहीं गोष्टींचा विचार मी करणार आहे.

व्यवहारांत, भरभक्कम, रोखठोक लोकशाहीचा अनुभव मला अमेरिकेंतच आला आहे. ही लोकशाही केवळ घोषणांची नव्हे, केवळ आभाळाएवढ्या उंच ध्येयांतली नव्हे, तर ती एक प्रत्यक्ष, मानवी, चालती बोलती, वारंवार कसाला लागणारी आणि सतत दुरुस्त होत जाणारी जीवनपद्धति आहे. लोकशाही या देशांत मला प्रत्यक्ष भेटली. इथें रहाणें, लोकांचें दैनंदिन जीवन आणि संस्थांचें कामकाज मनापासून अभ्यासणें हा राजकीय तत्त्वज्ञानांतला एक मोठा, उद्बोधक आणि अविस्मरणीय अनुभव होय.

या संबंधांत माझीं कांहीं मतें मला नमूद करूं देत.

( १ ) माझें पहिलें मत, युरोपच्या तुलनेनें या देशाचें मानावें अशा एका वैशिष्ट्याच्या संबंधांत आहे. हें वैशिष्ट्य : मुळापासून उत्स्फूर्तपणें आणि व्यवहारतः वेगळी असणारी या देशाची समाजव्यवस्था. जीं जाकी रोसो याच्या सिद्धांताच्या बरोबर विरुद्ध तिचें स्वरूप आहे.

रोसो म्हणे कीं राजसत्तेंत कोणत्याही विशिष्ट सामुदायिक चळवळीला वाव देतां कामा नये.

या देशांत विशिष्ट सामुदायिक चळवळींची सुबत्ता आहे. स्वयं-संघटित गट, मंडळें, युनियन्स, व्यावसायिक वा धार्मिक बंधुभावाच्या संघटना अशा माणसांच्या दैनंदिन जीवनाशीं निगडित अशा प्राथमिक गोष्टींशीं संबंधित अशा या चळवळी आहेत.

वरच्या पातळीवर, इथें आपल्याला निरनिराळ्या राज्यांची बहुसंख्या आढळते. यांतल्या प्रत्येक राज्याला वेगळें राजकीय जीवन, वेगळा राज्यकारभार आणि त्या राज्यांचें मिळून एक मोठें प्रजासत्ताक, एक फेडरल राज्य.

अशा प्रकारचें अनेकांगी, विविधतायुक्त स्वरूप, त्यांतले सारे प्रश्न आणि कित्येकदां मूढ करणारा परस्परविरुद्धपणा मान्य करूनही लोकशाहीच्या भक्कम वाढीस विशेष उपयुक्त ठरतें असें मला वाटतें.

इतिहास-दृष्ट्या, या देशाची प्रतिष्ठापना करणाऱ्या ' पोलिटिको-रिलीजस ' जमातींचें स्वयंशासित वर्तन, अलग अलग परंपरा, यांची एक न पुसण्याजोगी छाप अमेरिकन समाजाच्या मनावर कायमची उठून राहिली आहे. म्हणूनच, मध्यवर्ति सरकारचे अधिकार आधिकाधिक वाढविणें, जीवनावश्यक गरजांच्या दृष्टीनें आणि देशाच्या जबरदस्त वाढीनें भाग पडत असतां अमेरिकन मनाला ' राज्य ' ' सरकार ' ही कल्पना कांहीं केल्या मानवत नाहीं. त्याला जुनें 'कम्युनिटी'-चेंच स्वरूप बरें वाटतें.

याच पद्धतीनें मला हेंही दिसतें कीं, युरोपच्या मानानें (त्यांतल्या त्यांत व्यक्तिवादी फ्रान्सच्या तुलनेनें) येथें ' कम्युनिटी ' ची भावना आणि प्रवृत्ति फार प्रबळ आहे. याचाच परिणाम म्हणजे, 'कम्युनिटी'ची जाणीव आणि व्यक्तिस्वातंत्र्याची कल्पना यांत कमजास्त प्रमाणांत नेहमींच एक तंगी इथें अस्तित्वांत असते.

ही तंगी माझ्या मतें तिच्यापुरती वाजवी आणि मौलिकहि आहे. हें खरें कीं तिच्यापोटीं संघर्ष निर्माण होतात, विशेषतः ' कम्युनिटी 'ला आपल्या अस्तित्वावरच घाला आला असें वाटतें आणि ती

प्रतिकार करते तेव्हां हे संघर्ष विशेष प्रमाणांत शक्य असतात, हमखास गुन्हेगार मानता येणार नाहीं अशा व्यक्तींची पारध करणाऱ्या तिच्या प्रतिकाराचें स्वरूप साधारणतः पोलिसी स्वरूपाचें असतें. मग, (हा नियमच) याची व्यक्तिस्वातंत्र्य आणि नागरी हक्कांचें अधिष्ठान असलेली एक प्रतिक्रिया उद्‌भवते. या दोन गोष्टी नसतील तर राष्ट्राचें अस्तित्व आणि एकात्म स्वरूप टिकणें अशक्य.

हें खरें काय कीं आज 'कम्युनिटी'चा अस्सल आशय कांहीं माणसांच्या बाबतींत फार भ्रष्ट झाला असून त्याला मि. डेव्हिड रिएस्मान म्हणतात त्याप्रमाणें 'पर-प्रत्ययी' स्वरूप आलें आहे ? मला वाटतें हें समाजशास्त्रीय वर्गीकरण म्हणजे बराचसा शास्त्रीय भ्रम असून परिस्थितीशीं मिळतें घेण्याला तत्त्व बनवून त्याची पूजा करण्याचा मानसिक रोग आज साऱ्या जगांत प्रत्ययाला येतो तेवढाच खरा. या देशाला त्यामुळें निर्माण होणारे धोके कमी मानावेत असा याचा अर्थ नाहीं. बहुसंख्य शाळकरी मुलें—मुली 'पॉप्युलर' होण्याचा ध्यासच बाळगून असलेलीं दिसतात. उपनगरें आणि छोटीं शहरें यांतल्या सामाजिक चौकटींत कित्येक माणसें एक तर बकऱ्यांसारखीं गरीब किंवा हीन दीन होऊन गेलेलीं दिसतात. आणि या भागांपुरतें हें मर्यादित आहे असेंहि नव्हे.

आरंभाला उल्लेखिलेल्या अमेरिकन समाजव्यस्थेविषयींच्या मुद्द्याकडे पुन्हा वळायचें तर, व्यवहारी दृष्टीनें पहिल्यास मी आवर्जून उल्लेखीत असलेली सामाजिक जीवनाच्या अगदीं प्राथमिक पातळीवरली वेगवेगळ्या समुदायांच्या स्वतंत्र अस्तित्वाची आणि विकासाची पार्श्वभूमि नसती तर, शिकागो येथें सॉल एलिन्स्कीनें सुरू केलेल्या 'बॅक ऑफ द यार्ड' मोहिमेसारखी सामाजिक चळवळ, किंवा हल्लींचा 'इंडस्ट्रिअल एरिया फौंडेशन'सारखा जनतेंत दृढमूल असलेला उपक्रम, असले आमच्या लोकशाहीला नव-संजीवन देणारे उपक्रम एक तर घडते ना किंवा करणें कठीण झालें असतें.

युरोपांत, जनतेचें सामुदायिक जीवन एकाच वेळीं इतकें atomize झालें आहे आणि राजकीय वाऱ्यानें आणि राजकीय पक्षांनीं भारून

गेलें आहे, कीं असले उपक्रम तिकडे करायचे तर आरंभीची तयारी, जनतेच्या मनोभूमीची नांगरट बरीच मोठी करावी लागेल. एलिन्स्कीच्या ‘ Reveille for Radicals ’ या ग्रंथाबाबत माझ्याइतक्याच उत्साहानें बोलणाऱ्या आणि मी फ्रेंच वकील म्हणून रोमला व्हॅटिकनकडे होतों तेव्हां माझ्यासोबत आलेल्या एका मित्रानें इटालीमध्यें मी म्हटला तसा एक उपक्रम करण्याचा प्रयत्न केला होता. रोममधल्या एका गरजू वसाहतींत त्यानें, तेथल्या अनेक सामुदायिक समस्यांच्या निराकरणार्थ संघटित होऊन कांहीं करण्याकरतां तेथल्या लोकांत, त्यांच्या म्होरक्यांत भारी खटपट केली. पहिले कांहीं दिवस सारें छान चाललें; आपण जिंकली असेंच माझ्या मित्राला वाटलें. परंतु लौकरच त्यांत राजकारण शिरलें आणि साऱ्या उपक्रमाचा हां हां म्हणतां बट्ट्याबोळ झाला. कोणत्या राजकीय पक्षाचा त्यांत वरचष्मा असावा आणि कोणत्या पक्षानें त्या संघटनेचा नैतिक फायदा उठवावा, यालाच सर्व महत्त्व आलें आणि सारें आटोपलें.

सॉल एलिन्स्कीच्या मतें, माझ्या मित्रानें घोड्यापुढें गाडी जोडली होती, हें नमूद केलें पाहिजे. प्रथम त्यानें या जमातींतून छोटे छोटे स्थानिक, राजकारणाबाहेरचे, साधेसीधे गट बांधणें जरूर होतें. हे गट बांधले गेल्यावर आणि त्यांचें कार्य अनेक महिने सुरळीत चालल्यावर मगच त्यानें साऱ्या जमातीला एका सामाजिक कार्याकरतां उद्युक्त करणें वाजवी ठरलें असतें. या मार्गानें सॉल एलिन्स्की वागला आणि त्याचा उपक्रम सफल झाला. अमेरिकेच्या कांहीं भागांतल्या पूर्णपणें विस्कळित अशा मेक्सिकन स्थलांतरितांकडून त्यानें तो यशस्वी करून दाखवला.

( २ ) माझ्या दुसऱ्या अभिप्रायाकडे मी आतां येतों. त्याचा संबंध या देशाच्या दैनंदिन जीवनांत प्रत्ययाला येणाऱ्या जीवन–विषयक लोकशाही तत्त्वज्ञानाशीं आहे. इथल्या अमेरिकन शहरांविषयींच्या माझ्या पहिल्या प्रतिक्रिया मला आठवतात. मला इथें अवमान, उद्धटपणा, तिरसट वागणूक, यांना बिलकुल तोंड द्यावें लागलें नव्हतें.

बॉवरी, न्यूयॉर्कमधले हार्लेमचे गचडीचे आणि विपन्नावस्थेंतले

विभाग, शिकागोंतल्या गलिच्छ वस्त्या मी जाणतों. त्याशिवाय भटके कंगाल, दक्षिणेकडल्या दरिद्री गौरकायांचा आणि निग्रोंपैकीं कांहीं विभागांचा वेगळा वर्ग, हेही माझ्या परिचयाचे आहेत. आणि, ईश्वराची खैर म्हणावी, कीं डोरोथी डेनें स्थापन केलेलीं 'हॉस्पिटॅलिटी हाउसेस'ही इथें आहेत. ही सत्य गोष्ट, कीं जगांत सर्वत्र औद्योगिक अंमलांत असंघटित किंवा संघटनेच्या शक्यतेपलिकडल्या भुकेकंगाल माणसाला मानवी सुधारणा नि संस्कृतीच्या दैवतांसाठीं बळी म्हणूनच जोपासण्यांत येतें. जगभर कोठेंही केवळ बुद्धिकौशल्यानें आणि औदार्यानेंच, मानवजातीच्या प्रयत्नांनीं बरा होईल असा हा अखेरचा सामाजिक रोग म्हटला तरी चालेल.

परंतु पुन्हां एकवार आपण माझ्या विषयाकडे येऊं या. राजकीय जीवनाच्या चष्म्यांतून आपण या देशांतल्या सर्वसाधारण नागरिकांच्या वर्तनाची तपासणी करणार आहोंत.

येथला सर्वसाधारण नागरिक, मग तो कोणत्याही व्यवसायांत असो, माणसाच्या जातींत जन्मल्याबद्दल समाधान बाळगतो आणि मानव म्हणून असलेल्या आपल्या मूलभूत स्वातंत्र्याविषयीं आणि योग्यतेविषयीं जागरूक असतो. व्यक्तिगत मानवी योग्यतेची जाणीव तशी फ्रेंच माणसांतही जागृत असते. आणि तरीही मला इथें दिसतें तें असें कीं, फ्रेंच तुरुंगाच्या भिंतीवरही आढळणाऱ्या, फ्रेंच राज्यक्रांतींतल्या स्वातंत्र्य, समता, बंधुभाव या सूत्रत्रयीला अमेरिकेंत विशेष—केवळ एका उदात्त विचारापलिकडे-महत्त्व आहे. जनतेच्या सामाजिक जाणीवेशीं आणि अस्तित्वाशीं दृढ गुंतलेल्या आणि कार्य बजावणाऱ्या सर्वसाधारण विचारप्रणालीशीं जुळणारी आणि मी आतांच उल्लेखिलेल्या व्यक्तिगत मानवी योग्यतेच्या भावनेला सामायिक सामाजिक मान्यतेंतून उद्भवणाऱ्या एका आश्वासनाची जोड देणारी अशीच ही सूत्रत्रयी आहे.

आपण आणखी पुढें चलूं या. ॲरिस्टॉटल आणि थॉमस ॲक्विनास हे जुन्या टोळीपासून वेगळ्या अशा शहर वा राजकीय समाजाविषयीं बोलतात तेव्हां असें सांगतात कीं, राजकीय समाज हा विचार

आणि तत्त्वांची निर्मिति आहे; आणि त्यांत एकत्र रहाण्याची इच्छा वा संमति—समुदायांतून मुक्तपणें उचंबळणारी—गृहीत आहे.

माझा मुद्दा असा कीं, जगांत इतरत्र कुठेंही, राजकीय समाजाच्या हेतूची ही कल्पना अमेरिकेंत आहे तेवढी अंमलांत आली नसेल.

लढाया, आक्रमणें, कबजे, शरणागत्या, अशा विविध ऐतिहासिक उलथापालथींपासून पूर्णपणें अलग उद्भवलेलें असें हें राजकीय जीवन एकमेव आहे. येथल्या मानवी समुदायाच्या निर्मितीला याचा प्रत्यक्षांत फार हातभार लागला. अमेरिकेंतलें राजकीय जीवन, हेंच केवळ स्वातंत्र्यापोटीं आणि सामायिक उद्दिष्टाकरता एकत्र रहाण्याच्या, कष्ट करण्याच्या जनतेच्या आपखुषीच्या निश्चयांतून पूर्णपणें आणि ठसठशीतपणें निर्माण झालेलें आहे. या नव्या राजकीय निर्मितींत, विविध राष्ट्रीय वंश, आध्यात्मिक पंथ आणि धार्मिक निष्ठांच्या—ज्यांचे पूर्वज एकमेकांविरुद्ध प्राणपणानें लढाया लढले होते अशा—माणसांनीं आपखुषीनें शांततेनें एकत्र रहाण्याचा, ईश्वराच्या छत्राखालचा स्वतंत्र समाज म्हणून नांदण्याचा आणि एकाच सामाजिक उद्दिष्टाकरतां झटण्याचा निश्चय केला आहे. लिंकननें रूढ केलेला 'जनतेचें, जनतेतर्फेंचें, जनतेकरतां' सरकार हा शब्दप्रयोग म्हणजे राजकीय लोकशाहीची उत्कृष्ट व्याख्या असून त्याला तोंड द्याव्या लागलेल्या भरीव वस्तुस्थितीची ती अभिव्यक्ति होती. त्याशिवाय, अमेरिकन लोकशाहीच्या उद्दिष्टांबद्दल बोलायचें तर, माझ्या मतें लिंकनच्याच एका वेगळ्या वचनांत तीं चांगलीं उधृत झालीं आहेत. त्याच्या पहिल्या संदेशांत तो म्हणाला होता कीं, "माणसांची स्थिति उन्नत करणें, साऱ्या बाहूंवरून उपरीं ओझीं आणि दडपणें दूर करणें, सर्वांना हिताच्या अशा मार्गांवरील कांटेकुटे दूर करणें, साऱ्यांना हयातीच्या शर्यतींत मुक्त वाव आणि न्याय उपलब्ध करून देणें हीं ध्येयें असलेलें सरकार या जगांत अस्तित्वांत रहावें म्हणून आपला लढा आहे."

मी हेंही नमूद करतों कीं, मी म्हणतों ती थोर राजकीय कर्तबगारी केवळ या देशाच्या मूळ माणसांनींच घडविली असेल असें नाहीं. ती एक आत्मविकासाची अखंड क्रियाच होय. आणि म्हणूनच,

आपखुषीनें स्वातंत्र्यांत आणि स्वातंत्र्यार्थ एकत्र जीवन जगण्याचा निर्धार केलेल्या माणसांची उच्च बंधुभावना; आणि आपखुषीनें आलेल्या नवागतांचें या स्वातंत्र्याच्या आणि स्वातंत्र्यार्थ बंधुभावनेंत विलीनीकरण. एकदांच प्राप्त होणारी आणि मग केवळ उपभोगण्याची येथलें स्वातंत्र्य ही चीज नव्हे. इतिहासांत मूळ धरलेली, आणि स्वरूपानें मानवी, मानवी संस्कृतीच्या काळांतली खूप मौलिक, भव्य आणि म्हणून सदा धोक्यांत असलेली ही चीज असल्यानें वारंवार निर्माण होणाऱ्या कालमानापोटच्या बदलत्या परिस्थितींतल्या नवनवीन अडथळ्यांपासून तिला नेहमींच धास्ती असते. तिचें सतत जतन केलें पाहिजे; ती सतत सुधारत राहिलें पाहिजे. प्रत्येक पिढीगणिक तिचा नवा अवतार झाला पाहिजे. तिच्यांत शीण, अकरणात्मकता, विश्रांति यांना स्थान नाहीं. स्वतंत्र माणसांच्या जीवनांतून, अस्तित्वांतून तिला अखंडपणें नवें सामर्थ्य प्राप्त होत रहायला हवें; त्या अस्तित्वाशींच ती एकजीव झालेली असते.

माझ्या मतें, अमेरिकन लोकशाहीची पद्धत ही विद्यमान सर्व लोकशाही पद्धतींत उजवी आणि ( निदान दूरगामी दृष्टीनें विचार करतां ) सुकर पद्धत होय. तरीही ती परिपूर्ण नाहीं, किंवा ( तिच्या उत्कृष्टतेचा हा पुरावा. ) परिपूर्ण माणसांकरतांही ती योजिलेली नाहीं. प्रत्यक्ष व्यवहारांत तिचें कार्य चालावें म्हणून, घटनेंतल्या श्रेष्ठ उद्दिष्टांना आणि उदात्त तत्त्वांना मानवी हितसंबंध आणि आशाआकांक्षांचें सहाय्य हवें. राष्ट्राच्या हितार्थ राजकीय इंधन म्हणून राजकीय पक्ष चातुर्यानें या गोष्टींचा उपयोग करून घेत असतात. म्हणूनच चतुर बुद्धीचे निरीक्षक म्हणतात त्याप्रमाणें या देशानें कृतज्ञ असायचें तें केवळ देश वसविणाऱ्या बापजाद्यांबद्दलच नव्हे तर ' काकेमाम्यां '-बद्दलही असायला हवें. यांच्या मानसशास्त्रीय भराऱ्यांतूनच संबंधित व्यवहार्य युक्त्या, गुरुकिल्ल्या आणि साधनें ( उदाहरणार्थ : लॉग-रोलिंग ', ' स्पॉइल्स सिस्टिम ' इ. ) उपलब्ध झाल्या.

स्वातंत्र्यावर आधारलेल्या कोणत्याही राजकीय अमलांत आढळ-णारी एक विशिष्ट गोम अशी कीं, एकूण समाजाला राष्ट्रांतल्या दरेक पंथावर आणि मतप्रवाहावर बारीक नजर ठेवणें अशक्य असल्यानें 'पडद्यामागें' कांहीं अदृश्य शक्ति अपरिहार्यपणें उद्भवून मातूं लागतात. त्यांना उत्तर एकच : घडणाऱ्या सुधारणा आणि बदलां-बाबत जबाबदार नागरिकांनीं डोळ्यांत तेल घालून अष्टौप्रहर जागृत रहाणें. अमेरिकेंत हें उत्तर वेळ पडेल तेव्हां, वेळाउशीरानें, परंतु हमखास दिलें जातें. तरीही हा प्रश्न इथेंही आहेच. त्याचीं लक्षणें पराकोटीचीं असून कांहीं वजनदार वर्तुळांचा आणि समर्थ निमसर-कारी गटांचा समाजजीवनावर वेळींअवेळीं येणारा दबाव हीं यापैकीं कांहीं होत. तात्पुरता तरी, यांतला चिंतास्पद भाग कार्पोरेशन्सची येथली बेसुमार वाढ हाच आहे असें वाटतें.

वरच्या परिच्छेदांत उल्लेखिलेली 'गोम' साऱ्याच लोकशाही राजवटींत या ना त्या स्वरूपांत आढळणारी आहे. याच विशिष्ट देशाला लागू होणाऱ्या कांहीं गोष्टी तेवढ्या मी इथें नमूद करतों. एकीकडे, मला वाटतें अमेरिकेंतली सर्वोच्च न्यायालयाची घटना ही आधुनिक काळांतली श्रेष्ठ राजकीय कामगिरी होय. बुद्धिप्रामाण्य आणि मानवी व्यवहारांतलें त्याचें महत्त्व जणूं या घटनेनें वैशिष्ट्यानें स्वीकारलें आहे. तसेंच दुसरी-कडे, बहुधा फ्रेंच लोक विचारानें तरी se'paration des pouvoirs च्या तत्त्वाचे पुरस्कर्ते असल्यानें असेल, मला असें वाटतें कीं, घटनेचें हें तत्त्व जेवढ्या प्रमाणांत प्रमाण मानलें जातें तेवढें मानण्यालायक तें नाहीं. सरकाराच्या कायदेविषयक आणि अंमलबजावणीविषयक विभागांतल्या भेदाचा विषय आपण बाजूला ठेवूं—हा भेद फ्रेंच व्यवस्थेंत व्यवहारतः जेवढा अवमानिला जातो तेवढा अमेरिकेंत जात नाहीं. परंतु युरोपीय माणसाला, मला वाटतें, अमेरिकेंत न्यायमूर्ती आणि डिस्ट्रिक्ट ॲटर्नीज हे लोकमताच्या चांचणीनें कोणत्याही राजकीय पक्षाच्या उमेदवारांसारखे निवडले जातात आणि त्यांना निवडणुका लढवाव्या लागतात, त्यासाठीं लोकाराधन करावें लागतें, हें मोठें कठीण वाटतें. इतरही कांहीं वैशिष्ट्यपूर्ण प्रकारांत न्यायविषयक आणि राजकीय

विभागांची गल्लत झालेली दिसतेच. माझ्या मतिप्रमाणें, कॉंग्रेसनें नेमलेली कोणतीही कमिटी ही न्यायदानविषयक अधिकाराला पारखी मानण्यांत येते, तिचें कार्यक्षेत्र कायदेविषयक कार्याकरितां पुरेशी माहिती जमविणें एवढ्यापुरतेंच मर्यादित असतें; म्हणूनच कोर्टाप्रमाणें तिचे कांहीं पक्के असे यमनियम आणि हक्क नसतात. तरीही, कोणाही व्यक्तींच्या वैयक्तिक व्यवहारांचें संशोधन आणि चौकशी करण्याचा अधिकार तिला असल्यानें प्रत्यक्षांत तिचें कांहीं कार्य हें न्यायालयीन शाखेशीं जुळणारें, तिच्या अखत्यारांतलें घडतें.

शेवटीं, राजकीय जीवनांतल्या जनतेच्या विद्यमान भूमिकांबद्दल बोलायचें तर, अलिकडेच व्यक्त झालेल्या ॲडलाय स्टिव्हन्सन या या विषयांतल्या अधिकारी व्यक्तीच्या कांहीं विचारांचा उल्लेख इथें करतां येईल. ते म्हणाले आहेत, "सुखी, समाधानी, तृप्त अशा आमच्या बहुसंख्य समाजाला सुरक्षिततेचीही इच्छा आहे. त्यांना चिंता नको आहे...." आणि म्हणून, सामाजिक हिताचा विचार न करतां ते "त्यांच्या नव्या घरादारांचा आणि आप्तेष्टांचाच विचार करणें पसंत करतात..." अलिकडल्या काळांत असें वारंवार म्हणण्यांत आलें आहे कीं,—मानवाला कडी करणें अशक्य अशा मोठमोठ्या जागतिक समस्या समोर उभ्या ठाकल्या असल्यानें असेल—सर्वसाधारणपणें लोकांना एकसूत्रीपणा आणि पलटणीकरण (regimentation) यांकडे झुकणाऱ्या अधिकारारूढ पक्षाच्या कलांतले धोके नीट ध्यानांत घ्यावेत असें वाटत नाहीं.

हे आपेक्ष मी घेत असलों तरीही अमेरिकेची राजकीय व्यवस्था मला मानवते ही गोष्ट सत्यच. या आक्षेपांनीं एकच सिद्ध होतें कीं, ही व्यवस्था मानवी आहे, अतिमानवी नाहीं, आणि मोठ्या मानवी विजयाचा ती भाग असल्यानेंच, तिच्यांतल्या उणीवा आणि चुका मानवांनीं अखंडपणें हुडकून निपटाव्या आणि तिला कार्यरत ठेवावें, सुधारावें, अशी तिची अपेक्षा राहिली आहे.

माझ्या विचारांना इथें पुन्हां जरा वैयक्तिक स्वरूप आलें तर वाचक तेवढें माफ करतील अशी अपेक्षा आहे. इथें मी माझ्याच

एका ग्रंथाचा—Humanisme Inte'gral' याचा निर्देश करणार आहे. वीस वर्षांमागें मी लिहिलेला हा ग्रंथ. हा मीं लिहिला तेव्हां नव्या क्रिश्चन संस्कृतीसाठीं एक निश्चित ऐतिहासिक तत्त्वप्रणाली आंखण्याचा माझा प्रयत्न होता. माझा दृष्टिकोन पूर्णपणें युरोपीय होता. अमेरिकन पद्धतीनें तेव्हां मी बिलकुल विचार करीत नव्हतों, माझ्या मनांत तेव्हां वैशिष्ट्यानें होता फ्रान्स आणि युरोप. त्यांच्या ऐतिहासिक समस्या. माझ्या देशांतल्या कॅथॉलिक तरुणवर्गांत धार्मिक क्षेत्रापुरतें कांहीं चैतन्य शिरावें म्हणून निश्चित भावी तत्त्वप्रणालीची गरज. त्याबाबतचेच विचार.

या संबंधांत विलक्षण गोष्ट अशी कीं, अमेरिकेला प्रथम पहातांच माझ्या मनांत तिची आवड उद्‌भवल्यानें आणि बहुधा Humanisme Inte'gral लिहितांनाच्या माझ्या विशिष्ट दृष्टिकोनामुळेंही, माझ्या ग्रंथातले अनेक विचार आणि या देशांतल्या घटना यांतला सारखेपणा प्रथम बराच काळ माझ्या ध्यानीं आला नाहीं.

अर्थात माझ्या ग्रंथांत आहे तें आजच्या कोणत्याही वस्तुस्थितीहून भिन्न असें सुस्पष्ट ऐतिहासिक तत्त्वप्रणालीविषयींचें विवेचन. तरीही, मला महत्वाची वाटते ती वैशिष्ट्यानें अमेरिकन संस्कृतीच्याच अशा कांहीं गोष्टींची, प्रवाहांची दिशा. या दृष्टिकोनांतून पहातां मी असें म्हणेन कीं, 'Humanisme Inte'rgral' या ग्रंथाचा, पुढल्या घटनांच्या दृष्टीनेंच कीं काय, अमेरिकन परिस्थितीशीं कांहीं तसाच ऋणानुबंध होता.

यासंबंधांत कांहीं गोष्टी उल्लेखूं द्यात.

एक : अमेरिकन समाजव्यवस्था, परिपूर्णपणें नव्हे तरी पण मूलतः वर्गविहीन समाजव्यवस्था आहे. आर्थिक कल्याणाच्या आणि सामाजिक मान्यतेच्या दृष्टीनें कांहीं करोडोपति, अनेकानेक सधन स्त्री-पुरुष, आणि उरलेली बहुसंख्य जनता यांतल्या फरकाचा यांत संबंध नाहीं. यांत गैरसमज करून देणाऱ्या एकसारखेपणामागच्या कौटुंबिक परंपरा, रीतीभाती यापोटच्या मोठ्या सामाजिक भेदाभेदांचाही विचार अभिप्रेत नाहीं—हे भेद उद्‌बोधक वाटतात, कारण ते अर्धवट लपव-

रा. क. ८८६४०१

लेले आहेत; माहितगार मूठभरांनाच ते पोषाख, शब्दसंपत्ति, रीती यांद्वारें कळूं दिले जातात. तरीही हे भेद सामाजिक व्यवहारांच्या ओघाआड येत नाहींत आणि आर्थिक योग्यायोग्यतेपेक्षां शैक्षणिक बाबतींतल्या आणि एकूण वागण्यावावरण्यांतल्या सांस्कृतिक अंतरापुरतेच ते मर्यादित आहेत.

माझ्या मुद्द्याच्या दृष्टीनें 'वर्ग' या गोष्टीची रीतसर व्याख्या ठरली पाहिजे. ग्रोएत्झ ब्रीफ्सनें त्याच्या औद्योगिक मजूरवर्गावरच्या ग्रंथांत दाखवून दिलें आहे त्याप्रमाणें, वर्ग या कल्पनेंत अपरिहार्यतेचा, नशीबाचा कांहीं भाग गृहीत आहे. म्हणजे असें कीं, त्याच्या खऱ्या अर्थानें 'वर्ग' म्हणजे वंशपरंपरागत आणि एका पक्क्या, बऱ्याचशा अढळ अशा समाजरचनेला जखडलेली सामाजिक अवस्था. म्हणजेच, एका विशिष्ट वर्गांतल्या स्त्री-पुरुषाचीं मुलें हीं त्याच वर्गांत जमा होणार. याला अपवाद घडतीलही; परंतु ते मूळ नियम सिद्ध करणारे. पिढ्यान् पिढ्या ही वर्ग-परंपरा चालूच रहाणार.

ह्याशिवाय, या अढळ सामाजिक भेदाभेदांमुळें, संबंधित सामाजिक वर्गांत एक विशिष्टच वर्ग–भावना, वर्ग–नीति प्रादुर्भूत होऊन वाढणार.

अमेरिकेंत या स्वरूपाचें कांहीं नाहीं. या देशांतल्या विशिष्ट द्रव सदृश व्यवस्थेमुळें (Fluidity) हें शक्य नाहीं.

कोणालाही एका सामाजिक स्थानापासून दुसऱ्या सामाजिक स्थानाकडे–म्हणजे गरिबींतून श्रीमंतीकडे–पुन्हां वाटल्यास गरिबीकडे–जाण्याचा अधिकार येथें आहे ही तर सर्वश्रुत गोष्ट झाली. हा सततचा बदल इथें नित्याचा आहे. त्यामुळें सामाजिक परिस्थितींत वंशपरंपरागत स्थैर्य असें नाहीं.

त्याच वेळीं, कोणत्याही कुटुंबांतल्या मुलांत सामाजिक मान्यतेबाबत कमालीची तफावतही आढळते. याबाबत मूलभूत असें एक परस्पर-दळणवळण आणि माणसें आणि विचार यांची मोठ्या प्रमाणावरली देवघेव येथें वेगवेगळ्या सामाजिक गटांत चाललेली दिसते. राष्ट्रीय, धार्मिक, भौगोलिक, व्यावसायिक, अशा अनेक गोष्टींमुळें

खूप वैचित्र्यपूर्ण स्वभाव-वैशिष्ट्यें येथें आढळून येतात. परंतु वर्ग-भावना मात्र नाहीं.

अशा प्रकारें, स्वातंत्र्याच्या वातावरणांत अमेरिकेनें वर्गविहीन समाजव्यवस्था प्रत्यक्षांत आणली आहे. ती कोणत्या अर्थानें तें आपल्याला समजलें. 'वर्ग' या गोष्टीच्या शुद्ध समाजशास्त्रीय व्याख्येपुरतेंच हें विधान मूलतः खरें आहे. परंतु प्रत्यक्षांत प्रत्ये-काला समान संधीचें वातावरण वाढेल, आर्थिक लायकींतलीं अंतरें रोडावतील, तसतसें हें विधान अधिक व्यापक अर्थानेंही खरें ठरत जाईल. कांहीं माणसांकडे जरूर त्याहून अधिक असल्याबद्दल मला चिंता वाटत नाहीं. ( प्रत्येकाकडेच तें असावें असें मी म्हणेन. ) मला चिंता वाटते ती अनेकांकडे पुरेसें नसतें याबद्दल. ( म्हणजे ते आत्यं-तिक दारिद्र्यांत रहातात असेंही नव्हे. ) शिवाय, जोंवर एखाद्या समाजव्यवस्थेंत दारिद्र्याचे कांहीं भाग अस्तित्वांत आहेत, किंवा वेगळ्या तऱ्हेनें, प्रत्येकांतल्या मानवी जीविताच्या अगदीं मूलभूत गरजा जोंवर या व्यवस्थेकडून विनामोबदला भागविल्या जात नाहींत तोंवर तिला पूर्णांशानें वर्गविहीन म्हणता येणार नाहीं.

दुसरा मुद्दा, अमेरिकन अर्थव्यवस्था आतां रूढार्थानें भांडवल-शाही अवस्थेपलिकडे विकसित होत असल्याच्या सत्यस्थितीबाबतचा होता. मागल्या एका प्रकरणांत यावर मीं भर दिलेला आहे. पुन्हां त्याची चर्चा नको.

हा संबंधित मोठा बदल अखंड प्रयत्नांनीं आणि अनेक अनपेक्षित पद्धतींनीं विकसित होत जाणार हें निश्चित. त्याचा व्याप वाढणें जरूर आहे, त्याला अधिक सखोल अर्थ देणेंही जरूर आहे. परंतु मला महत्त्व वाटतें तें याचें कीं, भांडवलशाही आणि समाजवाद यांपलिकडे एक नवीन व्यक्ति-प्रधान आणि त्याच वेळीं समुदाय-प्रधान राज्य-व्यवस्था कोणत्या दिशेनें वाटचाल करील यांचा शोध या देशाला लागला आहे.

माझ्या ग्रंथांत मीं मांडला होता तो तिसरा मुद्दा अशा समाज-व्यवस्थेच्या ' अनेक-वादी ' ( Pluralist ) घाटाबाबतचा होता. या देशाचीं कांहीं मूलभूत वैशिष्ट्यें आणि माझी ' अनेक-वादी ' कल्पना यांतलीं साम्यें इथें आवर्जून मांडण्याची आवश्यकता नाहीं.

अमेरिकेच्या धार्मिक जीवनांतही हा ' अनेक-वाद ' आढळतो.

या ओघांत करण्याच्या अखेरच्या विधानाशीं मी आतां येतों. माझ्या संबंधित ग्रंथांतला एक महत्वाचा विषय, विशिष्ट धर्मग्रंथाची अभिमानी नव्हे तर धर्मातीत, आणि जिच्यांत परस्परविरुद्ध आध्यात्मिक श्रद्धांचेही लोक एकत्र येऊन ऐहिक कल्याणार्थ कांहीं काम करूं शकतील आणि तरीही जी धर्मातून उत्स्फूर्त झालेली आणि नैतिक मूल्यें आणि प्रत्यक्ष व्यवहार यापुरती प्रामुख्यानें क्रिश्चन असेल अशा संस्कृतीची कल्पना हा होता.

अमेरिकेंत या अनुषंगानें पाहूं गेलें तर आपल्याला काय दिसतें ?

या परिस्थितीचें फार बोलकें वर्णन पीटर ड्रूकर यांनीं आपल्या ' Organised Religion and the American Greed ' या ' रिव्ह्यू ऑफ पॉलिटिक्स ' नियतकालिकाच्या जुलै १९५६ च्या अंकांत केलेलें आढळतें.

त्यांनीं लिहिलें आहे, " धर्म, सरकार आणि समाज यांतले वैशिष्ट्यपूर्ण संबंध हें अमेरिकन धार्मिक तसेंच राजकीय जीवनाचें एक खास आणि मूलभूत वैशिष्ट्य मानलें पाहिजे. अमेरिकन संस्थांची नीट कल्पना करून घेण्यालाच केवळ तें सहाय्यकारक नाहीं तर अमेरिकन आणि युरोपीय संस्था, कल्पना, परंपरा यांतली सुस्पष्ट तफावत तें ध्वनित करतें. या देशांत शंभर टक्के धर्मातीत नसलें तरी जास्तींत जास्त धर्मातीत राज्य निर्माण करण्यांत आलेलें आहे...त्याचप्रमाणें ज्याच्या समाजाची मूलभूत जडणघडण धर्मनिष्ठ समाज म्हणून झाली आहे असें पश्चिमेकडलें अमेरिका हें एकमेव राष्ट्र.

" अंगभूत स्वभावधर्मानुसार, या राज्याचा आवाका स्वयंशासित स्वरूपाचाच आणि " स्वभावगत विचारशक्ती "चा असणें योग्य होय. परंतु त्याचबरोबर स्वतंत्र समाज हा धर्मनिष्ठ व्यक्तीवर भक्कमपणें आधारलेला असतो तेव्हांच शक्य असतो...यांतून ही मूलभूत अमेरिकन कल्पना समोर येते कीं, सरकारनें, राज्ययंत्रानें कोणत्याही एका धर्मपंथाला आपला पाठिंबा वा आशीर्वाद देखील देता कामा नये. तसें घडल्यास धर्मविषयक स्वातंत्र्यावर बंधन येईल. घटनेच्या पहिल्या दुरुस्ती-अन्वयें ही गोष्ट अत्यंत आक्षेपार्ह मानण्यांत आली आहे. त्याच वेळीं राज्ययंत्रानें नेहमींच सर्वसाधारण धार्मिक जीवनाला हातभार लावला पाहिजे. त्याचा पुरस्कार केला पाहिजे, त्याला संरक्षण दिलें पाहिजे. कोणत्याही एका धर्मपंथापुरतें अमेरिका हें खरोखरी धर्मातीत राज्य आहे. परंतु त्याच वेळीं तें नागरिकत्वाकरता अस्सल धार्मिक विचारसरणीच्या आवश्यकतेबाबतच्या सर्वसाधारण श्रद्धेपुरतें ' धार्मिक ' राष्ट्रकुटंब आहे.

अमेरिकन परिस्थितीचें हें वर्णन पुरेसें स्वच्छ आणि साधें, सरळ आहे. माझ्या वैयक्तिक अनुभवांतून मी या भरीला इतकेंच म्हणेन कीं, प्रथम मी अमेरिकेच्या अध्यक्षांना ( फ्रँकलिन रूझवेल्ट ) नभोवाणीवरून भाषण करतांना ऐकलें, ईश्वराची करुणा भाकतांना ऐकलें तेव्हां एकाएकीं माझ्या ध्यानीं आलें कीं, 'चर्च आणि राज्ययंत्र यांतल्या फारकती 'ला फ्रेंच आणि अमेरिकन भाषेंत एकच अर्थ नाहीं.

त्याहूनही, राज्ययंत्र आणि चर्च यांच्या फारकतीचें तत्त्व घटनेंत बरेंच ऐसपैसपणें अंतर्भूत करणाऱ्या ( ' Congress shall make no law respecting an establishment of religion or prohibiting the free exercise thereof. ' ) कॉंग्रेसनेंच दोन्ही गृहांकरतां आणि लष्कराकरता पगारी ' चेप्लेन्स 'ची व्यवस्था केल्याची वस्तुस्थिति मी लक्षांत घेतों तर हें आश्चर्य मला इतक्या प्रमाणांत वाटतें ना.

लॉक वा अठराव्या शतकांतले नव–विचार यांच्या प्रत्यक्षाप्रत्यक्ष परिणामांपलिकडली ही अमेरिकन घटना, मी वेगळ्या एका ग्रंथांत

म्हटल्याप्रमाणें, क्रिश्चन विचारसरणी आणि संस्कृतीच्या पुरातन ठेव्यांतून वर आलेली आहे.'' तत्कालीन तत्त्वज्ञानाचा शिडकावा असलेला असामान्य क्रिश्चन दस्तऐवज असेंच तिचें वर्णन करावें लागेल. या महान् राजकीय क्रिश्चन दस्तऐवजाचा आत्मा आणि स्फूर्ति मुळांतच, ईश्वर आणि कोणतीही धार्मिक श्रद्धा यांजपासून मानवी समाजाची फारकत करण्याच्या कल्पनेविरुद्ध आहे. थँक्स-गिव्हिंग, सार्वजनिक प्रार्थना, कोणत्याही ठळक सरकारी समारंभाच्या वेळीं ईश्वराचें नामस्मरण करण्याचा रिवाज, या गोष्टी या देशाच्या दैनंदिन व्यवहारांतलें या आत्म्याचें आणि स्फूर्तीचेंच एक प्रतीक होत.'' (' मॅन अँड द स्टेट.' युनिव्हर्सिटी ऑफ शिकागो प्रेस, १९५१.) या देशाचे प्रणेते हे सिद्धपुरुष नव्हते वा कुणी शास्त्री-पंडितही नव्हते. तथापि त्यांचें जीवनविषयक तत्त्वज्ञान आणि राजकीय तत्त्वज्ञान, निसर्गाचा कायदा आणि मानवी हक्कांबाबतच्या त्यांच्या कल्पना, यांच्यावर क्रिश्चन विचारसरणीचा पगडा होता आणि त्यामागें अविचल अशा धार्मिक भावनेचें पाठबळ होतें.

म्हणूनच, फार दृढ, क्वचित् सुप्त, कधीं छुपें, परंतु अस्सल आणि जिवंत असें धार्मिक स्फुरण या देशांतल्या धर्मातीत, व्यवहारी लोकजीवनांत आढळतें. आणि ज्यांच्यापाशीं कोणतीही धार्मिक श्रद्धा नाहीं, वा जे पक्के नास्तिक आहेत त्यांना यामुळें मोठेंसें अस्वस्थ वाटत नाहीं; वाटलेंच तर तें, विशिष्ट धर्मपंथाच्या शाळांत जाणाऱ्या मुलांना बसेसमधून विनामूल्य नेण्यांत येतें या कल्पनेनेंच वाटतें; त्यांना असह्य असा धक्काच बसतो. (१९४७ मध्यें अमेरिकेंत सुप्रीम कोर्टापुढें याबाबत एक वादच झडला होता. आणि पुढें कॅथॉलिक पंथाविरुद्ध एक विरोधाची लाटच उठली होती यानंतर चर्च आणि राज्ययंत्र यांच्या फारकतीकरतां चळवळ करणारी एक संघटना (P O A U: Protestants and Other Americans United for the Seperation of Church and State): स्थापन झाली.)

धर्मातीत ते कडे ओढ घेणारा प्रतिगामी मतप्रवाह कितीही प्रभावी असला तरी, तो अमेरिकन संस्कृतीपासून, पीटर ड्रूकरनें केलेल्या

विवेचनामुळें आम्हांला अधिक भर देण्याची संधि मिळालेलें धार्मिक स्फुरण हिरावून घेऊं शकेल अशी शक्यता नाहीं.

एवढें म्हटल्यावर, आतां हेंही नमूद केलें पाहिजे, कीं चर्च आणि राज्ययंत्र यांचीं कार्यक्षेत्रें वेगवेगळीं असलीं तरी त्यांच्यांत शक्य आणि आवश्यक असलेल्या सुबुद्ध सहकार्याच्या भावनेला—सत्ता-संपादनाच्या परस्पर करारावर नव्हे तर लोककल्याणार्थ सेवेच्या कल्पनेवर आधारलेल्या भावनेला—अमेरिकन व्यवहारांत आज पुरेशी ठसठशीत लोकमान्यता लाभलेली नाहीं. विशेषतः सुप्रीम कोर्टानें मॅक्कोलम खटल्यांत ( मॅककोलम विरुद्ध बोर्ड ऑफ एज्युकेशन, १९४८ ) दिलेल्या जेफर्सनच्या 'फाळणीची भिंत' या कल्पनेच्या स्पष्टीकरणाच्या बाबतींत याचा विशेष प्रत्यय आला. पीटर ड्रूकर या बाबतींत म्हणतो, "या बाबतींत अलिकडे घडलेलीं कांहीं मोजकींच प्रकरणें आपण ज्या पद्धतीनें हाताळलीं ती पद्धत आम्हांला मोठीशी अभिमानास्पद नाहीं. केवळ कायद्याच्याच कसावर लाविली तरी ती पूर्णतया असमर्थनीय आहे." आणि एकंदरीनें, ही सद्यःस्थिति, मी आतांच नमूद केलेलीं तिचीं चार वैशिष्ट्यें कितीहि महान् असलीं तरी, Humanisme Integral मध्यें मी मांडलेल्या उद्दिष्टांशीं बिल-कुल विसंगत अशीच आहे. हीं उद्दिष्टें मी मांडलीं तीं आजच्या युगाच्या संस्कृतीला, माझ्या मतें, साजेल अशा ऐतिहासिक तत्त्व-ज्ञानाच्या संबंधांत.

आणि तरी, हीं संबंधित लक्षणें एवढें वैशिष्ट्यानें दर्शवितात कीं मी म्हणतों या उद्दिष्टांच्या दिशेनें कांहीं वाटचालीची गर्भित तरीही निश्चित शक्यता सांगणारी परिस्थिति हा देश सोडला तर इतरत्र कुठेंही आपणाला सांपडत नाहीं.

• • •

## धर्म आणि नागरी समाज

या देशाच्या सर्वसाधारणपणें धर्मविहीत समाजजीवनांत सतत स्फुरणारें धार्मिक स्फुरण, अर्थातच, व्यक्तीव्यक्तीच्या आणि कुटुंबांच्या निश्चित अशा धार्मिक श्रद्धांतूनच प्रादुर्भूत झालेलें आहे; आणि हें, जीवसृष्टीपुरतें बोलायचें तर, आध्यात्मिक पातळीवरचें आहे. परंतु हेंच धार्मिक स्फुरण, या देशाच्या सामुदायिक वर्तणुकीचा विचार केला तर, धर्मविहीत व्यवस्थेवर व्यापक प्रमाणावर प्रतिबिंबित झालेलें दिसतें—एका धार्मिक श्रद्धेचें धर्मविहीत विकसित प्रतिबिंब; प्रत्यक्ष व्यवहारांत, धार्मिकतेपासून दूर निसटलेल्या अनेकांना मानवणारें; आणि तरी आपल्या चैतन्याच्या जोपासनेकरतां आणखी अनेकांतल्या जिवंत धार्मिक श्रद्धेची आवश्यकता असलेलें.

याशिवाय, मी मागें भर दिला त्या बंधुभावनेमुळें आणि परस्पर सामंजस्यामुळेंच, हें स्फुरण या देशांतल्या अनेकानेक धार्मिक भेदाभेदांना पुरें पडणारें आहे. अमेरिकन जीवनांत अधूनमधून व्यक्त होणारे धार्मिक पंथांतले तीव्र वैचारिक मतभेद हें धार्मिक स्फुरण सामावून घेऊं शकतें.

हा मुद्दा अलिकडल्या एका पुस्तकांत ( विल हेरबर्गचें ' प्रॉटेस्टंट, कॅथॉलिक, ज्यू ' ) चांगलाच स्पष्ट करण्यांत आला आहे. अमेरिकन जीवनांतल्या मूलभूत धार्मिक बहुविधता—प्रणालीचें स्वरूप यांत आलें असून ही सारी बहुविधता एकाच Judaeo--Christian परंपरेच्या चौकटींत कशी ग्रथित झाली आहे त्याची कल्पना त्यांत मिळते.

आतां, कोणत्याही राज्यसत्तेच्या अधिकाऱ्यांच्या हातचें साधन वा खेळणें होणें धर्माला परवडणारें नाहीं, तसेंच मी आतां म्हटलें त्या अधिक सखोल तत्त्वाचेही—एकाद्या राष्ट्रांतल्या वा संस्कृतींतल्या धर्मविहीत धार्मिक स्फुरणाचे—तें कितीही वाजवी आणि प्राथमिक स्वरूपाचें असलें तरी, स्वतःचे असे कांहीं अपघातात्मक धोके आहेत. खरा धोका हा कीं, खुद्द धर्मच आपलें धर्म—त्व गमावून बसेल; वेगळ्या शब्दांत सांगायचें तर समाजाच्या धर्मविहीत रचनेंत आणि

धर्मविहीत विकासांत तो इतका बद्धमूल होईल कीं त्याचीं अत्यावश्यक दैवी, आधिभौतिक आणि आधि-राष्ट्रीय अंगेंच तो गमावून बसेल आणि विशिष्ट राष्ट्रीय वा धर्मविहीत हितसंबंधाच्या सेवेंत राबूं लागेल.

मिस बार्बारा वार्ड म्हणतात त्याप्रमाणें, "...पाश्चिमात्त्य स्वातंत्र्याच्या रक्षणार्थ ईश्वरावरील श्रद्धेचें पुनरुत्थान घडवून आणणें ही स्वतंत्र बाब; आणि या श्रद्धेच्या पुनरुत्थानार्थ पाया म्हणून समाजशास्त्रीय, राजकीय आणि ऐतिहासिक सत्यें पुढें करणें ही स्वतंत्र बाब....श्रद्धा ही सोयिस्कर गरज नसून ती—अप्रत्यक्षपणें देखील —समाजशास्त्रीय बाबही नाहीं...लोकांना उपयुक्त वाटतें एवढ्यासाठीं युरोपांत श्रद्धेचें पुनरुज्जीवन शक्य नाहीं. तीच सत्य आहे हें त्यांना समजेल तेव्हांच ती परत येईल." (बार्बारा वार्ड, 'Faith and freedom'.) वेगळ्या शब्दांत, जगण्याला आधार म्हणून श्रद्धेची आम्हांला गरज नाहीं; जगण्याला आणि आवश्यक तर मरण्यालाही उद्दिष्ट म्हणून आम्हाला श्रद्धा हवी.

तर मग आपण असें म्हणूं या कीं, कोणतेंही धर्मविहीत अवस्थेप्रत पोंचलेलें धार्मिक स्फुरण, धर्मानें आपलीं दैवी वैशिष्ट्यें यशस्वी रीत्या आणि निकरानें जतन न केल्यास, म्हणजेच, मानवी जीवांच्या मनाच्या गाभाऱ्यांत दैवी सत्याबाबतची श्रद्धा, ईश्वरी कायद्याविषयीं निष्ठा आणि अस्सल प्रेमाची ज्योत संथपणें तेवली, वाढली नाहीं तर, अपयशी होण्याचा धोका असतो.

एकादें राष्ट्र धार्मिक स्फुरणानें युक्त आहे असें म्हटलें म्हणजे हें स्फुरण आवश्यक तेवढें सखोल आणि निर्णायक आहे असा त्याचा अर्थ अर्थातच होत नाहीं. पुऱ्या अर्थानें क्रिश्चन अशी एकादी संस्कृति निर्माण होण्याला, इतकेंच नव्हे तर मानवी इतिहासांतल्या विशिष्ट काळाचा आदर्श मानून तेवढी क्रिश्चन-स्फूर्त संस्कृति देखील जगांत कुठेंही घडण्याला, आजची परिस्थिति पाहातां, फार कांहीं

घडायला हवें. तो दिवस बिलकुल जवळ नाहीं.

परंतु आजच्या आपल्या परिस्थितीचेंच रसग्रहण आपण करूं पहातों तेव्हां, या अतिदूरच्या भविष्यकालाचीं आजचीं छोटीं छोटीं प्रसादचिन्हेंही महत्त्वाचीं मानावीं लागतात.

या दृष्टिकोनांतून, अशी खात्री बाळगांत येते कीं, एकादी नवी क्रिश्चन–संस्कृति, एक नवें Christendom कधीं तरी या मानवी इतिहासांत अवतार घेणारच असेल, तर तिचा आरंभ या अमेरिकन भूमीवरच घडेल.

मग, मेडिटरेनियन समुद्राला पुरातन कालीं जसें अपूर्व असें सांस्कृतिक महत्त्व होतें, तसें महत्त्व अटलांटिक सागराला पाश्चिमात्त्य संस्कृतीच्या संबंधांत प्राप्त होईल. आणि मग, कदाचित्, फ्रान्सची जुनी क्रिश्चन परंपरा, दुर्दैवाचे दशावतार आणि अपेक्षाभंगाचे जबर धक्के खाऊनही फ्रेंच लोक जिच्यासाठीं झुरतात ती क्रिश्चन परंपरा, अमेरिकन क्रिश्चन संस्कृतीच्या स्पर्शानें पुन्हा संजीवित होईल आणि तिच्याबरोबरीनें वाढेल.

नव्या क्रिश्चन संस्कृतीच्या संबंधांत इथें मला माझ्या कल्पना स्पष्ट करूं देत.

आजची अमेरिकन संस्कृति हीच रूपरेषेनेंदेखील, नवी क्रिश्चन संस्कृति आहे असें मला मुळींच म्हणायचें नाहीं. पुरातन क्रिश्चन संस्कृतीचीं कांहीं अबाधित अंगें आणि नव्या धर्मविहीत सुधारणा, त्याचप्रमाणें नवी ऐतिहासिक परिस्थिति यांचा तो एक मेळ आहे, इतकेंच.

त्याचप्रमाणें, एकादा स्फुल्लिंग उठून, मागल्या प्रकरणांत नमूद केलेल्या निसर्गवादा ( Naturalism ) कडे सारा ओघ वळविण्या-इतक्या समर्थ मानवांत आध्यात्मिक पुनरुत्थान घडलें, सर्वसामान्य जाणीवेंत आणि व्यवहारांत क्रिश्चन श्रद्धा आणि नैतिकतेला अस्सल अधिष्ठान लाभलें, आणि सार्वजनिक जीवनांत प्रतिबिंबित होण्याइतकें हें पुनरुत्थान प्रभावीही असलें ( थोडक्यांत, क्रिश्चन न्यायकल्पनेनें गौरेतर लोकांबाबतचा पूर्वग्रह आणि पक्षपात निचरून आणि धुवून जाईल

आणि पाशवी शस्त्रास्त्रांनीं युक्त अशा अद्ययावत युद्धाच्या बाबतींत, नैतिक तत्त्वांचें आणि ईश्वरी कायद्याचें पालन इतर गोष्टींपेक्षां महत्त्वाचें मानलें जाऊन अणुयुद्धाचें भय लयाला जाईल.) तर अमेरिकन संस्कृतींतच त्याला विशेष सुपीक भुई लाभेल असें मी म्हणत नाहीं.

मला कल्पना आहे कीं या ठिकाणीं वाचकांच्या मनांत येईल: आज मानवजातीला बेइज्जतीची आणि विध्वंसाची केवढी धास्ती झपाटून राहिली आहे हें दिसत असतां तुम्हांला केव्हां तरी येणार म्हणवणाऱ्या 'क्रिश्चनडम' बद्दल बोलवतें तरी कसें? यापेक्षां तुम्ही आतांच येऊन पोंचलेल्या जंगलच्या राज्याबद्दल (barbarism) कां बोलत नाहीं?

याचें उत्तर तीन प्रकारें देतां येण्यासारखें आहे.

पहिलें: इतिहासाचें पारडें सारखें वर खालीं होत असतें. दुष्टांचा विजय होतांना दिसतो तेव्हांच न्याय आणि सुष्टपणा सुप्तावस्थेंतच उठावाची, मानव जातीच्या प्रगतीची धांव वाढविण्याची तयारी करीत असतो. इतिहासांतल्या उलथापालथीच्या कसोटीच्या प्रत्येक वेळीं जग निराशाजनक अवस्थेंत रुतून पडलेलें दिसत होतें; त्याचा अंत नजीक आला असें खात्रीलायक रीत्या वाटत होतें; आणि त्या त्या वेळीं जग तगलें, मानवतेचा विजय झाला.

दुसरें: आज क्रिस्ताविषयीं प्रत्यक्षांत मानवांत जेवढी श्रद्धा आहे तेवढ्याच प्रमाणांत नवीन 'क्रिश्चनडम्'—क्रिश्चन राज्य—शक्य आहे. आणि आत्यंतिक निरीश्वरवादाच्या प्रगतींतही (यानें निदान anthropocentric humanism मधल्या ईश्वराविषयींच्या तुच्छतेला थारा देणारें ढोंग उघडें वाघडें केलें आहे.) क्रिस्ताविषयींची श्रद्धा केवळ जिती जागतीच नव्हे तर एकोणिसाव्या शतकांतल्या मानवापेक्षां आजच्या मानवांत अधिक ठांशीव होत राहिली आहे. मानवी संस्कृतीचें धर्मविहीत युग समजावून घेऊन बदलण्याचा हिचा आग्रह आज अधिक आहे.

तिसरें: नवें क्रिश्चन राज्य केवळ शक्यच आहे असें नव्हे, तर मध्ययुगाच्या अंतापासून अस्सल प्रगतिवादी अशा साऱ्या शक्ति त्या

... संग्रहालय, १११ ... अनुक्रम ... क्रमांक ... दि ...

दिशेनेंच वाटचाल करीत आल्या आहेत. विरुद्ध दिशेनें जाणाऱ्या दुसऱ्याही शक्ति आहेत. मानवी स्वातंत्र्यावर सारा नतीजा अवलंबून आहे.

आतां, हीं उत्तरेंही कुणाला पटत नसतील तर मी काय करणार ? मी एवढेंच म्हणेन: माझें नांव जाक आहे म्हणून मी नव्या क्रिश्चन राज्याचा संभव खरा मानतों. पीटर हा श्रद्धेचें प्रतिक होता, जॉन उदारतेचें; जेम्स दुसऱ्या धार्मिक गुणाचें.

जगाच्या आजच्या वेळणांतून उद्यांचे संत आणि सिद्धपुरुष जन्म घेतील अशी माझी श्रद्धा आहे. त्यांच्याशिवाय नवी क्रिश्चन संस्कृति कशी अस्तित्वांत येणार तें मला कळत नाहीं.

• • •

## मानवाची आशा : अमेरिका

वस्तुजातांतली अंगभूत चंचलता आणि मानवांतली अनिर्बंध प्रेरणा लक्षांत घेता, इतिहासांतल्या प्रत्येक क्षणीं, भविष्यकालाच्या बाबतींत नेहमीं एका वेळीं दोन शक्यता अस्तित्वांत असतात.

हें लक्षांत घेतां, अशी शक्यता आहे कीं शतकांच्या अवकाशांत अमेरिका पुरेपूर भांडवलशाही राष्ट्र होईल—केवळ आपल्या भौतिक कल्याणांत आणि सामर्थ्यांत गुंगलेलें राष्ट्र होईल. परंतु ही शक्यता मूर्त स्वरूप घेण्याचा संभव माझ्या मतें अगदीं नाहीं. अगदीं उघड गोष्ट ही कीं, अमेरिका हें इतर राष्ट्रांसारखें राष्ट्र नव्हे; आणि आपल्या जन्मामागल्या मूल—भावनेशीं, तत्त्वाशीं तें एकनिष्ठ राहिलें तर इतर राष्ट्रांच्या अवस्थेला येणारही नाहीं.

तिचा खरा भविष्यकाल, आतांच मीं म्हटलें त्याप्रमाणें, नव्या क्रिश्चन संस्कृतीकरतां मार्ग खुला करण्याच्या कार्यांत असणार आहे. हें काम प्रत्यक्षांत आलें तर तें सामुदायिक काम असणार आहे. क्रिश्चन भावनेनें प्रज्वलित झालेल्या अनेक राष्ट्रांशीं सहकार्यानेंच तें प्रत्यक्षांत येणार आहे. ( आज ' पोलादी पडद्यामागें ' मानखंडना

सहन करणाऱ्या आणि मुस्कटदाबी झालेल्या क्रिश्चनांकडे या संबंधांत त्यावेळीं जगाला शिकविण्याजोगे फार महत्त्वाचे धडे असतील यांतही शंका नाहीं. ) विपुल उत्स्फूर्तता आणि मूलगामी आत्म-टीका अशा दोन्ही दृष्टींनीं वैशिष्ट्यानें अमेरिकन अशा आपल्या The United States and Civilization या ग्रंथांत जॉन नेफनें आज आपल्यावर येऊन पडलेल्या या कामाचें वैश्विक मानव्ययुक्त स्वरूप चांगल्या प्रकारें प्रतिपादिलें आहे. पुस्तकाचा समारोप साधतांना, या संबंधांत मोठें वैशिष्ट्यपूर्ण, आणि कधीं नव्हे एवढ्या आज आवश्यक असणाऱ्या आधिराष्ट्रीय भावनेबाबत योग्य ती कदर बाळगणारें एक अपील लेखकानें रूसो आणि मार्क्सच्या दोन उताऱ्यांचा मेळ घालून केलें आहे : " चांगुलपणा आणि सूज्ञता हीं मुळांत जन्मलीं तीं स्वातंत्र्यांत; परंतु आज तीं दास्यांत जखडलीं आहेत. म्हणून जगभरच्या चांगल्या माणसांनो, मान्यवर माणसांनो, बुद्धिमान् माणसांनो, सत्यप्रिय माणसांनो, एक व्हा ! तुमच्याकरता तुम्हांला कोणताही भौतिक स्वार्थ साधायचा नाहीं; पण मानवतेचें काम करण्याची संधि तुम्हांला प्राप्त झाली आहे. मानवी आत्मा आणि मन यांचा पुनर्जन्म घडविण्याची संधि तुम्हांला प्राप्त झाली आहे. "

•

मी १९४२ सालीं म्हणालों तेंच इथें पुन्हा म्हणणें विसंगत ठरणार नाहीं; कीं " युरपला चांगली, अति चांगली ठाऊक असलेली एक गोष्ट आहे. ती : मानवी जीवनाचें दारुण स्वरूप...अमेरिकेला चांगली ठाऊक असलेली आणि तिच्या थक्क करणाऱ्या धाडसांशीं संबंधित होणाऱ्यांना एक महान्, मौलिक पाठ म्हणून ती शिकवत असते अशीही एक गोष्ट आहे : सामान्य माणसाचें महत्त्व, त्याची इज्जत, जनतेचें महत्त्व आणि तिची इज्जत...अमेरिकेला हें ठाऊक आहे कीं प्रत्येक सामान्य माणसाला ' सुखाच्या शोधा 'चा, अनिर्बंध जीवनाला पूर्वावश्यक अशा प्राथमिक गरजांसाठीं आणि हक्काच्या गोष्टींसाठीं, सांस्कृतिक आणि आत्मिक अशा उच्चतर साध्यांसाठीं

...ग्रंथालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम... २८०१८
क्रमांक... ... वि...
...बेहेरे
२१/८/७०

झटण्याचा हक्क आहे. आणि अशा असंख्य माणसांना त्यो नाकारण्यांत आल्यास मानवतेच्या मर्मावरच तो जबरदस्त आघात ठरतो. या देशांत पुरुषार्थ हवा तो अशी वेदना सहन करण्याकरतां नव्हे, तर पिल्ग्रिम फादर्स आणि त्याबरोबरचे या देशाचे प्रणेते यांनीं सुरू करून दिलेल्या, आणि स्वातंत्र्याचा जाहीरनामा आणि क्रांतियुद्धाच्या महान् काळांत पुढें सरकलेल्या सामर्थ्यवान् साहसकथेची यशस्वी अखेर साधण्यासाठीं.

"युरपनें अनुभवलेला जीवनामागचा शोकात्मक आशय, त्यावर जय मिळविण्याकरतां युरपला दाखवावा लागलेला, लागणारा पुरुषार्थ, आणि अमेरिकेच्या प्रत्ययाची महान् मानव्ययुक्त साहसाची भावना, आणि या साहसाच्या सांगतेकरता तिला दाखवावा लागणारा पुरुषार्थ, यांची श्रद्धायुक्त आणि निःसंकोच परस्पर—सांगड न बसल्यास जगाचें चिरस्थायी कल्याण अशक्य आहे...

"युरोपचा आत्मा आणि अमेरिकेचा आत्मा यांनीं एकत्र येऊन सर्वांच्या भल्यासाठीं झटणें आवश्यक ठरेल. उद्यांच स्वर्ग हातीं येईल असा भ्रम आपणाला नाहीं. परंतु मानवी संस्कृति उद्यां शिल्लक राहायची असेल, तर अस्सल आणि मौलिक ख्रिश्चानिटी ज्याच्या धर्मविहीत स्वरूपाच्या गाभ्यापर्यंत पोंचते आहे अशा स्वतंत्र माणसांच्या जगाचें, सामान्य माणसाच्या जीवनाला धार्मिक तत्त्व जिथें पुरुषार्थी मानव्याप्रत नेतें अशा जगाचें उद्दिष्टच आपणापुढें, आपल्यापुढच्या कार्यासाठीं, आपल्यावर येऊन पडलेल्या कर्तव्यासाठीं असलें पाहिजे. कमालीच्या धडाडीनें आणि आशावादी वृत्तीनें त्यामागें आपल्याला लागावें लागेल, कारण मानवी दौर्बल्याचा धोका त्याला ...त पोंचत राहील."

ख्रिश्चन तत्त्वज्ञानाची गरज आणि त्यासाठीं संधि या देशांतल्याइतकी जगांत इतरत्र कुठेंही नाहीं.

अमेरिकेचें महान् आणि प्रशंसनीय बळ यांत आहे कीं, अमेरिका म्हणजे खऱ्या अर्थानें अमेरिकन जनताच होय.

औद्योगिक जीवन-पद्धतीच्या यमनियमांपेक्षां प्रभावी अशा सामाजिक भावनेच्या संथ, अनियमीत अशा दाबाखालीं, अमेरिकेच्या आर्थिक आणि सामाजिक रचनेंत घडत गेलेल्या महत्त्वयुक्त बदलाबाबत मीं लिहिलें आहे. संघटित मजूरवर्गाचें वाढतें सामर्थ्य आणि सार्वत्रिक हिताच्या आणि राजकीय सर्वकल्याणाच्या अग्रेसरत्वाची त्याची जाणीव; आणि मोठमोठ्या औद्योगिक संघटनांना ज्याद्वारें मानवी हिताच्या आणि राजकीय सर्वकल्याणाच्या अग्रेसरत्वाची वाढती जाणीव मिळत आहे तो आंतरिक बदल यांची वेगवेगळी दखल घेऊन चालणार नाहीं. एकत्र विचार केला तर, लोकशाही समाजांच्या विकासांतलें एक नवें युग ललकारणाऱ्या या महान् खुणा आहेत. परंतु आत्म्याअभावी बुद्धीची प्राप्ति करून देण्यांत आल्यावरही, मोठमोठ्या औद्योगिक संघटनाच केवळ, क्रिश्चन राज्य, क्रिश्चन संस्कृति मूर्त स्वरूपांत आणूं शकणार नाहीं. तेंच संघटित मजूरवर्गाच्या सामर्थ्याबद्दल. सुबुद्ध सामुदायिक आत्महिताची भावना अद्याप फार दूरच आहे.

संबंधित उद्दिष्टाच्या दिशेनें केवळ एक संभाव्य पहिलें पाऊल टाकण्याकरितां पूर्वतयारी एवढाच सामाजिक जाणीवयुक्त उद्योगसंघटना आणि सामाजिक जाणीवयुक्त मजूर संघटना यांचा आवाका आज आहे. निर्णायक मुद्दा आहे तो आध्यात्मिक आहे. आणि निर्णायक प्रश्न आहे तो असा कीं, Judaeo-Christian परंपरेची अस्सल भावना याबाबतींत पुढाकार घेऊं शकेल काय?

ॲडॉल्फ बर्लच्या मागें उद्धृत केलेल्या ग्रंथाच्या अखेरच्या दोन पृष्ठांत या बाबतींत सफल विचाराला बरेंच खाद्य उपलब्ध झालेलें आहे. तो म्हणतो, "हें वाढत्या प्रमाणांत खरें आहे कीं, जोंवर उक्ति आणि विचार स्वतंत्र आहेत तोंवर कोणत्याही संघटनेच्या वा संघटनांच्या गढाच्या एकत्रित परिणामावर काबू ठेवण्याइतकीं माणसें

ाठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 28079C
क्रमांक 2231 दि. 15/5/60

समर्थ ठरतील. अशी खात्रीलायक अपेक्षा करता येते कीं, आज-पासून वीस वर्षांनीं अमेरिकेंतले सर्वश्रेष्ठ प्रसिद्ध पुरुष, आध्यात्माचे साधक तत्त्वज्ञानी, आणि बुद्धिवादी असतील. कारण साधें आहे : इतर कुठल्याही प्रकारच्या नेत्यांपेक्षां यांची गरज फार भासेल. समाजाचा कल अद्यापीहि त्याला सर्वाधिक हव्या असणाऱ्या प्रका-रच्या नेत्यांना जन्म देण्याकडे आणि त्यांचा आदर–कदर करण्या-कडे राहिला आहे.

" हा आपला अनुभव आहे कीं, धर्मगुरूंचा दरारा पोलिसांवर नेहमींच राहिला आहे आणि तत्त्वज्ञानी राजकारण्यांना पायबंद घालूं शकले आहेत. आमच्यांतल्या अमानुष आणि पाशवी शक्तींना लगाम ठरेल असें नैतिक आणि बौद्धिक नेतृत्व या देशांत निर्माण होईल असें मानायला पुरेसा ऐतिहासिक आधार आहे. त्या दृष्टीनें कार्य-प्रवृत्त होणाऱ्या माणसांकडे नैमित्तिक बाह्य दडपणांपुढें टिकाव धर-ण्याचें चांगलेंच सामर्थ्य असतें आणि तीं सर्वसाधारण धास्त्यांपासून बहुश: मुक्त असतात. त्यांचा मार्ग अनेकदां अडचणींनीं आणि विपत्तींनीं भरलेला असतो. क्रिश्चन इतिहासांतले कांहीं श्रेष्ठ साधु-पुरुष त्यांच्या कालांत बंडखोर आणि प्रस्थापित श्रद्धा न मानणारे होते हा केवळ अपघात नव्हे; आजही असे संत आपल्या कल्पनेनें आणि प्रतिभेनें भविष्याचा अचूक वेध घेतात. "

" अमेरिकन्स पुढें स्वीकारतील त्या ' देवाच्या नगरा ' चे खरे विधाते हे होत. "

" अमेरिका म्हणजे उज्ज्वल भविष्यकाल " असें आर्चिबाल्ड मॅकलेश यांच्या एका रमणीय कवितेचें शीर्षक आहे. अगदीं आरंभा-पासून युरोपीय समाजांनीं अमेरिकेकडे ' दैववान् बेटें'—उज्वल भविष्यकालाचा देश, म्हणून पाहिलें. अमेरिका त्यांना कच्चा माल, अन्नपदार्थ आणि औद्योगिक यंत्रसामुग्री पुरवूं शकते. ते लोक हें सर्व अर्थातच घेतील; परंतु त्यांत संतुष्ट मात्र होणार नाहींत; आणि

त्याबाबत अमेरिकेविषयीं कृतज्ञताही बाळगणार नाहींत.

अमेरिकेविषयीं त्यांची खरी अपेक्षा एकच : आशा. आणि ईश-कृपेनें ही महत्त्वाची गोष्ट कधीं विसरली जाऊं नये.

जास्त स्पष्ट शब्दांत असें म्हणणें शक्य आहे कीं : अमेरिकेपासून जगाची अपेक्षा एवढीच : मानवी इतिहासांत माणसाच्या माणूस-पणाची बंधुभावयुक्त जाणीव तिनें जागृत ठेवावी—वेगळ्या शब्दांत, ईश्वरी शक्तीविषयींचा श्रध्दायुक्त दिलासा जागृत ठेवावा.

आपली सर्वांची प्रवृत्ति, आपल्या प्रेमाच्या माणसांकडे आणि गोष्टींकडे आपल्या त्यांच्याविषयींच्या स्वप्नांच्या आणि अपेक्षांच्या प्रकाशांत पाहाण्याची असते. तरीहि मला असा विश्वास वाटतो कीं, अमेरिकेविषयींचे हे माझे स्वैर विचार, कितीही व्यक्तिनिष्ठ स्वरूपाचे असले तरी, आंकड्यांच्या भाषेंत लिहिल्या गेलेल्या अनेक अभ्यासपर ग्रंथांहून अस्सल ठरतील. मी ज्यांना स्पर्श केला नाहीं अशीं अमेरिकन जीवनाचीं बरींच वैशिष्ट्यें बाकी आहेत. तथापि स्वैर विचार कधींच संपत नाहींत; परंतु वाचकाची सहनशीलता मात्र संपणारी असते हें मी विसरून कसें चालेल !

• • •

८५६०

REFBK-0009760

ग्रा. क. ......